सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, ३० जुलै २०२४ | वर्ष दुसरे | अंक १२९ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी महामंडळाची स्थापना करणार - मुख्यमंत्री

## ज्येष्ठांच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता कर्तव्य अभियान राबवणार



मुंबई, २९ जुलै - ज्येष्ठ नागरिकांची काळजी घेणे हे शासनाचे कर्तव्य आहे. या भूमिकेतून आमचे काम सुरु असून येत्या काळात ज्येष्ठांसाठीच्या कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी कर्तव्य अभियान राबविण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. तसेच ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी महामंडळाची स्थापन करण्याची घोषणा करून ज्येष्ठांसाठीच्या सर्व योजना या महामंडळाच्या माध्यमातून राबविण्यात याव्यात, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित ज्येष्ठ नागरिक धोरणाबाबत बैठकीच्या प्रसंगी ते बोलत होते. बैठकीला उद्योगमंत्री उदय सामंत, स्वच्छता व पाणी पुरवठा विभागाचे मंत्री गुलाबराव पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री( सार्वजनिक उपक्रम) दादा भुसे, मुख्य सचिव सुजाता सौनिक, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार, परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, युएनएफपीए संस्थेच्या अनुजा गुलाटी, अखिल भारतीय ज्येष्ठ नागरिक संघाचे उपाध्यक्ष अमित टेकाळे यांच्यासह विविध विभागांचे सचिव आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी काम करणाऱ्या विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, की नुकत्याच झालेल्या निती आयोगाच्या बैठकीत विकसित भारत २०४७ च्या दृष्टीने नियोजनाबाबत चर्चा करण्यात आली. सन २०४७ पर्यंत भारतात ज्येष्ठांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी सोई-सुविधांची वाढणारी गरज लक्षात घेऊन आतापासून तयारी करणे आवश्यक आहे. सध्या शासनाने ज्येष्ठांसाठी वयोश्री योजना सुरु केली या माध्यमातून थेट डीबीटीद्वारे लाभाचे वितरण करण्यात येत आहे. सोबतच एसटी प्रवास सवलत देण्यात आली आहे. येत्या काळात प्रत्येक महापालिका क्षेत्रात विरंगुळा केंद्राची निर्मिती करण्यात येईल. या केंद्राद्वारे ज्येष्ठ नागरिकांसाठी डिमेंशिया, अल्जायमर या आजाराबाबत सहायता उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच ज्येष्ठांचे सेल्फ हेल्प ग्रुप तयार करुन ज्येष्ठांसाठी ज्येष्ठ अशा संकल्पनेतून मदत द्यावी, यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्याची सूचना मुख्यमंत्र्यांनी केली.

पुढे मुख्यमंत्री यांनी सांगितले, ज्येष्ठांसाठी आवश्यक असणारे इन्फ्लुएन्जा, न्युमोनिया या लसींच्या लसीकरणासाठी सुरुवातीला मुंबई महापालिकेच्या माध्यमातून पायलट प्रोजेक्ट राबवावा. त्यानंतर राज्यभरात बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्याच्या माध्यमातून या लसी उपलब्ध करुन देण्यात याव्यात. ज्येष्ठांच्या दारापर्यंत आरोग्य सुविधा नेण्यासाठी लवकरच हॉस्पिटल ऑन व्हील्स संकल्पना राबविण्याचा मनोदय मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. रेल्वे प्रवासात ज्येष्ठांना देण्यात येणारी सवलत पुन्हा सुरु करण्यासाठी आणि व्हीलचेअरसह इतर आवश्यक साहित्यांवरील आणि उपचारांच्या बिलावरील जीएसटी कमी करण्यासाठी केंद्र शासनाला पत्राद्वारे विनंती करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

# भारतीय हद्दील ६०० पाकिस्तानी सैनिकांची घुसखोरी- डॉ. मिर्झा



नवी दिल्ली, २९ जुलै : भारतीय हद्दीतील कुपवाडा परिसरात पाकिस्तानच्या ६०० सैनिकांनी घुसखोरी केल्याचा दावा पाकव्याप्त काश्मिरातील कार्यकर्ते डॉ. अमजद अयुब मिर्झा यांनी केला.

अमझद मिर्झा यांनी केलेल्या दाव्यानुसार पाकिस्तानचे एसएसजी जनरल ऑफिसर कमांडिंग मेजर जनरल अदिल रेहमानी हे भारताच्या जम्मू या भागावर हल्ला करण्याच्या तयारीत आहेत. मिर्झा यांनी केलेल्या दाव्यानुसार पाकिस्तानी लष्कराच्या संपूर्ण एसएसजी तुकडीने कुपवाडा आणि इतर भागात घुसघोरी केलेली आहे. संपूर्ण तुकडीची घुसघोरी म्हणजेच पाकिस्तानचे साधारण ६०० सैनिक कुपवाडा आणि इतर भागात घुसलेले आहेत, असा दावा मिर्झा यांनी केला आहे.

तसेच, कुपवाडा तसेच इतर भागात स्थानिक जिहादी स्लिपर सेल्स हे सक्रीय झाले आहेत. स्लिपर सेल्सकडून एसएसजीच्या सैनिकांना भारतीय भूभागात घुसण्यासाठी मदत केली जात आहे. पाकिस्तानचा लेफ्टनंट कर्नल शाहीद सलीम जिंजूआ हा सध्या भारतीय हद्दीत असून पाकिस्तानी सैनिकांचे नेतृत्व करत आहे. कर्नल शाहीदकडून भारतीय लष्कराच्या १५ कॉर्प्सचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे मिर्झा म्हणाले. दुसरीकडे पाकिस्तानी लष्कराच्या एसएसजीच्या आणखी दोन तुकड्या मुझफराबादमध्ये सज्ज आहेत. या दोन तुकड्या जम्मू आणि काश्मीरच्या माध्यमातून भारतात घुसखोरी करण्यास सज्ज असल्याचेही मिर्झा यांनी सांगितले. याआधी ४० ते ६० दहशतवादी घदाट जंगल आणि डोंगरी भागातून जम्मूत घुसले असे आम्हाला वाटले होते. पण आता लेफ्टनंट जनरल शाहीद जिंजुआ यांच्या नेतृत्त्वाखाली ५०० ते ६०० सैनिकांची एक तुकडी याआधीच जम्मू आणि काश्मीरमध्ये घुसल्याचा दावा मिर्झा यांनी केला आहे.

# भाजपाच्या पदाधिकाऱ्यांसोबत नरेंद पाटील यांचा संवाद



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.३० जुलै - भाजपा कन्नड सोयगाव विधानसभेच्या वतीने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांचा विधानसभेतील भाजपचे प्रमुख पदाधिकाऱ्यांशी संवादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमात नरेंद्र पाटील यांनी यांनी आपल्या भाषणात म्हणाले की राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार स्व.अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास मागास महामंडळाचा लाभ हा मराठा समाजातील गोरगरीब तरुणापर्यंत नेला व राज्यभरात एक लाख उद्योजक मराठा तरुणांना रोजगार दिला. तसेच मराठा समाजाला आरक्षण ही दिल व टिकून दाखवलं अशी त्यांनी आपली भावना व्यक्त केली. हे फक्त उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कामामुळे घडले. असे मत त्यांनी पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत व्यक्त केले. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय खंबायते,भाजपा निवडणूक प्रमुख संजय गव्हाणे माजी उपसभापती काकासाहेब तायडे, शहराध्यक्ष सुनील पवार,माजी सभापती उत्तमराव राठोड, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती प्रकाश अण्णा घुले, प्रदेश कार्यकारणी सदस्य गणेश घुगे, माजी उपसभापती सुनील निकम,अनुसूचित जाती जमाती कोषाध्यक्ष राजेंद्र गव्हाणे, जिल्हा उपाध्यक्ष श्रीराम मुळे, तालुका सरचिटणीस प्रदीप बोडखे, कैलास जाधव, श्रीराम जंजाळ,महिला तालुका अध्यक्ष अर्चना पवार, ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष डॉ बाळासाहेब जाधव, समीर कुलकर्णी, संजय चव्हाण, सुदाम पवार, युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष ललित सुराशे, प्रशांत अग्रवाल, विलास इंगळे, प्रशांत शिंदे, विकास भारूका,जयराम नागे, सोयगाव पश्चिमचे तालुका अध्यक्ष सुनील जाधव, ज्ञानेश्वर होळकर, सतीश शिंदे, अमोल मैराळ,स्वप्नील श्रीकांत, संदीप पाटील, राजेंद्र भोजने, गजानन पेठरे,संतोष बिडवे, प्रकाश नागरी, संजय मुगले, राहुल सोनवणे,वाल्मीक निर्मळ सह पदाधिकारी उपस्थित होते.

## पंतप्रधान मंगळवारी अर्थसंकल्पानंतरच्या परिषदेच्या उद्घाटन सत्राला करणार संबोधित

नवी दिल्ली, २९ जुलै - 'विकसित भारताकडे प्रवास: केंद्रीय अर्थसंकल्प २०२४-२५ नंतरची परिषद' या दिनांक ३० जुलै, २०२४ रोजी दुपारी १२ वाजता विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे होणाऱ्या कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्राला पंतप्रधान नरेंद्र मोदी संबोधित करणार आहेत.

ही परिषद भारतीय उद्योग परिसंघ (उखख) द्वारे आयोजित केली जात असून याद्वारे उद्योगांच्या विकासासाठी सरकारने घेतलेल्या महत्वपूर्ण भूमिकेची रूपरेषा तसेच उद्योगांचा यातील सहभाग सादर करण्याचा या परिषदेचा उद्देश आहे. उद्योग, सरकार, धोरणकर्ते, विचारमंच (थिंक टँक) आणि इतर असे सुमारे एक हजाराहून अधिक प्रतिनिधी सहभागी या परिषदेला वैयक्तिकरित्या उपस्थित राहतील तर अनेकजण देशभरातील आणि परदेशातील भारतीय उद्योग महासंघाच्या विविध केंद्रांमधून या परीषदेत सहभागी होतील.

# खा. शरद पवार यांच्या हस्ते बाईमाणूसच्या इंग्रजी संकेतस्थळाचे उद्घाटन



छत्रपती संभाजीनगर, दि.२९: एमजीएम वृतपत्रविद्या आणि जनसंवाद महाविद्यालयाच्या वतीने सुरु असलेल्या बाईमाणूस मीडिया रिसर्च फाउंडेशनच्या इंग्रजी संकेतस्थळाचे उद्घाटन खासदार शरद पवार यांच्या हस्ते रुक्मिणी सभागृह येथे करण्यात आले. यावेळी, खासदार कल्याण काळे, आमदार राजेश टोपे, कुलपती अंकुशराव कदम, प्राचार्या डॉ. रेखा शेळके, बाईमाणूसचे संपादक प्रशांत पवार, बाईमाणूसमध्ये कार्यरत असणारे पत्रकार व सर्व संबंधित उपस्थित होते.

या उद्घाटनाप्रसंगी बोलताना खासदार पवार म्हणाले, भारतीय माध्यम क्षेत्रातील बाईमाणूस हा एक स्तुत्य उपक्रम असून अशा प्रकारच्या पोर्टलच्या माध्यमातून तळागाळातील घटनांना एक व्यासपीठ उपलब्ध होत आहे. एमजीएम वृतपत्रविद्या आणि जनसंवाद महाविद्यालयाच्या वतीने सुरु असलेल्या बाईमाणूस मीडिया रिसर्च फाउंडेशनचे मी मनापासून कौतुक करतो.

राज्यातील दलित, आदिवासी, भटके विमुक्त, तृतीयपंथी आणि महिलांचे माध्यमातील प्रतिनिधित्व वाढविण्यासाठी बाईमाणूसने समाजातील याच शोषित वंचित घटकातील महिलांना पत्रकारितेचे प्रशिक्षण दिले. गेल्या दोन वर्षांपासून राज्याच्या उपेक्षित भागातील बाईमाणूसच्या महिला पत्रकार त्यांचे आजूबाजूचे जगणे बातमी आणि व्हिडिओच्या स्वरूपात मांडत आहेत. आता याच कहाण्या बाईमाणूसच्या इंग्रजी संकेतस्थळावर प्रसिद्ध होणार असल्याची माहिती संपादक प्रशांत पवार यांनी यावेळी दिली.

# केजरीवालांच्या विरोधात आरोपपत्र दाखल

## मद्य धोरण प्रकरणात मुख्य सूत्रधार असल्याचा आरोप

नवी दिल्ली, २९ जुलै : सीबीआयने आज, सोमवारी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि इतरांविरुद्ध अबकारी धोरण प्रकरणी राऊस एव्हेन्यू न्यायालयात पुरवणी आरोपपत्र दाखल केले. मुख्यमंत्र्यांवर मद्य धोरण प्रकरणातील मुख्य सूत्रधार असल्याचा आरोप आरोपपत्रात करण्यात आला आहे. या वर्षी जूनच्या सुरुवातीला, राऊस एव्हेन्यू कोर्टाने एजन्सीला आप सुप्रीमो केजरीवाल यांची न्यायालयात चौकशी करण्याची परवानगी दिल्यानंतर सीबीआयने केजरीवाल यांना मद्य धोरण प्रकरणात अटक केली होती.

सीबीआयने दिल्ली उत्पादन शुल्क धोरणाच्या निर्मिती आणि अंमलबजावणीमधील कथित अनियमिततेच्या विस्तृत तपासणीनंतर आरोपपत्र दाखल केले आहे, ज्यात मोठ्या आर्थिक गैरव्यवहारांचा दावा आहे. एजन्सीने दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांवर दारू धोरण प्रकरणात मुख्य कटकारस्थानांपैकी एक असल्याचा आरोप केला आहे. आरोपपत्रात असे म्हटले आहे की, आपचे माजी मीडिया प्रभारी आणि केजरीवाल यांचे निकटवर्तीय विजय नायर हे अनेक दारू उत्पादक आणि व्यापाऱ्यांच्या संपर्कात होते.दिल्लीचे माजी मंत्री मनीष सिसोदिया यांच्या मद्य धोरणाबाबतच्या निर्णयांना केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाने पूर्वलक्ष्यी मान्यता दिल्याचा दावाही सीबीआयने आरोपपत्रात केला आहे. एजन्सीने म्हटले आहे की दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांनी कोणत्याही युक्तिवादाशिवाय दारूच्या घाऊक विक्रेत्यांचे नफा मार्जिन ५ टक्क्यांवरून १२ टक्क्यांपर्यंत वाढवले.अरविंद केजरीवाल हे कथित दारू घोटाळ्यातील कटाचा भाग असल्याचे सीबीआयने न्यायालयासमोरील आधीच्या सुनावणीत सांगितले होते. दिल्ली सरकारचे सर्व निर्णय त्यांच्या सूचनेनुसार घेतले जात होते. केजरीवाल यांना अंमलबजावणी संचालनालयाने २१ मार्च रोजी प्रिव्हेन्शन ऑफ मनी लाँडरिंग कायद्याच्या (पीएमएलए) तरतुदींनुसार कथित अबकारी धोरण घोटाळ्याशी संबंधित प्रकरणात अटक केली होती. त्यानंतर सुप्रीम कोर्टाने त्यांना अंतरिम जामीन मंजूर केला आहे, मात्र सीबीआयने त्यांना याच प्रकरणात अटक केल्यामुळे ते अजूनही तुरुंगात आहेत.

# कन्नडच्या राजकारणाला नवे वळणे ! माजी आमदार नितीन पाटलांचा राष्ट्रवादीत प्रवेश



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.३० जुलै - तालुक्याच्या राजकारणात नवे वळणे मिळाले असून माजी आमदार नितीन पाटील यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश केल्याने तालुक्याच्या राजकारणाला नवे वळण मिळाले आहे

माजी आमदार नितीन पाटील यांनी मुंबई येथील देवगिरी बंगल्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात पक्षप्रवेश केला आहे. या पक्ष प्रवेशाची पुष्टी स्थानिक कार्यकर्त्यांनी केली आहे.

माजी आमदार नितीन पाटील हे औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष राहिले होते त्याच माध्यमातून तालुक्यात दांडगा जनसंपर्क झाला होता पालकमंत्री अब्दुल सत्तार यांचे निकटवर्तीय असलेले नितीन पाटील यांनी अचानक राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या प्रवेश केल्याने विधानसभेच्या दृष्टीने शिवसेना शिंदे गटात चर्चेला उधाण आले आहे, उपतालुका प्रमुख कैलास अकोलकर यांनी सांगितले की आम्ही आगामी काळात कन्नड तालुक्यात मोठा पक्ष प्रवेश सोहळा घेणार आहोत शिवसेनेला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटात प्रवेश करणार असल्याचे सूतोवाच त्यांनी केले शहरातील पिशोर नाक्यावर खरेदी विक्री संघ सभापती सुरेश डोळस , धनराज बेडवाल , राजू चव्हाण , डॉं प्रकाश चव्हाण , विक्रम पाटील , संजय कवडे , आप्पाराव नलावडे आदींसह कार्यकर्त्यांनी आनंद साजरा केला.

**आगामी विधानसभेच्या दृष्टीने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष माझ्या पाठीशी खंबीरपणे उभा असणार आहे,उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दाखवलेला विश्वास सार्थ ठरवू विधानसभेला मोठ्या मताधिक्याने विजयी होऊ**

**– माजी आमदार नितीन पाटील**

**तालुक्याचा राजकारणात आगामी विधानसभेचे चित्र बघता वेगवेगळ्या घटना घडत असल्याने कार्यकर्ते मात्र संभ्रमात आहेत,विधानसभेच्या अनुषंगाने सर्वच पक्षाचे पदाधिकारी मोर्चे बांधणी करत असून कोणाच्या पारड्यात जनतेच्या कौल जाईल हे आगामी काळात स्पष्ट होईल.**

# कौंवडगाव ग्रामपंचायतची मनमानी वयोवृध्द विधवा महिलेला केले बेघर जीसीपी ने पाडले घर - ग्रामपंचायत वर कारवाईची मागणी



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि. २९ जुलै केंद्रातील सरकार गोरगरिबांसाठी पंतप्रधान आवास योजना अंतर्गत गरिबांना पक्के घरकुल योजना राबवत आहे घरकुल योजनेमध्ये पात्र लाभार्थ्यांना घर बांधण्यासाठी जागा नसेल तर शासनाकडून जागा पर्यवस्था करून घरकुल योजना देत आहे तसेच एखादी कुटुंब सहा वर्षापासून शासकीय जागेवरती पक्के घर बांधून राहत असेल तर ते घर पाडण्यात येऊ नये असे आदेश देखील शासनाने दिले असताना सुद्धा एकीकडे विधवा वयोवृध्द महिलेचे ७० वर्षांपासून पक्या घरामध्ये राहत असताना जेसीपी ने घर पाडण्यात आले पैठण तालुक्यातील कौवडगाव येथील रहिवासी सईदा सालार शेख या विधवा वयोवृध्द महिला आपल्या कुटुंबासोबत ७० वर्षांपासून कौवडगाव राहत असून ग्रामपंचायत ने या वयोवृध्द विधवा महिलेला किंवा यांच्या कुटुंबातील सदस्यांना कोणतीही कल्पना केव्हा नोटीस न देता दि. २६ जुलै रोजी रात्री आठ वाजेच्या दरम्यान जेसीपी साह्याने घर पाडण्यात आले या घरामध्ये जीवण आवश्यक वस्तू ची मोडतोड करून संसार उध्वस्त करण्यात आले घर पाडले मटरेल सरपंच यांनी स्वतःच्या मालकी हक्काच्या जाग्यावर घेऊन गेले घर पाडल्याची माहिती समजताच सईदा सालार शेख यांच्या मुलानी फोनवरून ग्रामपंचायत सरपंच यांना माहिती विचारली असता त्यांनी सांगितले तुम्ही येथील रहिवासी नसून तुमचे घ्या सरकारी जागेवर असल्यामुळे तुमचे घर पाडण्यात आले आहे असे अरे कार्याची भाषा वापरून वयोवृद्ध महिलांचे व मुलाचा आपमान केले आहे हे कुटुंब आज रोजी उध्वस्त झाले असून याकडे संबंधित अधिकारी लक्ष घालून या वयोवृद्ध महिलेला घर बांधून देणार का व ग्रामपंचायत वर कारवाई करणार का अशी चर्चा नागरिकात होत आहे.

**वार्तापत्र प्रतिनिधी यांनी सईदा सालार शेख या वयोवृद्ध विधवा महिलेचे घर पाडल्या विषयी ग्रामपंचायत ग्रामसेविका यांना फोन करून विचारले असता त्यांनी सांगितले मला कुठलीही कल्पना नाही आम्ही ग्रामपंचायत ठराव घेतलेला नाही सरपंच यांनी घर पाडण्याचे सांगितले असेल असे उत्तर देण्यात आले.**

## अर्थसंकल्पावरून राहुल गांधींचे सरकारवर टीकास्त्र

नवी दिल्ली, २९ जुलै : केंद्र सरकारने गेल्या आठवड्यात सादर केलेला अर्थसंकल्प केवळ श्रीमंतांसाठी होता. यात गरीब, शेतकरी यांच्यासाठी काहीच नव्हते अशी टीका विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज, सोमवारी लोकसभेत केली. अर्थसंकल्पावरील चर्चेत सहभागी होताना ते बोलत होते.

याप्रसंगी राहुल गांधी म्हणाले की, या अर्थसंकल्पातून शेतकरी, कामगार, महिला, छोटे उद्योजक यांना दिलासा मिळेल अशी अपेक्षा होती. पण तसे झाले नाही. उलट उद्योगविश्वावर एकाधिकारशाही असेलेल्या मोठ्या उद्योजकांच्या फायद्याचे निर्णय घेण्यात आले. शेतकऱ्यांना हमीभावाची खात्री देणाऱ्या कायद्यावरही भाष्य करण्यात आले नाही.



## बिडकीन येथील भगवती विद्यालय मध्ये शिक्षण सप्ताह उपक्रम अंतर्गत विविध कार्यक्रम साजरा



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २८ पैठण तालुक्यातील भगवती विद्यालय, बिडकीन येथे शासनाच्या निर्देशनुसार शिक्षण सप्ताह उपक्रम दिनांक २२ जुलै ते २८ जुलै पर्येत साजरा करण्यात आला. प्रशालेत विविध उपक्रम या निमित्त घेण्यात आले. वृक्षा लंगडी, पोतारेस, संगीतखुर्ची स्पर्धा घेण्यात आल्या आज दि२८ रोजी समुदाय सहभाग दिवसानिमित्त मुख्याध्यापक एकनाथ राशींनकर सर यांच्या वतीने सर्व विद्यार्थी शिक्षक, शिक्षेतर कर्मचारी यांनी स्नेहभोजनाचा आनंद घेतला.या प्रसंगी खुशाल चव्हाणं, रामनाथ धनवे, रायभान रक्ते, श्रीधर जऱ्हाड, सुनील पवार, अप्पा किसवे, श्रीम विश्रांती सलगरे, सुभाष राठोड, अशोक डूबे, आशुतोष झारगड उपस्थित होते.

## बिडकीन येथील भगवती विद्यालय मध्ये इकोक्लब समिती स्थापन



बिडकीन दि २९ पैठण तालुक्यातील भगवती विद्यालय, बिडकीन येथेशासनाच्या उपक्रमा अंतर्गत दि २७ जुलै रोजी शालेय इकोक्लब समितीची स्थापना करण्यात आली. या क्लबचे अध्यक्ष मुख्याध्यापक एकनाथ राशींनकर हे असून समन्वयेक म्हणून रामनाथ धनवे सर यांची निवड करण्यात आली. या समिती अंतर्गत आज प्रशालेत वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थी - माता यांनी वृक्षश्ररोपण केले. ऊर्जासंवर्धन, घनकचरा निवारण, जल संवर्धन, वृक्षसंवर्धन उपसमित्या विद्यार्त्यांच्या स्थापन करण्यात आल्या. मुख्याध्यापक यांनी पर्यवारणाचे महत्व समजून सांगितले व सर्वांनी झाडांचे पोषण व निगा राखण्याची शपथ घेतली. या प्रसंगी माता पालक विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यशस्वीतेसाठी खुशाल चव्हाण, रायभान रक्ते, श्रीधर जऱ्हाड, सुनील पवार, अप्पा किसवे, विश्रांती सलगरे, अशोक डूबे, सुभाष राठोड, अशुतोष झारगड उपस्थित होते.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे शिक्षण सप्ताह साजरा



सोयगाव,दि.२९ जुलै : केंद्रशासन निर्देशानुसार संपूर्ण देशात दि.२२ जुलै ते दि.२८ जुलै २०२४ दरम्यान शिक्षण सप्ताह उपक्रमाचे आयोजन करण्यात आले या निर्देशानुसार सोयगांव केंद्राचे केंद्र प्रमुख यांच्या मार्गदर्शना खाली जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे शिक्षण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते त्यात अध्ययन अध्यापन साहीत्य दिवस,मुलभूत संख्याज्ञान व साक्षरता दिवस,क्रिडा दिवस,सांस्कृतिक दिवस,कौशल्य व डिजीटल उपक्रम दिवस,मिशल लाईफच्या दृष्टीक्षेपात इको क्लब उपक्रम,समुदाय सहभाग उपक्रम घेण्यात आले.या शिक्षण सप्ताहाची समाप्ती दि.२८ जुलै रोजी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष,उपाध्यक्ष, सदस्य यांच्या अनमोल सहकार्याने विद्यार्थ्यांना मिष्ठान भोजनाचे आयोजन करून सांगता करण्यात आली.यासाठी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष मनोज आगे,उपाध्यक्ष वैशाली पवार,सदस्य राजू माळी,योगेश बोखारे,शंकर जेठे,शरद पवार,एकनाथ इंगळे,नगरसेवक गजानन कुडके,दत्तात्रय जोहरे यांच्यासह पालकांचे सहकार्य लाभले तर उपक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,सहशिक्षक गोपाल चौधरी,मनिषा जेठे यांनी परिश्रम घेतले.

## आषाढी एकादशीनिमित्त सोयगाव शहरातील श्री स्वामी समर्थ मंदिर,भैरवनाथ मंदिर येथे वृक्ष लागवड



सोयगाव,दि.२९ जुलै : देवशयनी आषाढी एकादशी निमित्त सोयगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील स.न.१९९९ ते २००० या शैक्षणिक वर्षातील वर्गमित्र यांच्याकडून सोयगाव शहरातील श्री स्वामी समर्थ मंदिर दयाळनगर येथे प्रत्येकी एक झाड असे मिळून १५ ते २० झाडे श्री स्वामी समर्थ मंदिर येथे शालेय मित्र यांनी साफसफाई करून वृक्ष लागवड केले.श्री स्वामी समर्थ मंदिर दयाळनगर येथे नारळ,जांभूळ,पेरू,असे झाडे लावून प्रत्येकांनी आपल्या घरासमोर एक झाड लावा असे नागरिकांना आवाहन केले.तसेच सोयगाव शहरातील जागृत देवस्थान भैरवनाथ मंदिर येथे जाऊन सुद्धा शालेय मित्र मंडळ यांनी भैरवनाथ मंदिर येथे एक नारळाचे झाड लावून प्रत्येकांनी आपल्या दारी एक झाड लावा ही संकल्प सुरू केली.यावेळी गणेश आगे,संजय कासार,योगेश बोखारे,बापू म्हस्के,प्रमोद तायडे,राजू इंगळे,देवेंद्र तेलंगे,दिलीप तायडे,रमेश राठोड,शंकर काळे,विनोद सोहनी,रुषीकेश काळे,शांताराम ढमाले,राजेंद्र बागुल आदींसह मित्रपरिवार उपस्थित होते.

## विश्वास वर्ल्ड टेक प्रायव्हेट लिमिटेडने विश्वस्पे प आणि विश्वास वर्ल्ड मार्ट ई-कॉमर्स लाँच केले

मुंबई - विश्वास वर्ल्ड टेक प्रायव्हेट लिमिटेड, बेंगळुरू स्थित नवीन उपक्रमाने दोन नवीन प्लॅटफॉर्म लाँच करून डिजिटल लँडस्केपमध्ये क्रांती केली आहे: विश्वासस्पे प आणि विश्वास वर्ल्ड मार्ट ई-कॉमर्स.२७ जुलै रोजी शेरेटन ग्रँड येथे श्री विनय गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली बहुप्रतिक्षित प्रक्षेपण कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला प्रसिद्ध अभिनेते प्रेम, रंजनी राघवन, कोमल कुमार आणि अनेक नामवंत व्यक्तीही उपस्थित होत्या.

# कामगारांच्या घामावर ठेकेदार मालामाल

वाळुज महानगर : केंद्र सरकारने कामगारांसाठीचे नविन कायदे अमलात आणल्यामुळे उद्योगनगरीच्या औद्योगिक पट्ट्यात काम करणाऱ्या संघटीत कामगारांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. कामगारांच्या हिताचे कायदे मोडीत काढून केंद्र सरकारच्या कायदा मंत्रालयाने कामगारांचे हक्क हिरावून घेतले आहेत. यामुळे कामगारांना अनेक फायद्यांना रोख लागला आहे. त्यामुळे कष्टाच्या हिम्मतीवर देशाच्या विकासाची पायाभरणी करणारा कष्टकरी कामगार योध्दा दडपशाहीपुढे हतबल झाला आहे तर दुसरीकडे ठेकेदारांच्या हम करो सो कायद्यामुळे भरडून निघत असून कामगारांच्या घामावर ठेकेदार मालामाल होत असल्याचा धक्कादायक प्रकार उद्योग नगरीत घडत आहे.

केंद्र सरकारने कामगारांचे हित साध्य करणारे अनेक कल्याणकारी कायदे रद्द करून सुधारित व्हेज कोड' आमलात आणले. हे चारही व्हेज कोड भांडवलदारांचे हित साधणारे आहेत. त्यानुसार कंपन्यांमध्ये कंत्राटी पध्दत लागू करणे, कामगारहिताच्या योजना कंपनी स्तरावर राबविणे, कंपनी अधीन कामगार भरती करणे, संघटना मान्यता कामगार कंपनीच्या अधीन ठेवणे अशा तरतुदी नव्या कायद्यांमध्ये आहेत. ऑटोमोबाईल, आयटी, मॅन्युफॅक्चरिंग, औद्योगिक, सेवा अशा सर्वच क्षेत्रातील कामगारांना हा कायदा लागू आहे.

या कायद्यांचाच आधार घेत वाळूज औद्योगिक नगरीत ठेकेदारी पद्धतीने पुरते घेरले असून , कामगारांची मोठ्या प्रमाणात पिळवणूक सुरू आहे . कारखानदार नविन कामगार कायद्यानुसार कातडी बचाव धोरण राबवित असून ठेकेदार त्याचा फायदा उचलत आहेत. जवळपास सर्वच कारखान्यांमध्ये ठेकेदारी पद्धत जोरात असून, ठेकेदार कामगारांना कामगार कायद्यानुसार वेतन न देता प्रत्येक कामगारांच्या दिवस भराच्या वेतनामध्ये सर्रास कपात करून स्वतःचे खिसे गरम करत आहेत. जर कारखानदार प्रत्येक कामगाराला ७०० रुपये हजेरी देत असेल तर ठेकेदार कामगाराला ५०० रुपये ठरवून वरील २०० रुपयांवर ठल्ला मारत असून कामगारांच्या घामावर ठेकेदार गब्बर होत आहेत.

म्हणजे प्रत्येक ठेकेदार दिवसासाठी काहीही काम न करता बक्कळ पैसा कमवून मालामाल होत आहेत. तर कामगार मात्र भरडल्या जात आहे. अनेक ठेकेदारांचे उत्पन्न एखाद्या कार्पोरेट कंपनीलाही लाजवेल असे असल्याचे एका ठेकेदाराने नाव न छापायच्या अटीवर सांगितले.. बहुतांश कंपन्यांमध्ये कामगारांना कोणत्याच सुविधा मिळत नसल्याचेही आढळून आले. यामध्ये पीएफ पीएसआय अपघात विमा आधी सर्व सुविधा गेल्या कित्येक वर्षांपासून मिळत नसल्याचे आढळून आले या कंपनीकडे कामगार उपयुक्त तसेच पीएफ व ईएसआय कार्यालयातील अधिकारी दुर्लक्ष कसे काय करतात हे एक न उलगडणारे कोडे आहे. या सर्व प्रकरणाकडे मात्र कामगार उपायुक्त यांचा कानाडोळा असल्याचे दिसून येत आहे.

ठराविक ठेकेदारांनाच ठेका

परिसरातील बऱ्याच कारखान्यात ठराविक ठेकेदारांना ठेकेदारी देण्याची मनमानी मोठ्या कारखान्यातील उच्च पदस्थ अधिकारी करीत आहे त्यामुळे ठेकेदार आणि कार्यकारी अधिकारी यांचे आर्थिक संबंध असल्याने नियमाला हरताळ पासूनमला एक ठेकेदारच अनेक कारखान्यात ठेकेदारी करत असल्याचा धक्कादायक प्रकार अनेक कारखान्यात सुरू आहे. ठेकेदाराकडे अनेक कारखान्याचे ठेके असल्यामुळे कामगारांनाही दुय्यम वागणूक मिळते काम करायचे असेल तर ठेकेदारांनी ठरवून दिलेल्या नियमानुसार करायचे नाही तर सरळ घरचा रस्ता धरायचा असा अलिखित नियमच काही ठेकेदारांनी केलेला आहे.

या विरोधात आवाज उठवणारा कामगार एक तर बेरोजगार होतो नाहीतर त्याला पसारा गुंडाळून गावाचा रस्ता धरावा लागतो.

# सामूहिक प्रयत्नांतून विषाणूजन्य आजारांवर नियंत्रण मिळवणे शक्य : डॉ अनिल बोरगे

अहमदनगर : झिका, डेंग्यू यासारख्या विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आपला परिसर स्वच्छ ठेवून डास उत्पत्ती करणारी स्थाने नष्ट करणे आवश्यक आहे. त्यासाठी लोकसहभाग तसेच महापालिका प्रशासन यांच्या सामूहिक प्रयत्नांतून विषाणूजन्य आजारांवर नियंत्रण मिळवता येईल असे प्रतिपादन महापालिका वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.अनिल बोरगे यांनी केले. झिका, डेंग्यू आदी विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी एक तास स्वच्छतेचा हा उपक्रम दर रविवारी राबवण्यासाठी नागरिकांना आवाहन केले होते. त्यानुसार महापालिकेच्यावतीने केडगाव उपनगरामध्ये जनजागृती मोहीम राबविण्यात आली. त्यावेळी डॉ. बोरगे यांनी नागरिकांना मार्गदर्शन केले.

एडिस डासामुळे विषाणूजन्य आजार पसरतात. एडीस डास हा आपल्या परिसरात स्वच्छ पाण्यात वाढत असल्याने आपल्या जवळपास कोणत्याही प्रकारचे पाणी साचू देऊ नये. फ्रीजचे ट्रे, कुंड्या, पक्षांना पिण्यासाठी ठेवलेले पाण्याचे भांडे, जुने टायर भंगार वस्तू इत्यादी ठिकाणी साचणारे पाणी वाहते करून ही डास उत्पत्ती करणारी स्थाने नष्ट केल्यास विषाणूजन्य आजारांना रोखता येईल. त्यासाठी महापालिका प्रशासन प्रयत्न करीत आहे. यामध्ये नागरिकांचा सहभाग देखील महत्त्वाचा असल्याचे यावेळी डॉ बोरगे यांनी सांगितले.

महापालिका आरोग्य विभागाने आयोजित केलेल्या या जनजागृती कार्यक्रमास केडगाव उपनगरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन आपापल्या परिसरातील डास उत्पत्ती निर्माण करणारी स्थाने नष्ट केली. आयुक्त यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनानुसार अहमदनगर शहरातील सर्व भागांमध्ये नागरिक स्वयंप्रेरणेने डेंग्यू विरोधी जनजागृती मोहिमेत सहभागी होऊन त्यासाठी आवश्यक असलेल्या उपायोजना करीत आहेत. त्यामुळे विषाणूजन्य आजारांवर आपण सर्व निश्चितच नियंत्रण मिळवू असा विश्वास डॉ. अनिल बोरगे यांनी यावेळी व्यक्त केला.

# सारोळा ते आमदाबाद फाटा रस्त्याची दुरावस्था

## बांधकाम विभाग व लोकप्रतिनिधीचे दुर्लक्ष, नागरिकांमध्ये संताप

तभा वृत्तसेवा

नाचनवेल : दि.२९. जुलै- कन्नड तालुक्यातील सारोळा, आमदाबाद, नाचनवेल ग्रामीण मार्ग रस्ता क्रमांक (७४) असून या रस्त्याची आमदाबाद फाटा ते सारोळा रस्त्यात पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहनधारक, विद्यार्थ्यांचे हाल होत आहे .ग्रामीण भागातील जिकडे तिकडे रस्त्याच्या दुरावस्था झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. रस्त्यात खड्ड्याचे साम्राज्य निर्माण झाल्याने त्याला तलावाचे स्वरूप निर्माण झाले आहे त्यामुळे वाहन चालकांना रस्त्याचा अंदाज लागत नसल्याने छोटे-मोठे अपघात मोठ्या प्रमाणावर होत आहे. शालेय विद्यार्थी, वाहनधारक ,व्यावसायिक यांना तारेवरची कसरत करत जीवघेणा प्रवास



करावा लागत असल्याने नागरिक तीव्र संताप व्यक्त करीत आहे.

मात्र याकडे बांधकाम विभाग व लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष होत असल्याचे मत नागरिक व्यक्त करीत आहे. या रस्त्याचे सन २००९ मध्ये पुनर्बांधणीचे काम झाले होते त्यानंतर आज पर्यंत पंधरा वर्षे होऊन गेली तरीदेखील याकडे राजकीय पुढारी व प्रशासनाचे दुर्लक्ष झालेले आहे त्यामुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले आहे. नागरिकांना अत्यावश्यक सेवा सुविधांसाठी नाचनवेल येथे यावे लागते . निवडणुका जवळ आल्या की मतदानासाठी गावभेटी सुरू होतात, प्रचार करतात, मतदान मागायला येतात मात्र मुख्य समस्यांकडे सर्वांचे दुर्लक्ष होते. लोकप्रतिनिधी देखील याला मोठ्या प्रमाणावर जबाबदार असल्याचे मत सर्वसामान्य नागरिक व्यक्त करीत आहे. सारोळा ते आमदाबाद फाटा रस्त्याचे काम तत्काळ सुरू करण्यात यावे अशी मागणी ग्रामस्थ ,सरपंच यांनी केली आहे.

# २ ऑगस्टला प्रेक्षकांच्या भेटीला येणार 'बाबू'

छत्रपती संभाजीनगर : बाबू नाय, बाबू शेठ म्हणत, अस्सल कोळी भाषेचा जलवा दाखवणारा स्टायलिश 'बाबू' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला असून ट्रेलर पाहून प्रेक्षकांची 'बाबू'विषयीची उत्सुकता अधिकच वाढली आहे. यात 'बाबू'च्या आयुष्यातील प्रेम, शत्रु आणि सूडभावना, जबरदस्त क्शन दिसत आहे. त्याच्या आयुष्यात नेमके काय होते, हे जाणून घेण्यासाठी प्रेक्षकांना हा चित्रपट पाहावा लागेल.


चित्रपटाबद्दल दिग्दर्शक मयूर शिंदे म्हणतात, मराठीत पहिल्यांदाच असा आगरी कोळी भाषेचा झणझणीपणा अनुभवायला मिळणार आहे. ९०च्या दशकातील ही कथा प्रेक्षकांना नोस्टॅल्जिक करणारी आहे तर तरूणाईला जुन्या काळातील प्रेमाचा अंदाज दाखवणारा हा चित्रपट आहे. यात प्रेम, मैत्री, दुरावा, शत्रुत्व, बदला, क्शन अशा सगळ्याच गोष्टी आहेत. त्यामुळे मनोरंजनाचे हे एक परिपूर्ण पॅकेज आहे.''


श्री समर्थ कृपा प्रोडक्शन प्रस्तुत 'बाबू' या चित्रपटाची निर्मिती सुनीता बाबू भोईर यांनी केली आहे. तर या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शनाची धुरा मयूर मधुकर शिंदे यांनी सांभाळली आहे. अंकित मोहन, नेहा महाजन, रुचिरा जाधव, स्मिता तांबे , संजय खापरे, श्रीकांत यादव यांच्या या चित्रपटात प्रमुख भूमिका असून येत्या २ ागस्टला 'बाबू' प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# आचार्य गुप्तीनंदीजी गुरुदेव यांच्या सानिध्यात धर्मतिर्थ क्षेत्रावर शिलान्यास समारोह व ५२ वर्धनोत्सवाचे आयोजन

## शहराच्या विविध भागातुन मोफत बसेसची व्यवस्था

छत्रपती संभाजीनगर : परमपुज्य गनाधीपती गनधराचार्य कुंथूसागरजी महाराज यांच्या उपवनातील सुगंधित पुष्प प्रज्ञायोगी दिगंबर जैनाचार्य गुप्तीनंदीजी गुरुदेव यांच्या सानिध्यात दिनांक ३१ जुलै २०२४ रोजी कचनेर जवळील श्रीक्षेत्र धर्मतिर्थ येथे यात्रेकरूसाठी धर्मतिर्थ यात्रीनिवासचे शिलान्यास समारोह व अचार्य गुप्तीनंदीजी गुरुदेव यांच्या ५२ व्या वर्धे नोत्साचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वप्रथम सकाळी ७.०० वाजता भगवंताचा पंचामृत अभिषेक, आहारचर्या होणार






आहे.

तदनंतर आचार्य गुप्तीनंदीजी गुरुदेव यांच्या सानिध्यात शिलान्यास समारोह होणार आहे, यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणुन भट्टारक श्री. धर्मसेन महास्वामी वरुर, भट्टारक श्री. अंकलंक स्वामी सौदामठ, भट्टारक श्री. लक्ष्मीसेनजी स्वामी कोल्हापूर मठ यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच मुख्य शिलान्यास हा प्रमोद, संजय, शेखर, आनंद, धनावत जैन परिवार बाराबंकी, अशोक, सुमीत, विकुंज जैनपरिवार हैद्राबाद, रविंद्र विरधवल पाटील परिवार नाशिक, संजीव कुमारजी जवेरी परिवार मुंबई, सुभाषचंद, पंकज, दिपक, धीरज कासलीवाल परिवार विवाहमांडवावाला हे लाभले आहेत. तसेच यावेळी उपस्थित भाविकांना छत्रपती संभाजीनगर येथील गुलाबचंदजी, सुनिलकुमार, अनिलकुमार कासलीवाल परिवार भांबेरीवाला बालाजीनगर यांच्यावतीने महाप्रसाद देण्यात येणार आहे.

या महोत्वासाठी राजाबाजार, अरिहंतनगर, बालाजी नगर, देशमुख नगर, सिडको, हडको, छावणी आदी ठिकाणाहुन मोफत बसेस ठेवण्यात आलेल्या आहेत, या बसेस सकाळी ७.३० वाजता निघणार आहेत, तरी समाजबांधवानी वरील कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष चंद्रशेखर पाटणी, वरिष्ठ उपाध्यक्ष संजय पापडीवाल, उपाध्यक्ष राजेंद्र पाटणी, महामंत्री पवन पापडीवाल, सहमंत्री डॉ. सतिष लोहाडे, कोषाध्यक्ष गुलाबचंद कासलीवाल व धर्मतिर्थ क्षेत्रा विकास समिती च्या वतीने करण्यात आले आहे.

## सोयगाव; संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. संस्कृती वानखडे हिचे तेलंगणा येथे उत्कृष्ट कामगिरी



सोयगाव,दि.२९ जुलै : तेलंगणा स्टेट चेस असोसिएशन आणि ऑल इंडिया चेस फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रगती चेस कॅडमी प्रायोजित श्री.रुद्रराजू नरसिम्हा मूर्ती राजू मेमोरियल इंटरनॅशनल ओपन फिडे रेटेड रॅपिड चेस टूर्नामेंट ही स्पर्धा हैद्राबाद येथे दि.२७ ते २८ जुलै २०२४ या दरम्यान संपन्न झाली.ह्या स्पर्धेत संस्कृती वानखडे हीने सहभाग घेऊन उत्कृष्ट कामगिरी केली.सदर ओपन स्पर्धेत तिने चौथा क्रमांक पटकावला असून तिला ट्रॉफी व २०,०००/- (वीस हजार रुपये) प्रदान करण्यात आले. या स्पर्धेत एकूण नऊ राऊंड खेळण्यात आले.संस्कृतीने त्यापैकी आठ डाव जिंकले असून तिला एका डावात हार पत्करावी लागली.तिने या स्पर्धेत १०४ गुणांची कमाई केली.संस्कृतीने देविनेनी श्रीमन,तन्मय लोहूमी,रामा लक्षमणा रेड्डी किलूमू,सानिकोम्मू जयदीप रेड्डी,साई डूगारी साई तेज,ज्ञाना साई संतोष एम.,लक्ष्मी चरण नायडू जी., रामा अंजानेयुलू आर.व्ही.एस.एस.यांना पराभूत केले तर राघव श्रीवास्तव व्ही.ह्याचेसोबत पराभूत व्हावे लागले.

या यशाबद्दल अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ नाना काळे,सचिव प्रकाश काळे,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार,उपप्राचार्य रावसाहेब बारोटे,क्रीडा विभागप्रमुख डॉ.निलेश गाडेकर,डॉ.भास्कर टेकाळे,प्रोफेसर दिलीप बिरुटे,आदींनी विधार्थिनींचे अभिनंदन केले.



**कार्यालय हिंगोली नगर परिषद हिंगोली, जि.हिंगोली**

फोन नं. (०२४५६) २२१७२७, फैक्स नं. (०२४५६) २२१७२७,
E-Mail-coud.hingoli@maharashtra.gov.in
विभाग :- बांधकाम विभाग, जा.क्र./न.पा./२३०७/२०२४-२५, दिनांक २९/७/२०२४

**ई-निविदा कार्यप्रणाली अंतर्गत निविदा सुचना सन २०२४-२५**

मुख्याधिकारी नगर परिषद हिंगोली तर्फे (दुरध्वनी क्र. ०२४५६-२२१७२७ ई-मेल coud.hingoli@maharashtra.gov.in नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन हिंगोली शहरामध्ये सी.सी. रस्त्याचे कामाकरिता ई-निविदा प्रणालीद्वारे दिनांक ६/०८/२०२४ रोजी दुपारी ५.०० वाजे पर्यत निविदा मागवित आहेत. निविदा विषयी तपशिल महाराष्ट्र शासनाच्या ई-टेंडरींग पोर्टल http://mahatenders.gov.inda दि. ३०/०७/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून संपुर्ण माहिति व अटी व शर्तीसह पहावयास मिळेल.

नगर अभियंता
हिंगोली नगरपरिषद हिंगोली

मुख्याधिकारी
हिंगोली नगरपरिषद हिंगोली

**जाहिर प्रगटन**

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर जि.छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए.क. २९९/२०२४

अर्जदार : १. इंदूबाई भ्र. वसंत शिंदे, रा. नांदेडा २. विजय पि. वसंतराव शिंदे, रा. बजाजनगर, ३. रेखा भ्र. भगवान खेडकर, रा. बुट्टेवाडगाव

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टप्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी मयत वसंतराव शेकू शिंदे यांचे वारस असल्याबाबत प्रकरण या मा. न्यायालयात त्यांचे विधीज्ञ अविनाश चव्हाण यांच्या मार्फत दाखल केला असून अर्जदारांनी अर्जात नमूद केले आहे की, अर्जदार क. १ चे पती व अर्जदार नं २ ते ३ चे वडील मयत वसंतराव शेकू शिंदे हे. दि. १७/०८/२०२३ रोजी एकलहेरा ता. गंगापूर येथे मयत झालेली आहे. मयत वसंतराव शेकू शिंदे यांना अर्जदारांशिवाय इतर कुणीही वारसदार नाही. अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर प्रमाणपत्राची अवश्कता आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार हे मयत वसंतराव शेकू शिंदे यांचे कायदेशीर वारसदार आहे व त्याप्रमाणे त्याचे वारस असल्याचे प्रमाणपत्र अर्जदारांचे हक्कात जारी करण्यात यावे अशी मागणी केलेली आहे. तरी सदरील मागणीस कुणाचा काही आक्षेप उजर असल्यास सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा आपल्या विधीज्ञामार्फत न्यायालयात आक्षेप नोंदवावा मुदतीत आक्षेप न असल्यास न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी अर्जात मागणी केल्याप्रमाणे आदेश पारित करेल. पुढील ता. दि.२८/०८/२०२४

आदेशावरून
सहायक अधिक्षक
न्यायलय गंगापूर ता. गंगापूर

**जाहिर प्रगटन**

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगरे**

सिव्हिल एम.ए.क. ३०४/२०२४

अर्जदार : १. हिराबाई भ्र. कृष्णा शिंदे, वय ५४ वर्षे, धंदा-शेती, २. मनोहर पि. कृष्णा शिंदे, वय ४१ वर्षे, धंदा-शेती, ३. दिनेश पि. किसनराव शिंदे, वय ३८ वर्षे, धंदा-शेती, ४. विकास पि. किसनराव शिंदे, वय ३४ वर्षे, धंदा-शेती, सर्व रा. शहापूर, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टप्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदारांनी मयत कृष्णराव कचरू शिंदे यांचे वारस असल्याबाबत प्रकरण या मा. न्यायालयात त्यांचे विधीज्ञ अविनाश चव्हाण यांच्या मार्फत दाखल केला असून अर्जदारांनी अर्जात नमूद केले आहे की, अर्जदार क. १ हि अर्जदार क. २ ते ४ यांची आई असून अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ ते ४ यांचे वडिल नामे कृष्णराव कचरू शिंदे हे दि. १८/११/२०२१ रोजी शहापूर ता. गंगापूर येथे मयत झालेले आहे. मयत कृष्णराव कचरू शिंदे यांना अर्जदारांशिवाय इतर कुणीही वारसदार नाही.

त्याअर्थी तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांनी त्यांच्या अर्जात नमूद केले आहे की, अर्जदार हे मयत कृष्णराव कचरू शिंदे यांचे कायदेशीर वारसदार आहे व त्याप्रमाणे त्याचे वारस असल्याचे प्रमाणपत्र अर्जदारांचे हक्कात जारी करण्यात यावे अशी मागणी केलेली आहे. तरी सदरील मागणीस कुणाचा काही आक्षेप उजर असल्यास सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा आपल्या विधीज्ञामार्फत न्यायालयात आक्षेप नोंदवावा मुदतीत आक्षेप न असल्यास न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी अर्जात मागणी केल्याप्रमाणे आदेश पारित करेल. पु. ता. ३/९/२४

आदेशावरून
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापूर

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२३/२०२३ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : १०-०५-२०२३

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, **मनिषा शंकर जेठे** यांनी मोहल्ला सोनसवाडी वार्ड क्र. १६ स.नं.----- मधील प्लॉट / घर क्रमांक १३८७ त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

पूर्व : शे. जाकीर शे. समद यांची जागा — पश्चिम : गावठाण अंतर्गत वापराचा रस्ता
दक्षिण : मिळकत नं. १३८८ ची जागा. — उत्तर : मिळकत नं. १३८८ ची जागा.
आकार : पूर्व पश्चिम २०×४० = ८०० दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबातच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२३/२०२३ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : १०-०५-२०२३

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, **आकाश सुरेश नन्वरे** यांनी मोहल्ला वार्ड क. १६ स.नं.----- मधील प्लॉट / घर क्रमांक -- त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

पूर्व : शे. जाकीर शे. समद यांची जागा — पश्चिम : गावठाण अंतर्गत वापराची जागा,
दक्षिण : मिळकत नं. १३८९ ची जागा. — उत्तर : मिळकत नं. १३८७ ची जागा.
आकार : पूर्व पश्चिम २०×४० = ८०० दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबातच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...



### गुळहळी येथे माझी लाडकी बहीण योजनेचे १०० टक्के फॉर्म भरण्याचे काम पूर्ण

**इटकळ, दि.२९ जुलै -**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना धाराशिव जिल्हात प्रथम गुळहळळी येथे १३८ पात्र महिलांचे अर्ज घेऊन ऑनलाइन भरले आहे त्यामुळे गुळहळळी हे गाव १०० टक्के काम पूर्ण झालेले आहे. हे सर्व अर्ज तुळजापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अमोल ताकभाते व महिला बालकल्याण विकास प्रकल्प अधिकारी किशोर गोरे यांना सर्व ऑनलाइन केलेले पात्र महिलांचे अर्ज त्यांना देण्यात आले. मतदार यादी प्रमाणे एकूण-४१४ महिला आहेत. यामध्ये स्थलांतरीत-१२०, ऑनलाइन अर्ज भरलेले-१३५, अपात्र-५२, पात्र पण कागदपत्र कमी असलेले व अर्ज न भरलेले-१८, वय २१ पेक्षा कमी व ६५ पेक्षा जास्त असलेले-५८, इतर पगार चालू असलेले-२७ अशी महिलांची-४१४ महिला आहेत, अशा प्रकारे गुळहळळी येथिल सर्व महिलांचे एक्सेल शीटमध्ये डाटा ऑनलाइन भरुन वरील अधिकारी यांना देण्यात आला. अर्ज भरण्याचे श्रेय भाजपा सोशल मिडियाचे जिल्हा संयोजक मा सचिन घोडके यांना जाते. अर्ज भरण्यासाठी पर्यवेक्षक सुषमा खरात, तलाठी रेश्मा पाटील, ग्रामसेवक सचिन राठोड, संगणक चालक दत्ता निकम यांचे खूप सहकार्य झाले. अमोल ताकभाते, किशोर गोरे आणि सर्व अधिकारी यांनी सचिन घोडके व त्यांच्या टिमचे हार्दिक अभिनंदन केले. तालुक्यात १०० टक्के प्राप्त अर्जात १०० टक्के ऑनलाइन गुळहळळी हे गाव झाले असे सांगितले. यावेळी किशोर गोरे, सचिन घोडके, अंगणवाडी सेविका सुमन हलकंबे उपस्थित होते.

### त्या भगिनींच्या न्यायासाठी मार्चमध्ये सहभागी व्हा: ॲड रणखांब

**धाराशिव, दि.२९ जुलै -**

धाराशिव दि.२९ (प्रतिनिधी) - नवी मुंबई व उरण येथे दोन महिलांवर बलात्कार करून त्यांची निर्घृणपणे हत्या करून अतिशय क्रूर कृत्य केले आहे. हा खटला अति जलद न्यायालयासमोर चालवून त्या भगिनींना न्याय मिळावा. तसेच त्या सर्व आरोपी नराधमांना फाशीची शिक्षा व्हावी, या मागणीसाठी जिल्हा विधिज्ञ मंडळाच्यावतीने कॅंडल मार्चचे आयोजन दि.३० जुलै रोजी करण्यात आले आहे. या मार्चमध्ये सर्व विधिज्ञ व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्त्या ॲड. भाग्यश्री रणखांब यांनी केले आहे.




### नवोदय विद्यालयात जनजागृती रॅलीने शिक्षण सप्ताहाची समाप्ती

**धाराशिव, दि.२९ जुलै -**

पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २020 (एनईपी २020) चौथा वर्धापना दिनानिमित्त २२ जुलै ते २८ जुलैपर्यंत शिक्षण सप्ताह साजरा करण्यात आला. सप्ताह निमित्त सप्ताह भरात वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दि.रविवार २८ जुलै रोजी नवोदय विद्यालय, गोलाई चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, दीपक चौक, भवानी रोड या मार्गे जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये स्काऊट गाईड, एनसीसीचे विद्यार्थ्यांचा विशेष सहभाग होता. या रॅलीतून शिक्षणासंदर्भात वेगवेगळ्या घोषणा, पथनाट्य सादर करण्यात आली. पथ नाट्यातून मोबाईलचे दुष्परिणाम, बेटी बचाओ, बेटी-पढाओ, महिला सशक्तिकरण, स्वच्छता अभियान, मुलगा मुलगी एक समान, पोस्टर, मेकिंग, साईश शिंदे व प्रज्वल नरहिरे या विद्यार्थ्यांनी नवीन शैक्षणिक धोरण या संदर्भात आपले विचार ही व्यक्त केले. या रॅलीमध्ये जवळपास १७0 विद्यार्थी विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. अशा वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानाचा मुख्य उद्देश नवीन शैक्षणिक धोरण २०-२० अंमलबजावणी बाबत जनजागृती करणे हा आहे. या कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयाचे प्राचार्य के. वाय. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या रॅलीसाठी एस.डी.खोब्रागडे, एस.एस.माने, प्रमोद खरबास, यश पाटील, डी एस.देशमुख, व्ही.एस.जाधव, एस.आर अलसेट, आर.एम.अलसेट, एच.जी.जाधव यांनी विशेष पुढाकार घेतला होता.

### निराधार योजनेच्या लाभार्थींनी आधार अपडेट करुन घ्यावे: तहसिलदार गोविंद येरमे

**उमरगा, दि.२९ जुलै -**

संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रवणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेतील लाभार्थी यांना महाडीबीटी पोर्टलद्वारे अर्थसहाय्य वितरण करणे बाबत सुचीतत केलेले आहे. त्यानुसार उमरगा तालुक्यातील लाभार्थ्यांची माहिती महा-डीबीटी पोर्टलवर भरण्यात येत असुन सदरील लाभार्थ्यांचे आधारकार्ड अद्यावत नसल्यामुळे झरपवळपस ींश्रळवरींळेप मध्ये दिसुन येत आहे. त्यामुळे भविष्यात संबंधीत लाभार्थी यांना अर्थसहाय्य वितरण करण्यास अडचण निर्माण होवु शकते. त्यामुळे अशा लाभार्थ्यांनी आधार अपडेट करून घेण्याचे आवाहन तहसिलदार गोविंद येरमे यांनी केले आहे. उमरग्यातील नगर परिषद, बलसुर, मुरूम, येणेगुर, तुरोरी, आलुर, सुंदरवाडी आदी ठिकाणी या योजनेसाठी शासनाचे अधिकृत केंद्रे असुन आधारकार्ड केंद्रातील सर्व केंद्रधारकांना रविवारी व शासकीय सुट्टीच्या दिवशी विशेष बाब म्हणुन संबंधीत योजनेतील लामार्थी यांचे आधारकार्ड अद्यावत करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना विनंती केली असुन आधार केंद्र चालु ठेवुन लाभार्थ्यांचे आधार नोंदणी करण्यासाठी सांगण्यात आले आहे.

**नळदुर्ग, दि.२९ जुलै -**

राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाअंतर्गत सहा बचत गटांना ५0 लाख रुपयांचे कर्ज वितरण करण्यात आले. स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या मार्फत जय मल्हार महिला बचत गट १0 लाख रुपये,कल्पराज महिला बचत गट १0 लाख रुपये,जिजामाता महिला बचत गट १0 लाख रुपये, पंचशीला महिला बचत गट १0 लाख रुपये, भीमाई महिला बचत गट ५ लाख रुपये व विजयालक्ष्मी महिला बचत गट ५ लाख रुपये असे एकुण ५0 लाख रुपयांचे कर्ज वितरण करण्यात आले आहे.

# आरक्षणाला राजकीयच प्रश्न राहु द्या; त्याला सामाजिक वास लागू देऊ नका

## धाराशिव जिल्ह्यातील भूम येथे आरक्षण बचाव यात्रेत ॲड.प्रकाश आंबेडकर यांचे प्रतिपादन...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ जुलै-**

ओ.बी.सी., एस.सी., एस.टी., आरक्षण बचाव यात्रा ही कोणाच्या विरोधात नाही. आपल्याला कोणाचा हक्क हिसकावून घ्यायचा नाही. हा आपला हक्क आहे. आपल्या हक्कासाठी आपला लढा उभारलेला आहे. आजच्या परस्थितीला ओबीसींचे मिळालेले आरक्षण टिकवणे हेच मोठे आव्हान आहे. माझ्या मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत अनेक बैठका व चर्चा झाल्या आहेत. त्या त्या वेळी मी त्यांना हेच समजावत आलो आहे की, ज्यांचा तुम्ही प्रश्न मांडताय तो रास्त असला तरी तो मांडण्याची पद्धत चुकीची आहे, असे जरांगे यांना सांगितले असल्याचे वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले. ते भूम येथे आयोजित ओ.बी. सी., एस.सी., एस.टी. आरक्षण बचाव रॅलीदरम्यान उपस्थिती जनसमुदायाला संबोधित करताना बोलत होते.

यावेळी म्हणाले कि, महाराष्ट्र राज्याची १९८0 साली लोकसंख्या ७ कोटी होती. त्यावेळी शासकीय व निम शासकीय कर्मचारी २२ लाख होते. सध्या महाराष्ट्राची लोकसंख्या ही १३ कोटीच्या आसपास आहे. कर्मचाऱ्यांची संख्या मात्र १४ लाखांवर आली आहे. आठ लाखांनी कर्मचारी कमी झाले. या विविध शासनाने जर हे कर्मचारी भरले असते तर राज्यातील ८ लाख कुटुंबे सुखाने आनंदाने नांदली असती. त्यांच्या जोडीला त्यांचे नातेवाईकही सुखाने राहिले असते. इथल्या सर्व गरीब मराठ्यांना सांगू इच्छितो कि, तुम्ही ओ.बी.सी. ना दोष देऊ नका. तुम्ही ओ.बी.सींच्या ताटातील मागू नका. इथला जो श्रीमंत मराठा आहे. म्हणजेच निजामी मराठा आहे तो १९६0 सालापासून सत्तेत बसलेला आहे. त्याची श्रीमंती वाढत गेली आणि मराठ्यांची गरिबी वाढत गेली.

दोष द्यायचा असेल तर तो निजामी मराठ्यांना द्या. त्यांच्यामुळेच इतर मराठा समाजाला शेतीवर अवलंबून राहावे लागत आहे. तो हळू हळू आर्थिक विकलांग होत आहे. देशात महागाई प्रचंड वाढली आहे. मात्र तुरीचे, सोयाबीन व कापसाचे भाव मात्र, जैसे थे च आहेत. ते दर वाढलेले नाहीत.

सत्तेत कोण अशोक चव्हाण, शरद पवार, उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस मात्र यापैकी एकानेही शेतकऱ्यांच्या पिकाला हमी भाव देण्याचा कायदा करून कमी भाव देण्याऱ्या व्यापाऱ्याला जेल मध्ये घालण्याची हिम्मत दाखवली नाही.

शेतकऱ्यांच्या फायद्याचे कायदे करण्याची हिम्मत, ताकद या सरकारमध्ये नाही. आज निजामी मराठ्यांमुळेच गरीब मराठ्याची ही बिकट अवस्था झालेली आहे.

मनोज जरांगे यांनी मराठ्यांना ओ.बी. सी.मधून आरक्षणाची मागणी केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार, काँग्रेसचे बाळासाहेब थोरात, शिवसेनेचे उद्धव ठाकरे, भाजपाचे देवेंद्र फडणवीस यांना खुलेपणाने विचारतो की, मराठा आरक्षणाची जरांगे पाटलांची मागणी तुम्हाला मान्य आहे की नाही. तुम्ही पक्ष चालवताय महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्री म्हणून कामकाज पाहता केंद्रात मंत्रीपदे सांभाळली आहेत आणि तुम्हाला निर्णय घेण्याची क्षमता नाही हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे.

शरद पवारांची साठ वर्ष राजकारणात गेली अनेक वर्ष मुख्यमंत्री म्हणून राहिले केंद्रामध्ये मंत्री म्हणून काम पाहिले व त्यांच्या अंगी आणखीही निर्णय क्षमता नाही. महाराष्ट्र मध्ये आज जी परिस्थिती आहे ती परिस्थिती फक्त राजकीय राहिलेली नाही, मराठा समाज म्हणत आहे आम्ही ओबीसींना मतदान देणार नाही. ओबीसी म्हणत आहेत. आम्ही मराठ्यांना मतदान देणार नाही आज परिस्थिती यापुढे गेलेली आहे. या परिस्थितीने आता सामाजिक भांडणाचे स्वरूप धारण केलेले आहे. समाजाला या पळपुट्या नेत्यांची काही गरज नाही. शासन निर्णय घेण्याची हिंमत दाखवत नाही त्यामुळे गरीब मराठ्यांनी येणाऱ्या विधानसभेला योग्य विचार करणे गरजेचे आहे.

एखादा समाज जर पूर्वी श्रीमंत असेल आणि काळाच्या ओघात जर तो आर्थिक सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास झाला असेल तर त्या समाजाने सरकारकडे मदत मागणे हा त्यांचा अधिकार आहे. ही यात्रा राजकीय फायद्यासाठी नाही. आरक्षणाला राजकीय प्रश्नच राहूद्या त्याला सामाजिक प्रश्नाचे स्वरूप देऊ नका. तरच सामाजिक परिस्थिती सुरळीत राहील. वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष प्रवीण रणबागुल, जिल्हाध्यक्ष बी.डी.शिंदे, रमेश बारस्कर, अविनाश भोसीकर, भूम ता. अध्यक्ष मुसाभाई शेख, वैभव गायकवाड, रोहित गायकवाड, अक्षय गायकवाड, धीरज गायकवाड, मुकुंद लगाडे, महावीर बनसोडे यांच्यासह तालुक्यातील ओ.बी.सी., एस.सी., एस.टी. समाज बांधव मोठया संख्येने हजर होते.

## भूम तालुक्यात भगवा सप्ताह व शिवसंपर्क अभियानाची सुरुवात



**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२९ जुलै -**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त भूम तालुक्यामध्ये भगवा सप्ताह व शिवसंपर्क अभियानाची सुरुवात करण्यात आली असुन वाढदिवसानिमित्त माणकेश्वर येथे महेबूब सुबहाणी यांच्या दर्गावरती फुलांची चादर चढवून येथीलच राममंदीर या ठिकाणी महाआरती करून महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांच्या माध्यमातुन पुन्हा विधान सभेवर भगवा फडकवून पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत म्हणून प्रार्थना करण्यात आली.

महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख जिनत सय्यद यांच्यावतीने महिलांना साड्याचे वाटप करण्यात आले.

शिवसेना जिल्हासंपर्कप्रमुख सुनीलजी काटमोरे यांच्या सूचनेवरून तालुक्यांमध्ये भगवा सप्ताह व शिवसंपर्क अभियानाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी विधानसभा समन्वयक दिलीप शाळू, महिला आघाडी जिल्हा संघटक जिनत सय्यद, भूम तालुका प्रमुख ॲड. श्रीनिवास जाधवर, विधानसभा अध्यक्ष प्रल्हाद आडागळे, महिला आघाडी तालुका संघटक उमादेवी रणदीवे, उपतालुका प्रमुख रामभाऊ नाईकवाडी, भगवान बांगर, अनिल अंधारे, छोटू सराफ, दोपारे मामा, दिपक मुळे, अशोक शेळवणे, हिना शेख, अलिप्शा पठाण, रोशनी पाटील, पंजाब दोपारे, प्रतीक्षा पाटील, सुमा अंधारे, शुभांगी अंधारे, शारदा अंधारे, इंदु गिलबिले, अन्वरबी शेख, अपेक्षा गिलबिले, शेरीपा उस्मान शेख, शायदा शेख, शुभांगी सराफ, रेश्मा शेखान, सालिया मुकेबिल, उजमा शेखमेरे, सुषमा पाटील, आशा मोरे प्रतीक्षा जाधव, महादेवी क्षिरसागर, ताराबाई क्षिरसागर, मंगल शिंदे, बिजल कांबळे, ताराबाई कांबळे, मैना दाभाडे, पारूबाई लोंढे यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

## योगासन स्पर्धेवर वाशीचे वर्चस्व

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२९ जुलै -**

महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशन आणि बृहन महाराष्ट्र योग परिषदेच्या अधिपत्याखाली धाराशिव जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय अजिंक्यपद योगासन स्पर्धा आणि राज्यस्तरीय निवडचाचणी स्पर्धेवर वाशी तालुक्यातील योगपटूंनी उत्कृष्ट योगासने करत स्पर्धेवर आपले वर्चस्व ठेवले.

वाशी येथील हिंदवी योगासना प्रशिक्षण केंद्रात घेण्यात आलेल्या या स्पर्धेचे उदघाटन आणि पारितोषिक वितरण जिल्हा संघटनेचे अध्यक्ष प्रवीण गडदे आणि सचिव योगेश उपळकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी डॉक्टर चेतन चेडे, योग प्रशिक्षक परमेश्वर चौरे, सीमा चौरे, मनोज पतंगे, सविता कवडे, राजकुमार कवडे, रोहित सुरवसे, रघुदत्त यंदे, अमोल कदम, आप्पा चव्हाण, सिध्दी पोतदार, रोहिणी बसाळगे आदींसह योगपटूची व योगप्रेमींची उपस्तीथी होती.

स्पर्धेचा अंतिम निकाल अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय प्रमाणे १० ते १४ वयोगटांमध्ये मुले योगासना प्रकार ट्रॅडिशनल ईश्वर भांगे, ईशांत भांगे, विराज मोळवणे, मुलीमधून कृष्णावली कवडे, गायत्री बगाडे आणि सिद्धी चव्हाण याच गटातून मुले आर्टिस्टिक सिंगल या योगासनाच्या प्रकारातून परिक्षीत चौरे याने तर मुलीमधून भाग्यश्री गायकवाड यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

१० ते १४ वर्षे रेधमिक पियर मध्ये मुली भक्ती नन्नवरे आणि सर्वेशा रवी अष्टेकर प्रथम व ट्रॅडिशनल १४ ते १८ गटातील मुलीमध्ये सई नलवडे, भक्ती नन्नवरे आणि तनिष्का बुबणे. आर्टिस्टिक सिंगल १४ ते १८ गटातील मुलीत सिध्दी जाधव. १८ ते २८ मुले गटातून सिद्धेश कात्रे याने प्रथम क्रमांक पटकाविला आहे. विजेत्या योगपटूंना सुवर्ण, रौप्य व कास्य पदक, प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

## भूकंपग्रस्तांचे आरक्षण वाढवून ३ टक्के करावी

### आ.अभिमन्यु पवार यांची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२९ जुलै -**

भूकंपग्रस्तांचे आरक्षण वाढवून ३% करण्यासह भूकंपग्रस्तांच्या विविध मागण्यांसाठी औशाचे आ. अभिमन्यु पवार यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन पाठपुरावा केला. १९९३ च्या महाप्रलयकारी किल्लारी (ता.औसा) भूकंपात किल्लारी व आजूबाजूच्या गावांमधील जवळपास १० हजार नागरिकांचा मृत्यू झाला होता तर हजारो जनावरे दगावली होती आणि हजारो घरं ध्वस्त झालेली. त्या महाप्रलयकारी भूकंपाचे ओरखडे मनावर घेऊनच लातूर आणि धाराशिव जिल्ह्यातील हजारो कुटुंबे जीवन व्यतीत करतात. तत्कालीन सरकारने किल्लारी भूकंपग्रस्तांना ३% आरक्षण दिले होते. पण २००९ साली तत्कालीन काँग्रेस सरकारने त्यात घट करून भूकंपग्रस्तांसाठी २% आरक्षण केले. त्यात २०१५ साली न्यायालयीन निर्णयाचा हवाला देऊन भूकंपग्रस्त आरक्षणात कोयना भूकंपग्रस्तांचा समावेश करण्यात आला. या दोन्ही बाबींचा विचार करून भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण वाढवून ३% इतके करण्यात यावे, अशी आग्रही मागणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली.

यासंदर्भात तपासून प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रधान सचिव, मदत व पुनर्वसन यांना दिल्या आहेत. यावेळी भूकंपग्रस्त कृती समितीचे अध्यक्ष अमर बिराजदार, अभिलाष फावडे, व्यंकट जगताप, विष्णू काकडे उपस्थित होते.

## केंद्रीय प्रा.शाळेत शिक्षण सप्ताह विविध उपक्रमांनी साजरा

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.२९ जुलै -**

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा इटकळ (ता. तुळजापूर) येथे दि.२२ ते २८ जुलै दरम्यान नियोजनाप्रमाणे शिक्षण सप्ताह साजरा करण्यात आला.

यात शैक्षणिक साहित्य तयार करणे, शैक्षणिक साहित्याचा अध्ययन अध्यापनात प्रभावी वापर करणे, विविध बौद्धिक व देशी खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर, ऑनलाईन टेस्ट, इको क्लब स्थापन, वृक्षारोपण आणि समुदाय सहभाग असे विविध उपक्रम घेवून शिक्षण सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला.



सप्ताहाचा समारोप विद्यार्थ्यांना स्नेहभोजन व केळी वाटप करून करण्यात आला. तसेच वाचन चळवळ गतिमान करण्यासाठी व बाल वाचनालय स्थापनेसाठी गावातील दानशूर व्यक्तींनी २५ हजार ५०० रूपये जमा केले.

सदरील कार्यक्रमात सरपंच साहेब क्षीरसागर, पोलीस पाटील विनोद सलगरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हुसेन मकानदार, उपाध्यक्ष दादा भोपळे, अभियंता रामराजे पाटील, व्य.स. सदस्य श्रीकृष्ण मुळे, पालक परमेश्वर हन्नुरे, प्रविण माशाळकर, व्यंकट पाटील, जब्बार मुजावर आदी मान्यवरांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

शिक्षण सप्ताह यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक तानाजी गायकवाड, बालाजी कदम, सतिश ढोणे, सुधाकर कांबळे, रविंद्र गायकवाड, नागेश स्वामी, वैशाली देशमाने, जया भोसले, सारिका इंगळे आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले.

समारोप प्रस्तावना बालाजी कदम यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सतिश ढोणे यांनी मानले.

## बँकेने पीक कर्ज वाटप उद्दीष्ट वेळेत पुर्ण करावे : आ.ज्ञानराज चौगुले

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२९ जुलै -**

उमरगा, लोहारा तालुक्यातील पिककर्ज व शासकीय योजनांच्या कर्ज प्रकरणातील अडचणी बाबत दि.२९ जुलै रोजी तहसील कार्यालय, उमरगा व तहसील कार्यालय लोहारा येथे आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक संपन्न झाली.



याबैठकीत आमदार ज्ञानराज चौगुले यांनी शेतकऱ्यांच्या पीक कर्ज संबंधीच्या समस्यासंदर्भात सर्व बँक अधिकाऱ्यांना बँकांना दिलेले पीक कर्जाचे उद्दीष्ठ लवकरात लवकर (१०० टक्के) पूर्ण करण्यात यावे, शेतकऱ्याने पिक कर्जाचे पुनर्गठन करून घेतल्यानंतर लागलीच त्यांना ४ दिवसात कर्ज उपलब्ध करुन देण्यात यावे, केसीसी लोनसाठी सिबिल स्कोअरची अट रद्द करणे, पीक कर्ज देण्यासाठी इतर बँकाचे बेबाकी प्रमाणपत्र घेण्याऐवजी स्टॅम्प वरती शेतकऱ्याचे हमी पत्र घ्यावे, कर्जासाठी लागणारी कागदपत्रांची यादी दर्शनी भागात मोठा फ्लेक्स करून लावणे, गटसचिव यांनी तत्पर व कार्यशील राहणे गरजेचे, ऊसावरील केसीसी लोनसाठी कारखान्याचे पत्र घेण्याची अट रद्द करणे, केसीसी लोन परतफेड मुदत वाढवून ५ वर्षे करणे, ज्या शेतकऱ्यांचे केसीसी लोन थकीत आहे. अशा शेतकऱ्यांना शासनाचे येणारे अनुदान बँक देत नाही त्यांना ते अनुदान तात्काळ वितरीत करण्यात यावे, पिक कर्जासाठी शेतकऱ्यांना वारंवार हेलपाटे घालावे लागणार नाही याची खबरदारी घ्यावी तसेच शासनाने ठरवून दिलेल्या निर्धारित वेळेत सर्व पीक कर्ज वाटप करावे व गरजुवंत शेतकऱ्यांची हेळसांड होऊ नये याची दक्षता घ्यावी, असे आ. चौगुले यांनी सांगीतले.

पीक कर्ज वाटप करताना बँका दत्तक गाव असेल तर कर्ज वाटप करु असे सांगीत आहेत, अशी तक्रार शेतकऱ्यांनी या बैठकीत केली.

तात्काळ आ. ज्ञानराज चौगुले यांनी दखल घेत पीक कर्ज वाटप करताना बँकेने दत्तक गाव असेल तर कर्ज वाटप असे करु नका, प्रत्येक लाभार्थी शेतकऱ्यांना कर्ज वाटप करा, असे सुचित अधिकाऱ्यांना केले.

या बैठकीस उमरगा तहसीलदार गोविंद येरमे, लोहारा तहसीलदार काशीनाथ पाटील, उमरगा नायब तहसीलदार रतन काजळे, लोहारा नायब तहसीलदार सुजाता हंकारे, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक, लोहारा गटशिक्षणाधिकारी शितल खिंडे, उमरगा गटशिक्षणाधिकारी गटविकास अधिकारी प्रशांत मरूड, सहाय्यक निबंधक दत्ता मोरे, एसबीआय लीड बॅक मॅनेजर चिनमयदास, उमरगा तालुका कृषी अधिकारी, लोहारा तालुका कृषी अधिकारी, अरूण जगताप, राजेंद्र माळी, अभिमान खराडे, अमिन सुंबेकर, दिपक रोडगे, विजयकुमार ढगे, श्रीकांत भरारे, तालुकाध्यक्ष प्रमोद बंगले, आयुब हबीब शेख, के.डी. पाटील, कुंडलीक सुर्यवंशी, व्यंकट कागे, आयुब अब्दुल शेख, बबन फुलसुंदर, यांच्यासह उमरगा-लोहारा तालुक्यातील सर्व बँकाचे व्यवस्थापक, शेतकरी, पदाधिकारी, शिवसैनिक उपस्थित होते.

## अग्रलेख...

# सामर्थ्यशाली व विकसित भारताचे संकल्पचित्र

तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात तसेच जागतिक पातळीवर जे बदल होत आहेत, ज्या संधी उपलब्ध होत आहेत, त्याचा फायदा भारताने घेऊन विकसित राष्ट्राच्या दिशेने वेगाने वाटचाल केली पाहिजे, हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आत्मविश्वासपूर्वक प्रतिपादन भारतीयांची भव्य स्वप्ने व महत्त्वाकांक्षांना प्रचंड बळ देणारे आहे. नीती आयोगाच्या शनिवारी पार पडलेल्या गव्हर्निंग कौन्सिलच्या अर्थात प्रशासकीय परिषदेच्या बैठकीचे अध्यक्षपद भूषविताना पंतप्रधानांनी जे मार्गदर्शन केले, त्यात 'भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र करणे ही प्रत्येक भारतीयाची महत्त्वाकांक्षा आहे,' हे प्रामुख्याने अधोरेखित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन म्हणजे सामर्थ्यशाली व विकसित भारताचे जणू संकल्पचित्रच आहे. प्रखर इच्छाशक्ती, दुर्दम्य आशावाद, भव्य स्वप्ने व महत्त्वाकांक्षा आणि जबरदस्त आत्मविश्वास या साऱ्याच गोष्टींचे प्रतिबिंब पंतप्रधानांनी शनिवारी नीती आयोगाच्या बैठकीत केलेल्या भाषणात उमटले. केंद्र आणि राज्य सरकारमधील सहयोगी प्रशासन आणि सहकार्याला प्रोत्साहन देणे, वितरण यंत्रणा मजबूत करून ग्रामीण आणि शहरी लोकसंख्येच्या जीवनाचा दर्जा वाढविणे हा या बैठकीचा उद्देश असल्याचेही पंतप्रधानांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले.

पंतप्रधानांच्या भाषणातून उद्याच्या विकसित भारताचे सुस्पष्ट चित्र रेखाटले गेले. कुठेही निव्वळ स्वप्नरंजनात न वावरता उलट त्या स्वप्नांचा पाठलाग करून व त्याला प्रयत्न, सातत्य आणि परिश्रमांची जोड देऊन गेल्या १० वर्षांपासून मोदी सरकारची वाटचाल सुरू आहे. गतिशीलता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर हे मोदी सरकारचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. या दोन गोष्टींमुळेच मोदी सरकारने अनेक महत्त्वाचे निर्णय प्रभावीपणे, अतिशय गतीने राबविले. परिणामी २०१४ पासून अनेक मोठमोठ्या व महत्त्वाकांक्षी योजना मार्गी लागल्या. आता तिसऱ्यांदा पुन्हा केंद्रात भाजपाप्रणीत रालोआ सरकार सत्तारूढ झाल्याने जनतेच्या आशा-अपेक्षा उंचावल्या आहेत. त्यामुळे केंद्र सरकारला शाश्वत विकासाच्या दृष्टीने राज्यांना सोबत घेऊन प्रभावी धोरणांची अंमलबजावणी करावी लागणार आहे. आर्थिक व औद्योगिक आघाडीवर नव्याने धोरणे आखण्याचे मोठेच आव्हान केंद्रापुढे आहे. सर्वच स्तरावर अर्थात आर्थिक, औद्योगिक, सामाजिक, शैक्षणिक व अन्य सर्वच क्षेत्रांत व्यापक व गुणात्मक परिवर्तन करण्याचे केंद्राचे ध्येय आहे. हे कार्य मुळीच सोपे नाही. कारण यासाठी राज्यकर्त्यांबरोबरच नोकरशाही व संबंधित सर्वच घटकांचे सहकार्य आवश्यक आहे.

भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले. त्याचवेळी ब्रिटिशांच्या वसाहतवादी साम्राज्यातून आशिया-आफ्रिका खंडातील अनेक लहान-मोठे देश स्वतंत्र झाले. या देशांच्या तुलनेत आज ७७ वर्षांनंतर भारताने विकासाच्या वाटचालीत कुठपर्यंत मजल मारली आहे, याचे सर्वच स्तरावर विश्लेषण करणे आवश्यक आहे. कारण हा केवळ केंद्र सरकारचाच विषय नाही तर यात राज्यांचीही प्रमुख भूमिका आहे. स्पष्टच सांगायचे झाल्यास यात राज्यांचीच प्रमुख भूमिका आहे. कारण, पंतप्रधानांनी सांगितल्यानुसार जनतेशी त्यांचा थेट संपर्क असतो. त्यामुळे २०४७ पर्यंत विकसित भारताचे लक्ष्य गाठण्यासाठी देशातील सर्वच राज्यांनी पक्षीय राजकारण न करता आपले १०० टक्के योगदान देणे अत्यावश्यक आहे. २०४७ साल उजाडायला अजून २३ वर्षे बाकी आहेत. त्यामुळे या सगळ्याच राज्यांना विकसित राज्य होण्यासाठी संधी उपलब्ध आहे. हा विषयच केंद्र व राज्यांच्या एकत्रित प्रयत्नांचा असल्यामुळे विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्वांचीच राजकीय इच्छाशक्ती एकवटली पाहिजे आणि सकारात्मक दृष्टिकोन अवलंबून निर्धाराने वाटचाल केली पाहिजे. नीती आयोगाच्या बैठकीच्या काही दिवस आधी देशाच्या आर्थिक आघाडीवर दोन सकारात्मक बातम्या समोर आल्या आहेत. पहिली बातमी म्हणजे २०२७ पर्यंत भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याची शक्यता ख्यातनाम आंतरराष्ट्रीय संस्था 'जेफरीज'ने वर्तवली आहे. तर, २०२४ ते २०३१ या काळात या दशकाच्या अखेरपर्यंत भारताच्या अर्थव्यवस्थेचा वेग ७.६ ते ७.८ टक्के राहणार असल्याचा अंदाज नामवंत क्रेडिट रेटिंग संस्था 'डेलॉईट'ने वर्तविला आहे. मोदी सरकार तिसऱ्यांदा सत्तारूढ होण्याच्या पृष्ठभूमीवर या सकारात्मक बातम्या भारतीयांच्या दृष्टीने निश्चितच समाधानकारक आहेत. २०१४ पूर्वीच्या भारतात म्हणजेच काँग्रेसप्रणीत संपुआ सरकारच्या राजवटीत प्रचंड भ्रष्टाचार, राष्ट्रवादी वृत्तीचा अभाव, घराणेशाही व राजकीय इच्छाशक्तीचा अभाव यांच्यामुळे देशाच्या विकासात अनेक अडथळे आले. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आगमनानंतर देशातील व्यवस्थेमध्ये चैतन्य निर्माण झाले असून गेल्या १० वर्षांत भारताने नाजूक पाच अर्थव्यवस्था ते सर्वोच्च पाच अर्थव्यवस्था असा प्रवास केला आहे. पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने भारत करीत असलेल्या उल्लेखनीय वाटचालीमुळे देशातील तरुणांसाठी अनेक जागतिक संधी उपलब्ध होत आहेत. जगातील सर्व आधुनिक पायाभूत सुविधा साध्य करण्यासाठी पंतप्रधानांनी 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास' असा नारा फार पूर्वीच दिला आहे. तसेच विकासाच्या दृष्टीने पुढचे दशक हे भारताचेच राहणार आहे, अशी ग्वाहीही त्यांनी यापूर्वीच दिली आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विकसित भारताचा संकल्प साध्य होण्यासाठी देशातील तरुण उद्योजक, स्टार्टअप्स यांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. कारण 'विकसित भारत' ही केवळ आकर्षक अथवा लक्षवेधी घोषणा नाही, तर तो आपल्या सर्वांचा उद्देश आहे. हे आपणच म्हणजेच देशवासीयांनी स्वतःला दिलेले एक लक्ष्य आहे. त्यामुळे विकसित भारताची संकल्पना प्रत्यक्ष साकारण्यासाठी देशातील प्रत्येक घटकाचे त्यामध्ये योगदान आवश्यक आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेला गती आणि बळकटी देण्यासाठी तसेच लोकांच्या इच्छा-आकांक्षांना मूर्त रूप देण्यासाठी मोदी सरकारने गेल्या १० वर्षांपासून प्रामाणिक प्रयत्न केले, हे नाकारण्यात अर्थ नाही. अर्थकारण आणि राजकारण या दोन्हींमध्ये मोदी सरकारने उत्तम समन्वय राखला आहे. एकीकडे स्वयंरोजगाराला व ग्रामोद्योगांना चालना देत असतानाच दुसरीकडे औद्योगिक उत्पादनात सातत्याने कशी वाढ होईल, याकडेदेखील मोदी सरकारने लक्ष दिले आहे. त्यामुळे पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट समोर ठेवून वाटचाल करणारा भारत हा सातत्याने औद्योगिक उत्पादन वाढीसाठी तसेच निर्यातवृद्धीसाठीदेखील प्रयत्न करीत आहे. मोदी सरकारच्या स्टार्टअप इंडिया, कौशल्य विकास योजना, आत्मनिर्भर भारत, मेक इन इंडिया, व्होकल फॉर लोकल, एक जिल्हा, एक उत्पादन (ओडीओपी) योजना या साऱ्याच महत्त्वाकांक्षी योजनांमुळे देशाचे अर्थचक्र गतिमान होण्यास मदत होत आहे. आगामी काळात आमच्या माता, भगिनी व मुलींना दर्जेदार शिक्षण व रोजगाराच्या अधिकाधिक संधी कशा उपलब्ध होतील, यादृष्टीने आम्ही सातत्याने कार्यरत राहू, असे अभिवचन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीपूर्वी दिले होते. आता मोदी सरकार पुन्हा तिसऱ्यांदा सत्तारूढ झाले आहे. दिलेल्या वचनांची हे सरकार निश्चित पूर्तता करेल, याची पूर्ण खात्री आहे. देशाचे नेतृत्व करणारे नेते खंबीर असतील, त्यांच्याजवळ निश्चित धोरणे असतील व आपल्या धोरणांचा पाठपुरावा करण्यासाठी चिकाटी व सातत्य असेल तर विकसित भारताची संकल्पना निश्चितच साध्य करता येऊ शकते.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# दोन मुख्यमंत्री, दोन कार्यशैली!



दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या जामीन अर्जावर दिल्ली उच्च न्यायालयाचा निवाडा आज येण्याची शक्यता आहे. दिल्ली सरकारच्या दारू घोटाळ्यात अंमलबजावणी संचालनालय व सीबीआय यांनी दोन वेगवेगळी प्रकरणे केजरीवाल यांच्या विरोधात दाखल केली असून अंमलबजावणी संचालनालयाने दाखल केलेल्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने त्यांना यापूर्वीच जामीन मंजूर केला आहे.

दिल्ली उच्च न्यायालयाने आज त्यांना जामीन दिल्यास आणि त्याविरोधात सीबीआयने उच्च न्यायालयात न जाण्याचा निर्णय घेतल्यास केजरीवाल यांची जामिनावर सुटका होऊ शकते. सीबीआयने सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतल्यास केजरीवाल यांना आपल्या सुटकेसाठी आणखी काही दिवसांची प्रतीक्षा करावी लागू शकते.

**प्रकरण झारखंडचे** : झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनाही अंमलबजावणी संचालनालयाने वेगळ्या प्रकरणात अटक केली होती. मात्र, अटक होण्यापूर्वी त्यांनी राजीनामा दिला. नंतर त्यांना झारखंड उच्च न्यायालयाने जामीन दिला. त्यांनी पुन्हा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. सचिवालयात जाऊ नका, सरकारी फाईली पाहू नका... अशा कोणत्याही अटींचा त्यांना सामना करावा लागला नाही. वास्तविक, अरविंद केजरीवाल आणि हेमंत सोरेन या दोघांमध्ये केजरीवाल हे उच्चशिक्षित आहेत. त्यांनी आयआयटी उत्तीर्ण केले आहे. भारतीय राजस्व सेवेचे ते अधिकारी राहिले आहेत. पण, राजकीय प्रगल्भता-नैतिकता याचा विचार केल्यास हेमंत सोरेन अधिक सरस ठरले. समंजस ठरले.

**प्रश्न नैतिकतेचा** : हेमंत सोरेन यांना आपल्या अटकेची कल्पना येताच त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. नव्या मुख्यमंत्र्याचा शपथविधी झाला. आता उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केल्यावर सोरेन पुन्हा मुख्यमंत्री झाले. केजरीवाल यांना ही राजकीय नैतिकता दाखविता आली नाही. त्यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला नाही. यामुळे तिहारमध्ये त्यांना कोणत्या अधिक सवलती मिळाल्या याची कल्पना नाही. फक्त त्यांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री निवासात राहता आले. सरकारी सोयींचा उपभोग घेता आला.

**दोन अटी** : लोकसभा निवडणुकीचा प्रचार करण्यासाठी केजरीवाल यांना मर्यादित काळासाठी जामीन मिळाला होता. काही दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाने त्यांना नियमित जामीन मंजूर केला. पण, त्यात काही अटी टाकल्या. केजरीवाल यांना मुख्यमंत्री कार्यालयात जाता येणार नाही. त्यांना कोणत्याही सरकारी फाईलीवर सही करता येणार नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या या दोन अटी पाहता केजरीवाल मुख्यमंत्रिपदावर कायम राहिले काय वा न राहिले काय यात काय फरक पडणार आहे? केजरीवाल हे लोकनिर्वाचित मुख्यमंत्री असल्याने आम्ही त्यांना राजीनामा देण्यास सांगणार नाही. याचा निर्णय त्यांनी स्वतः करावयाचा आहे, अशी एक टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली. न्यायालयाची ही टिप्पणी अगदी बरोबर आहे. नैतिकतेच्या आधारे केजरीवाल यांच्याकडून काय अपेक्षित होते, हेच जणू न्यायालयाने सूचित केले आहे.

**आज निर्णय?** : दारू घोटाळ्यात सीबीआयने दाखल केलेल्या आरोपपत्रात दिल्ली उच्च न्यायालय आज आपला निवाडा देणार आहे. न्यायालयाने केजरीवाल यांना जामीन दिला तरी त्यात सर्वोच्च न्यायालयाने घातलेल्या दोन अटी राहणार आहेत. मग, केजरीवाल तिहार बाहेर आले तरी त्यांना काय लाभ मिळणार आहे. त्यांना दिल्ली सचिवालयात जाता येणार नाही. सरकारी फाईलींवर सही करता येणार नाही. बहुधा मंत्रिमंडळाची बैठकही बोलाविता येणार नाही. फक्त मुख्यमंत्री निवासात राहता येईल. मग, असे मुख्यमंत्रिपद त्यांच्या काय कामाचे राहणार आहे? याउलट जर त्यांनी राजीनामा दिला असता, तर सर्वोच्च न्यायालयाने अशा अटी घातल्या नसत्या. तिहारबाहेर आल्यावर केजरीवाल यांनी नव्याने शपथ घेत, नवी राजवट सुरू केली असती. पण, मुख्यमंत्रिपदाचा मोह व आपल्याच सहकाऱ्यांवरील अविश्वास त्यांना नडला. खुर्चीला चिटकून बसणारा नेता अशी त्यांची प्रतिमा तयार झाली.

**नवी राबडीदेवी?** : ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात हरयाणा विधानसभेची निवडणूक होत आहे. काँग्रेसने यापूर्वीच हरयाणा-दिल्लीत आम आदमी पक्षाशी कोणतीही युती करण्याची शक्यता फेटाळून लावली आहे. आम आदमी पक्षाने हरयाणा विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आणि या तयारीचा श्रीगणेशा कुणी करावा? केजरीवाल यांची पत्नी सुनीता केजरीवाल यांनी. आम आदमी पक्षात अन्य कुणीही नेता नाही की ज्याने हरयाणा विधानसभेची तयारी आपल्या हाती घ्यावी? सुनीता केजरीवाल यांचे काय कर्तृत्व की त्यांनी राजकारणात अचानक सक्रिय व्हावे? लोकसभा निवडणुकीतही त्यांनी काही संदेश जारी केले होते. केजरीवाल यांना आपल्या पत्नीवर विसंबून राहण्याची वेळ का यावी?

**हुकूमशाही कार्यशैली** : केजरीवाल यांची हुकूमशाही शैली हे याचे कारण आहे. त्यांनी पक्षात कुणालाही क्रमांक दोनचा नेता होऊ दिले नाही. संजयसिंह असोत की आणखी कुणी; कुणालाही पक्षात कोणतेही महत्त्व दिले गेले नाही. फक्त केजरीवाल, मनीष सिसोदिया व राघव चढ्ढा या तिघांनी सारा पक्ष आपल्या ताब्यात ठेवला. आज हे तिघेही सक्रिय नाहीत. केजरीवाल व सिसोदिया तिहारमध्ये आहेत तर राघव चढ्ढा पुन्हा एकदा लंडनला निघून गेले आहेत. ते विम्बल्डनचे सामने पाहण्यात व्यस्त आणि मस्त राहिले. संसद अधिवेशनासाठी ते भारतात येत राहतील. राघव चढ्ढा फार काळ पक्षात राहणार नाहीत, हे स्पष्ट झाले आहे. पक्षात राहिले तरी ते सक्रिय राहणार नाहीत, हेही स्पष्ट आहे.

**विधानसभा निवडणूक** : विधानसभेची निवडणूक २०२५ च्या फेब्रुवारीत आहे. केजरीवाल कदाचित पुन्हा एकदा विधानसभा जिंकतील. पण, आता त्यांनी राष्ट्रीय राजकारणातील आपले स्थान गमावले आहे. तिहार कारागृहात जाऊनही राजीनामा न दिल्याने, दिल्लीत ज्याप्रमाणे त्यांची अवस्था त्रिशंकू झाली आहे, तशीच त्यांची अवस्था राष्ट्रीय राजकारणात झाली आहे. ते विरोधी आघाडीत आहेत. पण, फक्त नावाला. पंजाब, दिल्ली व हरयाणात त्यांचा पक्ष आहे. पंजाबमध्ये काँग्रेसने त्यांच्या पक्षाशी युती न करता सात जागा जिंकल्या. दिल्ली-हरयाणात काँग्रेस-आप युती होती. याचा फायदा न काँग्रेसला झाला ना आम आदमी पक्षाला. अशा स्थितीत काँग्रेस पक्ष आता आपचे ओझे किती काळ वाहणार? विधानसभा निवडणुकीत हरयाणा-दिल्ली या दोन्ही राज्यांत आपशी समझोता न करण्याचा निर्णय काँग्रेसने यापूर्वीच घेतला आहे. दिल्ली विधानसभा जिंकली तरी त्याने केजरीवाल यांचे राजकीय महत्त्व काही वाढणारे नाही.

**अतिमहत्त्वाकांक्षा** : राजकारणात अतिमहत्त्वाकांक्षा महागात पडते. केजरीवाल यांचे नेमके तेच झाले आहे. पंतप्रधान होण्यासाठी काँग्रेसचा पाडाव आवश्यक आहे, हे समजून त्यांनी राज्याराज्यांत काँग्रेसला पाडण्यासाठी आपले उमेदवार उभे केले. गुजरातमध्ये काँग्रेसला पराभूत करण्यात आम आदमी पक्षाने मोठा हातभार लावला होता. आता काँग्रेस तो सारा हिशेब पूर्ण करीत आहे. येणाऱ्या काळात दिल्ली वगळता अन्य राज्यांत आपचे अस्तित्व संपलेले असेल.

## वेध

**अनिल फेकरीकर**

# वरळी मटक्याचा नाद घातकच

मटका हा जुगाराचा प्रकार आहे. मुळात याचा उगम न्यूयॉर्क कॉटन एक्सचेंजमधून झाला. तेव्हा कापसाच्या सुरुवातीच्या आणि बंद दरांवर सट्टा लावला जायचा. दरम्यान, मातीच्या भांड्यातून चिठ्ठ्या काढणे किंवा पत्ते खेळणे असाही प्रकार पुढे उदयास आला. भारतात कल्याण भगत हा मटक्याचा जनक मानला जातो. १९६० मध्ये याच भगतने मुंबईत मटका नावाचा जुगार सुरू केला. कल्याण भगत लोकांकडून न्यूयॉर्क कॉटन एक्सचेंजच्या भावावर लावलेले पैसे घेई. ज्यांचे ओपन - क्लोज अंक बरोबर येत त्यांना लावलेल्या पैशाच्या नऊपट पैसे द्यायचा. हे बेटिंग घ्यायचे आणि पैसे देण्याचे व्यवहार वरळीतील भागातून कल्याण भगत करायचा. यावरून 'वरळी मटका' हे नाव लोकांमध्ये रूढ झाले. त्यावेळी ओपन - क्लोजचे अंक एका मडक्यात ठेवलेल्या चिठ्ठ्यांवरून काढले जायचे. पुढे हाच वरळी मटक्याचा प्रकार खूप लोकप्रिय झाला. यात १ रुपया लावल्यावर जुगाऱ्याला ९ रुपये मिळायचे. तेव्हा भगतने गिरणी कामगारांना लक्ष्य केले होते. परिणामी मटक्याच्या नादात गिरणी कामगार देशोधडीला लागले अन् भगत पैशाने रग्गड बनला. १९८० मध्ये वरळी मटक्याचा व्यवहार महिना ५०० कोटींपर्यंत पोहोचला होता. १९९५ मध्ये पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मुंबईत मटक्याचे सुमारे २० हजार एजंट होते. आता कल्याण भगत जगात नसला तरी त्याचे वारसदार छुप्या पद्धतीने हा गोरखधंदा करीतच आहेत. मधल्या काळात मटका बंद अवस्थेत होता. पण आता हा वरळी मटका पुन्हा एकदा पावसाळ्यातील छत्र्यांप्रमाणे महाराष्ट्रात सक्रिय झाल्याने नवेच भयावह संकट ओढवले आहे.

विशेषतः ग्रामीण भागातील बेरोजगार युवकांना यात लक्ष्य करण्यात आल्याने वेळीच सावध होत युद्धपातळीवर हा प्रकार बंद करणे गरजेचे झाले आहे. नागपूर जिल्ह्याचा विचार करता रामटेक, पारशिवनी, सावनेर, खापरखेडा, बुटीबोरी, मौदा, अरोली, नरखेड, कुही, वेलतूर, कळमेश्वर, काटोल, भिवापूर भागात राहणाऱ्या लोकांच्या मनात झटपट श्रीमंत होण्याचे स्वप्न दाखवित समाजाला वाममार्गाला लावणाऱ्या एजंटांनी वरळी मटक्याचा व्यवसाय वाढविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. युवकांनाही मटक्याचा नाद लागल्याने ते आपली शक्ती रोज अक्षरशः वाया घालवित आहेत. एक सांगतो, मटका लावून कुठलाही माणूस श्रीमंत झालेला नाही. मग ग्रामीण भागात राहणारे युवक कुठल्या आधारावर झटपट श्रीमंत होण्याचे स्वप्न रंगवित आहेत, याचाही शोध घ्यायलाच हवा. मधल्या काळात कळमेश्वर भागात एका धाडसी पोलिस अधिकाऱ्याने मटक्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पाऊल उचलले होते. पण एका तालुक्यात मोहीम राबवून होणार नाही. याकरिता संपूर्ण महाराष्ट्रात मटका बंद करण्यासाठी पोलिसांनी ऑपरेशन जुगार सुरू करण्याची गरज आहे. अफाट लोकसंख्या, बेरोजगारी, गुन्हेगारी संपूर्ण राज्यातील कायदा व सुव्यवस्थेसाठी मारक ठरू शकते. पूर्वी गावकरी सकाळी उठल्यावर शेतात जाऊन घाम गाळायचे आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला सुदृढ करण्यासाठी हातभार लावायचे. ते आता मटक्यात पैसे गुंतवून स्वतःसह कुटुंबीयांना संकटात ढकलत आहेत. त्यांचा पैसा आणि वेळ यात वाया जात आहे. पण त्यांच्या बळावर गुन्हेगारी जगत समृद्ध होणे चांगले नाही. पोलिस वरळी मटक्याच्या एजंटांना पकडत आहेत. पण कोर्टातून त्यांना लगेच जामीन मिळतो अन् सुटल्यावर ते पुन्हा लगवाडी करतात. त्यांचेही मन वळविण्याचा प्रयत्न करायला हवा. ऐकत नसल्यास ठेचून काढावे. तसे पाहता शिक्षा ही शरीरावर नव्हे तर मनावर व्हायला हवी. तशी व्यवस्थाच आपल्या येथे नसल्याने गुन्हेगार कधीच सुधारण्याचा प्रयत्न करीत नाही. शिवाय समाज गुन्हेगारांना आदर देतो अन् सज्जनांना पायदळी तुडवितो. हाही व्यवस्थेतील दोष दूर व्हायला हवा. झटपट न्यायनिवाडा झाल्यास वरळी मटक्याला मूठमाती मिळू शकते. जे समाजासाठी चांगले नाही, ते एकाच वेळी फोफावते कसे हाही याद्वारे उद्भवलेला प्रश्न रक्तदाब वाढविणारा म्हणावा लागेल. जुगार खेळणे वाईटच असते. हे लहानपणापासूनच मुलांना बाळकडूच्या रूपात सांगायला हवे. वारंवार जेव्हा या गोष्टी मुलांच्या मनावर बिंबवल्या जातील, तेव्हा गावात हजार एजंट आले तरी कुणीही वरळी मटक्यात पैसे गुंतवणार नाहीत. एवढे सर्वोत्तम संस्कार रुजविण्याची खरी गरज आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी, घाम गाळून कमावलेला एकच छदाम आयत्या मिळालेल्या घबाडापेक्षा मौल्यवान असतो, असे सांगितले होते. मग वाममार्गाने पैसे मिळविण्याची आपण कृती करायचीच कशाला?

९८८१७१७८५९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# झाले मोकळे आकाश...

शेवटी तो दिवस उजाडला जेव्हा केंद्र सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सर्व प्रकारांच्या कार्यक्रमांमध्ये भाग घेण्याची, त्याचा स्वयंसेवक होण्याची अनुमती दिली. ज्यामुळे सरकारी कर्मचारी संघामध्ये सहभागी होऊ शकत नव्हते त्या १९६६, १९७५, १९८० यावर्षी पारित केल्या गेलेल्या आदेशांमध्ये सुधारणा करण्यात आली व त्यामधून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नाव काढण्यात आले. २७ सप्टेंबर १९२५ रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना पूजनीय डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार यांनी नागपूर येथे केली. परंतु संघ आपल्या जन्मासोबतच विरोध आणि अनेक कठीण समस्या घेऊन आलेला होता. संघाचा जन्म जेव्हा झाला तेव्हा इंग्रजांचे राज्य होते व संघाच्या प्रतिज्ञेमध्ये म्हटले होते की, देशाला स्वतंत्र करण्यासाठी मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा घटक झालेलो आहे. म्हणजे शासनाच्या विरोधातच हे कार्य होते. त्यामुळे इंग्रज सरकारचा जाच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला सहन करावा लागला.

पूजनीय डॉक्टरांना असे वाटायचे की, करोडो लोकांच्या समाजावर मूठभर इंग्रज राज्य कसे काय करू शकतात? समाजामधील अकर्मण्यता, शिस्तीचा अभाव, हिंदू म्हणून एकत्र नसणे, प्रत्येक गोष्टीत 'मला काय त्याचे' ही वृत्ती, राष्ट्रप्रेमाचा अभाव इत्यादी दुर्गुण डॉक्टरांना दिसले. त्यामुळे समाजाला संघटित करून त्याच्यामध्ये शिस्त, देशभक्तीची भावना निर्माण केली गेली पाहिजे, या निष्कर्षावर ते पोहोचले. त्यामुळे संघाने जे कार्य सुरू केले ते अशाच पद्धतीचे कार्य होते. संघाच्या शाखांमधून दिल्या जाणाऱ्या संस्कारातून व्यक्ती आकाराला येऊ लागल्या. त्यातून मोठमोठे कार्य उभे होऊ लागले. त्यामुळे संघाचे कार्य हे पाहता पाहता संपूर्ण देशभर पसरले. संघ कार्याची अजून एक विशेषता होती ती म्हणजे संघ जसा नागपुरात होता तसाच तो बंगालमध्येही होता आणि केरळमध्येही होता. संघाची शाखा, संघाची कार्यपद्धती ही संपूर्ण देशभर समान होती. संघाची प्रार्थना ही देशभर समान होती. ज्या लोकांची भाषा भिन्न भिन्न आहे ते सर्वच लोक संघाच्या संस्कृत आज्ञा म्हणायचे. सामान्य कार्यक्रम संघाची एक विशेषता होती. त्यामुळे ज्याच्या ज्याच्या मनामध्ये देशभक्तीची भावना आहे, ज्याला वाटते की, मी समाजासाठी काहीतरी केलं पाहिजे, ती प्रत्येक व्यक्ती संघामध्ये येऊ शकत होती. कुठलेही सभासद शुल्क किंवा कुठलाही अर्ज संघाचा स्वयंसेवक बनण्यासाठी भरण्याची आवश्यकता नव्हती. त्यामुळे लोक येत गेले आणि पाहता पाहता राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही भारतातीलच नव्हे, तर जगातील सगळ्यात मोठी स्वयंसेवी संघटना बनली. परंतु, १९४७ साली जेव्हा देश स्वतंत्र झाला तेव्हापासूनच राज्यकर्त्यांना म्हणजे काँग्रेसला संघाची भीती वाटत होती. संघाची वाढती लोकप्रियता, लोकांचा सहभाग हे सर्व बघून पंडित नेहरूंसारख्या माणसाला वाटत होते की, गुरुजी गोळवलकर या देशाचे पंतप्रधान किंवा राष्ट्रपती बनू शकतात. परंतु, संघाला निवडणुकीमध्ये उतरायचे नव्हते, हे स्पष्ट होते. तरीही काँग्रेसला नेहमी संघाबद्दल आकस राहिला आणि त्या आकसातूनच १९४८ साली जेव्हा महात्मा गांधींची हत्या झाली तेव्हा संघावर बंदी टाकण्यात आली. कुठलेही पुरावे नसताना संघाला अडकवण्याचा प्रयत्न केला गेला. संघाच्या देशभरातील शाखा बंद करण्यात आल्या. संघाच्या हजारो स्वयंसेवकांना तुरुंगामध्ये टाकण्यात आले. शेवटी महत प्रयासाने संघ यातून मुक्त झाला. न्यायालयाने संघाला निर्दोष सिद्ध केले. परंतु राज्यकर्त्यांचा संघावरील रोष जात नव्हता. १९७५ साली इंदिरा गांधींनी ज्यावेळेस देशांमध्ये आणिबाणी लावली त्यावेळेस पुन्हा एकदा संघावर बंदी टाकली. पुन्हा संघाच्या शाखा बंद करण्यात आल्या. भारत मातेची प्रार्थना पुन्हा एकदा बंद झाली. शेवटी जनताजनार्दनाने इंदिरा गांधींना त्यांची जागा दाखविली व देशावरची आणिबाणी समाप्त झाली. संघावरची बंदी उठली. १९९२ साली वादग्रस्त ढाच्या पाडण्यात आला. त्याही वेळेला पुन्हा एकदा संघावर बंदी टाकण्यात आली. काही काळाने ती बंदी सरकारला उठवावी लागली. परंतु या सर्व प्रयासांमध्ये ६५ वर्षांचा कालखंड असा आहे, जो सरकारी रोषाचा आहे. ज्यामुळे समाजमनामध्ये संघाच्या कामाबद्दल नेहमीच संशय किंवा भीती राहील अशा पद्धतीचा प्रयत्न राज्यकर्त्यांनी केला. सरकारी कर्मचाऱ्यांना आपले नोकर समजून त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघामध्ये सहभागी होण्याची परवानगी नाकारण्यात आली. इतकी वर्षे ती बंदी कायम होती. मध्यप्रदेशातील इंदूर खंडपीठामध्ये यावर एक खटला दाखल करण्यात आलेला होता. त्यामध्ये सरकारी कर्मचाऱ्यांना संघामध्ये सहभागी असण्यावर असलेली बंदी उठवण्याची मागणी करण्यात आलेली होती. शेवटी न्यायालयाने ती याचिका मान्य करीत ही बंदी उठवण्याचा निर्णय दिला व एका देशभक्त संघटनेमध्ये कुठल्याही भारतीय नागरिकांनी स्वतःहून जावे व काम करावे एवढी मुभा सरकारी कर्मचारी असल्यामुळे त्याला जर नसेल तर हे त्याच्या मौलिक अधिकाराचे हनन आहे, अशा पद्धतीची टिप्पणी न्यायालयाने केलेली आहे. ही बंदी उठायला ५० वर्षे लागल्याबद्दल न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केलेले आहे.

राष्ट्रवादी संघटनांचा आवाज काँग्रेसने ७५ वर्षांमध्ये कसा दाबून टाकला होता, हिंदुत्व हिंदुत्ववादी लोकांना कसे नामशेष करण्याचे प्रयत्न केले गेले, हिंदूंना कसे दुय्यम दर्जाचे नागरिक ठरविले गेले, हिंदूंचे देवी-देवता, श्रद्धास्थान या सर्वांनाच कमी लेखण्याचा कसा प्रयत्न केला गेला, याचे काँग्रेसचे शासन आणि मागचे ७५ वर्षे हे एक उत्तम उदाहरण आहे. काहीही असो; सरकारी कर्मचाऱ्यांवरील ही बंदी उठलेली आहे. सरकारी कर्मचारी ज्याला जनतेचे कार्य करायचे आहे त्याने संघामध्ये येऊन संघटन कसे असते, शिस्त कशी असते, देश प्रेम कसे असते, हा समाज माझा आहे त्यासाठी मी कार्य केले पाहिजे; ती भावना कशी असते, या सर्व गोष्टी शिकण्याची संधी त्यांना यानिमित्ताने मिळणार आहे. या निमित्ताने सरकारचे कामकाज अधिक चांगले व प्रभावी होण्यास मदत होईल. आजकाल अनेक कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांना वेगवेगळ्या पद्धतीचे प्रशिक्षण देत असतात. संघ ही प्रशिक्षणाची व व्यक्तिनिर्माणाची एक शाळा आहे. या शाळेमध्ये सरकारी कर्मचाऱ्यांचे स्वागतच आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### फवारणी करणे आवश्यक

सध्या पावसाळा सुरू असल्यामुळे नाल्या पाण्याने तसेच कचऱ्याने तुडुंब भरलेल्या दिसून येत आहेत. त्या नाल्यांची साफसफाई योग्य वेळेस न झाल्याने सांडपाणी रस्त्यावर येताना दिसत आहे. सोबतच रस्ताने ये-जा करणाऱ्यांना सुद्धा त्रास सहन करावा लागतो. तुंबलेल्या नाल्यांमुळे डासांचे प्रमाण वाढत आहेत. त्यामुळेच विविध प्रकारचे आजार सुद्धा होताना दिसून येत आहे. म्हणूनच नाल्यांची साफसफाई होणे आवश्यक आहे. सोबतच गावात तसेच घरोघरी फवारणी करणे सुद्धा तेवढेच आवश्यक आहे. या विषयाकडे दुर्लक्ष न करता काळजीपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे.

**संगीता संतोष ठलाल**/७८२१८१६४८५

### कर आणि मध्यमवर्गीय

नुकताच मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील पहिला अर्थसंकल्प सादर झाला. मध्यमवर्ग म्हणजे नोकरदार वर्ग पुन्हा एकदा उपेक्षित राहिला, ही भावना मध्यमवर्गाच्या मनात येणे साहजिक आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे वरचे वर १७,५०० इतकी करसूट दिसत असली तरीही ती केवळ वरच्या स्लॅबमध्ये मोडणाऱ्यांसाठी आहे. त्याशिवाय एल.टी.सी.जी., इन्व्हेस्टमेंट यावर कर वाढले. म्हणजे सामान्यांवर असलेला बोजा फारसा कमी झाला नाही. हाच वर्ग आणि प्रत्येक सोयीवर जीएसटी आणि इतर सगळे कर सुद्धा देतो. म्हणजे सामान्य नोकरदार अनेक मार्गांनी कर भरतो. अशात अनेक 'फ्रीबी' योजनांमुळे आपण दिलेल्या करातून खैरात वाटली जाते, ही भावना मध्यमवर्गाच्या लोकांमध्ये येणे स्वाभाविक आहे. मग अशावेळी मध्यमवर्गाला आयकरावर अधिक सूट देऊन जीएसटी करात अधिक बदल करणे शक्य होते. कारण जीएसटी हा जास्तीत जास्त लोकांकडून लोकांवर अधिक भार न लादता प्राप्त करता येणारा कर आहे. मध्यमवर्ग हा प्रामाणिक मतदान करणारा मोठा वर्ग आहे, त्यात सर्वात जास्त करदेयक असा वर्ग देखील आहे. त्यामुळे थेट कराचा बहुतांश बोजा मध्यमवर्गावर पडतो, ही परिस्थिती बदलावी ही अपेक्षा मध्यमवर्गाने करणे स्वाभाविक असून यावर विचार व्हायला हवा.

**रोहन बेनोडेकर**/९८६०९३४५१७

### राज्यातील धरणांची साठवण क्षमता शंकास्पद

इतिहास आणि वर्तमान नेहमीच धरणांची महती व्यक्त करीत आलेला आहे. जमिनीतील पाण्याची पातळी नियंत्रित करणे, पाणी पुरवठा, औद्योगिक व शेती सिंचन गरजा पूर्ण करणे, वीज निर्मिती, मत्स्य व्यवसाय, जलपर्यटन, जलवाहतूक, पर्यावरण आणि जैवविविधता संतुलन या आणि अशा विविध बाबतीत धरणांची अतिशय महत्त्वाची भूमिका आहे. सध्या राज्यात मराठवाडा वगळता पर्जन्यमान कुठे सरासरी तर कुठे जास्त आहे. पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर आणि मुंबई विभागांच्या धरणांतील एकूण क्षमतेच्या उपयुक्त जलसाठा ६० ते १०० टक्के असल्याचे सांगण्यात येत आहे. धरणं लवकरच ओव्हरफ्लो होताना दिसतात, ही बाब संशयास्पद वाटते. कारण दरवर्षी सुरुवातीच्या दोन-तीन पावसात अर्थात जुलै-ऑगस्ट महिन्यात धरणं भरलेली दिसतात आणि पुढील मार्च-एप्रिलमध्येच कोरड सुरू होते, आटायला लागतात आणि दुष्काळी परिस्थितीची सुरुवात होते. ही बाब पचनी पडत नाही. कारण इतकी मोठी साठवण क्षमता असताना सहा-सात महिन्यात जलसाठा या प्रमाणात कमी होणे शक्यच नाही. यामागे अनेक कारणांपैकी पाण्याचा अपव्यय, लिकेज, उपद्रवी वनस्पतीची भरमसाट व्याप्ती आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे साठवण क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात गाळ साचत राहणे आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने धरणांच्या स्वच्छता व सुरक्षेबरोबरच ठरावीक कालावधीच्या अंतराने त्यातील गाळ काढून घेतल्यास धरणांची साठवण क्षमताही ५० टक्क्यापर्यंत वाढेल आणि तो गाळ अन्यत्र सुपीकतेसाठी वापरता येईल. जलसाठा योग्य राहिल्यास धरणाच्या खालील क्षेत्रात पाणी सोडता येईल. उन्हाळ्यात दुष्काळी स्थितीची तीव्रता बऱ्याच प्रमाणात कमी होईल. राज्याच्या अर्थसंकल्पात धरण व्यवस्थापनासाठी विशेष तरतूद केल्यास राज्य टँकर मुक्त व्हायला नक्कीच मदत होईल. शासनाने याकडे गांभीर्याने बघावे

**प्रा. डॉ. विलास डोईफोडे**/सावनेर

### नवनिर्माण करणारा अर्थसंकल्प

भारताच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी सादर केलेला अर्थसंकल्प भारताला विकसित देशाच्या यादीत नेऊन बसवणारा ठरेल. या अर्थसंकल्पामुळे गरिबी, बेरोजगारी बऱ्याच प्रमाणात आटोक्यात येऊ शकेल. कर कपात काही अंशी लाभदायकच आहे. सर्वसामान्य जनतेला समोर ठेवून हा अर्थसंकल्प केला आहे. परंतु ज्येष्ठांच्या बाबतीत मात्र निराशाच पदरी आहे. किमान निवृत्ती वेतन प्राप्त करणारे खाजगी कर्मचारी मात्र अजूनही वंचित आहेत. त्यांचे निवृत्त वेतन केंद्र व राज्याने वाढवायला हवे. आजही केवळ एक हजार रुपये घेणारे निवृत्तीधारक ज्येष्ठ नागरिक आहेत; त्यांना दिलासा मिळायला हवा होता. परंतु बाकी बाबतीत हा अर्थसंकल्प नवनिर्माण करणारा ठरावा.

**मधुकर अमृत डबीर**/९८२२६१५३३१

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. निवासी संपादक: प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

# काही तथाकथितांकडून निवडणुका जवळ आल्याने विकास कामांचे उद्घाटन –आ.कैलास गोरंट्याल



जालना (प्रतिनिधी) : सत्तेत असतांना ज्यांना मतदार संघात विकास साधता आला नाही असे काही तथाकथित नेते निवडणुका जवळ आल्याने विकास कामांचे उद्घाटन करतांना दिसून येत आहे. मात्र, अशा नेत्यांना आता जनतेने चांगले ओळखले असून येत्या निवडणुकीत त्यांची जागा मतदार निश्चितपणे दाखवून देतील असा विश्वास आ. कैलास गोरंट्याल यांनी व्यक्त केला आहे.



जालना विधानसभा मतदार संघातील रामनगर येथे काल शनिवारी ५ कोटी ५ लक्ष रुपये खर्चुन रामनगर ते मानेगाव, तलाठी सज्जा कार्यालय, रस्ता व पेव्हर ब्लॉक, भूमिगत गटार योजना, रामनगर अंतर्गत सिमेंट रस्ता, श्रीक्षेत्र खंडोबा माळ मंदिर सभामंडप आणि दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत भूमिगत गटार योजनेच्या कामांचे उद्घाटन व लोकार्पण आ. कैलास गोरंट्याल यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पुढे बोलतांना आ. कैलास गोरंट्याल म्हणाले की, आपण आपल्या आमदारकीच्या कार्यकाळात केवळ विकासाला प्राधान्य दिले आहे. मतदार संघातील प्रत्येक गावात विकासाची कामे मार्गी लावण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केला आहे. मात्र, या मतदार संघातील जनतेमुळे ज्यांना दहा वर्ष आमदारकी आणि दोन वेळा राज्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली त्या काळात त्यांनी मतदार संघाच्या विकासाऐवजी स्वतःचा आणि कुटुंबाचा विकास साधण्यात धन्यता मानली. कुंभकर्ण ज्या पद्धतीने वर्षातील सहा महिने झोप घेत होता आणि सहा महिने जागत होता. तशीच काहीशी परिस्थिती या नेत्याची झाल्याचे दिसून येत आहे. निवडणुका जवळ आल्याने काही तथाकथित नेते विकास कामांचे नारळ फोडतांना दिसत असले तरी त्यांचा हा बनवाबनवीचा खेळ आता जनतेच्या लक्षात आल्याने येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत जागृत असलेला मतदार त्यांना त्यांची जागा दाखवुन देतील असा विश्वास आ. कैलास गोरंट्याल यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी कार्यक्रमास माजी जिल्हा परिषद सदस्य मुरलीधर शेजुळ, सरपंच गोपाल मोरे, जालना तालुका काँग्रेसचे अध्यक्ष वसंत जाधव, जिल्हा उपाध्यक्ष राम सावंत, उपसरपंच वसंत सोनवणे, दत्ता पाटील घुले, सोपान तिरुखे, राजू पाटील शिंदे, राम शेजुळ, लाला पा. लकडे, मनोज गुळमकर, माऊली कल्हारे, अंकुश कल्हारे, विष्णू शेजुळ, इंदुबाई मैंद, नायब तहसीलदार सोनवणे, तलाठी अंबडकर यांच्यासह रामनगरसह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त


### रामचंद्र भक्त यांच्या स्मृती दिना निमीत्त अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

शक्ती व बुद्धीचा संगम असलेले प्रसिद्ध मल्ल स्व. रामचंद्र भक्त यांच्या २४ व्या पुण्यतिथीनिमित्त सोमवारी ( ता. २९) अभिवादन करण्यात आले. नवीन जालना भागातील मुख्य बाजार पेठेत असलेल्या स्व. रामचंद्र भक्त चौक येथे आयोजित अभिवादन सभेत मान्यवरांनी त्यांच्या स्मृती व कार्यास उजाळा दिला. या वेळी प्राचार्य डॉ. दयानंद भक्त, मेघराज चौधरी, नंदकिशोर जांगडे,दीपक भुरेवाल,कन्हैयालाल वस्ताद भगत, कन्हैयालाल जांगडे,गणेश गौरक्षक, प्रा. सले, प्रा. शाम काबलिये, गणेश जाफ्राबादी, गंगालाल भुरेवाल, सावरिया जटावाले, किशोर जांगडे,हर्षानंद भक्त,गजानन जगताप, अमरचंद भक्त, ड. योगेश खर्डेकर , इंदरचंद भगत,तिलकचंद भक्त,कपिल चौधरी, सचिन भक्त,गजानन भक्त, यांच्या सह विविध क्षेत्रातील मान्यवर व समाज बांधवांची उपस्थिती होती.

### युवासेनेच्या वतीने जिल्हा प्राथमिक शाळेत वृक्षरोपण व वही पेन वाटप



**तभा वृत्तसेवा**
**तळणी/प्रतिनीधी**

मंठा तालुक्यातील तलणी येथे माजी मुख्यमंत्री शिवसेना पक्षप्रमुख मा. श्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्ताने जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाला येथे युवासेना वतीने वृक्षरोपण व विद्यार्थ्यांना वही पेन वाटप करण्यात आली यावेळी शिवसेना तालुका उपप्रमुख ज्ञानेश्वर माऊली सरकटे .युवासेना उप तालुका प्रमुख आवेश पठाण .संदीपभैय्या सरकटे.संतोष सरकटे.अशोक सरकटे .कल्याण सरकटे.भागवत कंबळकर .ज्ञानेश्वर येऊल बाळासाहेब सरकटे .सुकदेव हाणवते.गजानन पातळे.विठ्ठल कंबळकर साबेर शेख .अनिकेत देशमुख .ऋषी देशमुख .अमोल सरकटे.तणवीर पठाण ओमकार सरकटे .ओम हानवते .गजानन सरकटे.आकाश गुडघे.आकाश हाणवते राहुल भारस्कर .अभिषेक सोनुने .सिध्दांत सरकटे.जुनेद बागवान .शाहिद बागवान शुभम कंबळकर .यशवंत कंबळकर तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री धारतरकर सर. श्री गारोळे सर . श्री वराडे सर. श्री राठोड सर . श्री शिरसाट सर. श्री शिंदे सर. श्री धारतरकर सर श्री इंगळे सर युवा सेना कार्यकर्ते व व शिक्षक वृंद विद्यार्थी उपस्थित होते.

### स्थंलातरीत व असंघटीत कामगारांना शिधापत्रिकेसाठी उपस्थित रहावे

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

कामगार विभागाने ई श्रम पोर्टवरील उर्वरित नोंदणीकृत स्थंलातरीत, जे अद्यात रेशनकार्ड डेटावर नोदणीकृत नाहीत अशा कामगारांचा जिल्हानिहाय डाटा उपलब्ध करुन दिला आहे. नोंदणीकृत कामगारापैकी विनाशिधापत्रिका धारक कामगारांची यादी मंठा तहसिल कार्यालयास प्राप्त झाली असून, यादीमध्ये नमूद कामगारांना तातडीने अनुज्ञेय शिधापत्रिका व त्यावरील लाभ देण्यांत यावे असे निर्देश प्राप्त झाले आहे. तरी शिधापत्रिका धारकांनी तहसील कार्यालय येथे नमूद वेळी उपस्थित रहावे असे आवाहन तहसीलदार सोनाली जोंधळे यांनी केले आहे.

त्याअनुषंगाने मंठा तालुक्यातील नोंदणीकृत कामगारांना यांना कळविण्यांत येते की, आपणाकडे शिधापत्रिका नसल्यास शिधापत्रिका मिळणेकरिता तहसिल कार्यालय मंठा येथे दि. ३१/०७/२०२४ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०४.०० वाजेपर्यंत कॅम्प चे आयोजन करण्यांत आले आहे. सदर कॅम्प मध्ये नोंदणीकृत कामगारांना शिधापत्रिका वितरीत करणेकरिता नोंदणीकृत कामगार यांनी कुटुंबातील सर्व सदस्यांचे आधारकार्ड, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र, बँकेचे पासबुक व आवश्यक त्या कागदपत्रासह उपस्थित रहावे , असे आवाहन तहसीलदार सोनाली जोंधळे यांनी केले आहे.

## वरुड जानेफळ पंडित, जवखेडा ठेंग साबळे बरंजळा राजुर रस्त्याची २ वर्षात दुरवस्था

**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद/प्रतिनिधी**




तात्पुरता मुरूम भरून खड्डे बुजवण्याचा संबंधित ठेकेदाराचा प्रयत्न लोकांच्या विरोध मुरूम नसून डांबर टाकण्याची गरज आहे. वरुड, जानेफळ पंडित जवखेडा ठेंग ते साबळे बरंजळा राजुर जालना या रोडला कोटी रुपये खर्च करून रोडची दशा चाळणीसारखी बनली आहे. बोगस कामामुळे रस्त्याची दोन वर्षात वाट लागली. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. काटेरी झुडपांनी अनेक ठिकाणी रस्ता अरुंद झाला आहे. ठेकेदार अंतर्गत रस्त्याचे रुंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण कामासोबत मोऱ्यांचे (छोटे पूल) काम प्रस्तावित होते. त्यातील काही मोराचे जवळील डांबरीकरण खाऊन घेतले तर काही ठिकाणच्या मोऱ्यांचे काम झाले. काहींचे काम अंदाजपत्रकीय तरतुदीसाठी खोळंबून राहिले. शिवाय रस्ता एकूण पाच मीटर रुंदीचा असणे अपेक्षित असताना अनेक ठिकाणी त्यात घट होऊन साडेतीन मीटर रुंदी केला. मात्र, रस्त्याच्या प्रशासकीय मंजुरी व त्यानंतर निघालेल्या अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे 'स्टॅण्डर्ड' मापदंडात हवे तसे बदल होत गेले. त्याचा व्हायचा तो परिणाम सध्या वळविण्यात आलेल्या अतिरिक्त वाहतुकीच्या वर्दळीत दिसून येत आहे. समोरासमोर येणाऱ्या वाहनधारकांनी सतर्कता बाळगली नाही, तर अपघाताला निमंत्रण मिळते.

आता रस्त्यावर ज्या ठिकाणी अरुंद मोऱ्यांसह रस्ता अरुंद होतो, त्याठिकाणी दिशादर्शक फलक, रेडिमेड लावलेले ड्रम अथवा गतिरोधक सदृश पांढरे पट्टे असणे गरजेचे बनले आहे. जवखेडा ठेंग व जाफ्राबाद येथील सार्वजनिक बांधकाम विभागाने उपाययोजना केली नाही. त्यामुळे बोगस ठेकेदाराने बोगस काम करून दोन वर्षातच जवखेडा फाटा ते साबळे बरंजळापर्यंत अपुरा रोड असून त्यात अनेक ठिकाणी खड्डे पडले आहे काही ठिकाणी रोडही खचून चालला आहे त्यामुळे बोगस रस्त्याचे काम झाल्याने जवखेडा व साबळे येथील नागरिकांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केला आहे. जवखेडा ते साबळेपर्यंत अपुरे कामाला कधी गती मिळेल हे नागरिकांनी विचारले आहे. परंतु संबंधित ठेकेदाराने दोन वर्षात रोडचे कामही अपूर्ण ठेवले आणि त्यातच दोन वर्षात रोडची दुर्दशा पाहायला मिळाली आहे. तात्पुरता मुरूम भरून रोडची मलमत होत. असल्याचे नागरिकांतून बोलल्या जात आहे .संबंधित ठेकेदाराने रोडची डांबर टाकून खड्डे बुजवावे अशी मागणी जवखेडा येथील नागरिकांनी केली आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकूल योजना

# भोकरदन व जाफ्राबाद तालुक्यामध्ये १७८० घरकुलांना मंजुरी -आ.संतोष दानवे

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**



भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजासाठी हक्काचे घर मिळावे यासाठी राज्यसरकारच्या वतीने ''पुण्यश्लोक हिल्यादेवी होळकर घरकूल योजना'' महाराष्ट्रभर राबविण्यात येत आहे. सन २०२३-२०२४ च्या पुण्यश्लोक हिल्यादेवी होळकर घरकूल योजना लाभार्थी निवडीमध्ये राज्यसरकारने भोकरदन व जाफ्राबाद तालुक्यामध्ये एकुण १७८० घरकूलांना मान्यता दिली आहे. माजी केंद्रीय मंत्री श्री.रावसाहेब दानवे यांच्या दुरदृष्टीतुन आणि आमदार संतोष दानवे व आमदार नारायण कुचे यांच्या विशेष प्रयत्नामुळे भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर बांधवांसाठी भोकरदन तालुक्यामध्ये १२७८ तर जाफ्राबाद तालुक्यामध्ये ५०२ असे एकुण १७८० घरकुलांना मुंजरी मिळालेली आहे. त्यामुळे आगामी काळामध्ये भटक्या जमाती-क धनगर प्रवर्गातील बांधवांचे जीवनमान उंचावणार असुन त्यांना हक्काचे घर मिळाणार आहे.

भोकरदन तालुक्यामध्ये सन २०१७ ते २०२३ दरम्यान इतर सामाज घटकांसाठी प्रधानमंत्री आवास योजना, शबरी आवास योजना आणि रमाई आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजने अंतर्गत ८०९५ लाभार्थ्यांना घरकूल मंजुर झाले असुन त्यापैकी ५६३१ लाभार्थ्यांनी घराचे बांधकाम पूर्ण देखील केले आहे. तर बाकी रालिलेल प्रगतिपथावर आहे. भोकरदन-जाफ्राबाद मतदारसंघातील सर्वच समाजातील मागास घटकांना हक्काचे घर मिळावे यासाठी तालुक्याचा लोकप्रतिनिधी या नात्याने सतत पाठपुरवा करणार असल्याची ग्वाही आमदार संतोष दानवे यांनी वेळी दिली.

## इन्नरव्हील क्लब होरायझन देहदान जनजागृती प्रकल्प राबविणार– ॲड.सौ.अश्विनी धन्नावत

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



शरीरदान अर्थात देहदानाची संकल्पना अनेकांना अपरिचित असल्याने, या संकल्पनेचे महत्त्व आणि वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी ती किती आवश्यक आहे, हे पटवून देण्यासाठी कारगिल विजयी दिनाचे औचित्य साधून इन्नरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनने मरणोत्तर देहदान व अवयव दान जनजागृतीपर प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतल्याची माहिती क्लबच्या अध्यक्षा ड. अश्विनी धन्नावत यांनी दिली.

या संदर्भात अधिक माहिती देताना ड. धन्नावत यांनी सांगितले की, कारगिल युद्धात अनेक जवानांनी आपल्या प्राणाची बाजी लावली. कारगिल विजय दिनाचे औचित्य साधून आम्ही देहदान जनजागृती प्रकल्पाला सुरुवात करीत आहोत. अनेक जवानांनी देशाच्या रक्षणार्थ आपले जीवन बलिदान दिले. आपणही मरणोत्तर देह दान करून समाजाच्या काहीअंशी उपयोगी येऊ शकतो, हा संदेश आम्ही देऊ इच्छित आहे. या प्रकल्पांतर्गत देहदानाची संकल्पना, त्याची आवश्यकता आणि लाभ यासंबंधी जनजागृती करण्यात येणार आहे. त्यासाठी सर्वधर्मीय धर्मगुरू यांचा सहभाग घेतला जाणार आहे असून, महाविद्यालयीन विद्यार्थी व जनतेला मरणोत्तर देहदानाचे पटवून देण्यात येणार आहे. देहदान ही एक महत्त्वाची संकल्पना आहे. यामुळे वैद्यकीय विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणात मदत होते. त्यामुळे आमचा क्लबने या प्रकल्पाद्वारे या संकल्पनेबद्दल जनजागृती करून दुसऱ्या टप्प्यात इच्छुकांचे देहदानाबाबतचे संकल्पपत्र भरून घेण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसह संबंधित क्षेत्रातील डॉक्टरांशीही चर्चा करण्यात येणार आहे. जनजागृतीच्या माध्यमातून देहदानाल प्रोत्साहन दिले जाणार असून, यासंबंधी जागरूकता निर्माण करण्याकरिता क्लबने प्रयत्न सुरू केले आहेत, अशी माहिती सचिव ड. पिंकी लड्डा यांनी दिली.

मरावे परी 'देह'रुपी उरावे...!

'मरावे परी कीर्तीरुपी उरावे' या उक्तीप्रमाणे देहदान आणि अवयवदान करून समाजासमोर एक आदर्श ठेवला जाऊ शकतो. एका व्यक्तीच्या देहदानामुळे शेकडो शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील विविध वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना लाभ होऊ शकतो. एमबीबीएस, बीडीएस आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी वर्षाला किमान २० मानवी मृतदेहांची आवश्यकता असते. समाजामध्ये देहदानाविषयी जनजागृती होण्यासाठी या महाविद्यालयातील शरीररचनाशास्त्र विभागाकडूनही अनेक उपक्रम राबविण्यात येतात. देहदानाविषयी अंधश्रद्धा दूर करून त्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी आणि देहदान करणाऱ्या व्यक्तींना मदत करण्यासाठी आमच्या क्लबनेही पुढाकार घेतला असून, समाज घटकातून निश्चितच प्रतिसाद मिळेल, असा विश्वास क्लबच्या अध्यक्षा ड. अश्विनी धन्नावत यांनी व्यक्त केला.

## योगानंद शाळेला जाणारा सिमेंट रस्त्याचे उद्घाटन




**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

शिवसेना जालना जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल यांच्या विशेष प्रयत्नाने योगानंद शाळा परतुर येथील मुख्य रस्त्यापासून ते योगानंद शाळेला जाणारा रस्ता भूमिगत गटार योजनेमुळे चाळणी चाळणी झाला होता रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता हेच समजत नव्हते जाने-येण्याकरिता विद्यार्थी पालक व तेथील रहिवाशांना त्रास होत होता योगानंद शाळेत एकूण १५२० विद्यार्थी असून विद्यार्थी विद्यार्थिनी व पालक यांना शाळेकडे जाण्याकरिता मोठी कसरत करावी लागत होती शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल यांच्या ही गोष्ट लक्षात येताच त्यांनी तात्काळ रस्ता मंजूर करून रस्त्याचे आज उद्घाटन यांच्या हस्ते करण्यात आले या प्रसंगी शाळेचे शिक्षक ,पालक, समर्थ कॉलनी मधील रहिवासी व शाळेचे विद्यार्थ्यांनी अग्रवाल यांचा सत्कार केला.अग्रवाल यांच्या सोबत तालुकाप्रमुख अमोल सुरूंग विधानसभा संघटक विजयकुमार गिरी व्हिजेएनटी जिल्हा अध्यक्ष शिवाजीराव तरवटे, परतूर शहर प्रमुख दीपक हिवाळे अल्पसंख्याक विभागाचे तालुकाप्रमुख शेख खाजा शेख चांद व युवासेनेचे तालुकाप्रमुख अविनाश कापसे यांचीही उपस्थिती होती.

# सरपंच पुत्राचा पराक्रम, ग्रामसेविका धरत, इंजिनिअर भंडेनां हाताशी धरुण गावांच्या विकास कामांचा केला निधी हडप!

## बातम्या छापु नका स्मशानभुमीचे कामे देतो सरपंचपुत्राचे पत्रकारांना प्रलोभन!
## टक्केवारी वाटा ठेवणारा इंजिनिअर गौरव भंडे वैजोडा ग्रामपंचायतीचा रस्ता तरी माहीती आहे का?

**तभा वृत्तसेवा**
**जालना/सुरेश कवडे पाटील**



गौरव भंडे | सरपंच पुत्र रामप्रसाद गिरी | ग्रामसेविका एस . धरत

परतुर तालुक्यातील मौजे वैजोडा येथील सरपंच पुत्र रामप्रसाद गिरी आपल्या सरपंच आईच्या सरपंच पदाचा गैरफायदा घेत सरपंच आईच्या माघारी काही भ्रष्ट निखरट अधिकाऱ्यांच्या संगणमतांने मौजे वैजोडा गावाला निकृष्ठ भ्रष्ठ लाभलेल्या धरत ग्रामसेविका तसेच टक्केवारी ठेवून कामांची पाहणी न करता बिले उचलुन देणारा इंजिनिअर गौरव भंडे व सरपंच पुत्र रामप्रसाद गिरी या तिघांच्या संगणमताने वैजोडा गावातील विविध विकासकामे अहिल्यानगर येथील सिमेंट रोड व नाली बांधकामाचे बांधकाम न करता कामांचे बिल घेतले उचलुन तसेच अहिल्यानगर येथील पाणीपुरवठा योजना संपूर्ण बोगस शाषण दरबारी असलेल्या नियमानुसार न करता केवळ योजनेच्या नावाने कागदोपत्रीच निधी हडप केल्याचे माहिती अधिकार अर्जात दिसत आहे . तसेच हा सर्व प्रकार दैनिक तरुण भारतचे पत्रकार चव्हाव्यावर आणण्यासाठी विचारपुस केली असता त्यांना गावातील स्मशानभुमीचे कामे देतो अश्या स्वरूपात प्रलोभने दाखवून आपण केलेला मौजे वैजोडा गावातील भ्रष्टाचार लपवण्याचा पुन्हा एक नवा फंडा वापरला जात असल्याचे स्पष्ट दिसत आहे . या बाबत अधिकची माहिती घेण्यासाठी ग्रामसेविका यांना फोनद्वारे संपर्क साधला आसता त्यांनी फोनद्वारे कोणताही प्रतिसाद दिला नाही .

> मौजे वैजोडा गावात ग्रामसेविका धरत चार महिन्यांनंतर गावात फिरकल्या तेही एका प्रसिद्ध वृत्तवाहिनीला गावातील बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर पुन्हा आजपर्यंत जैसे थे!. विकास यादव, ग्रामस्थ वैजोडा

> सध्या मि जिल्हा परिषदेच्या एका मिटींगमध्येअसल्याने मला या बाबत सध्यातरी सविस्तरपणे सांगता येणार नाही . मि तुम्हाला उंदया माहिती घेऊन माहिती देतो.
> – गौरव भंडे जि.प.बां वि.उपअभियंता

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



बीड :- श्री संत गजानन महाराजांची पालखी सोमवारी धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरून बीड येथून गेवराईकडे प्रस्थान केले. यावेळी घेतलेले छायाचित्र. (छाया-श्रीकांत कुलकर्णी)



बीड येथील प्रतिथयश बालरोग तज्ञ डॉ.सुभाष जोशी यांची पुर्णावादी बँकेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल तरूण भारतच्या वतीने त्यांचा ऱ्हदय सत्कार करतांना जिल्हा प्रतिनिधी जगन्नाथ देशमुख

# बीड जिल्ह्यात तीन लाखाच्यावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण साठी अर्ज

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ जुलै**

बीड जिल्ह्यात तीन लाखाच्या वर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेसाठी अर्ज सादर झालेले आहेत. महिलांना आरोग्य व पोषण आणि अधिक स्वावलंबानासाठी ही योजना सुरू केली असून लाभार्थी महिलांना या अंतर्गत दर महा १५०० रुपये मिळणार आहे.

बीड जिल्ह्यात या योजनेमध्ये आतापर्यंत तीन लाखापेक्षा अधिक महिलांनी अर्ज सादर केले आहेत. सदर योजनेचे मोठ्या प्रमाणात ऑनलाईन अर्ज प्राप्त झालेले आहेत. अर्जांची ऑनलाईन छाननी सुरू आहे. तालुकास्तरीय समित्यांना लॉगइन आयडी व पासवर्ड देण्यात आलेले आहेत, अर्जाची छाननी करतांना वेगवेगळ्या लोकांनी वेगवेगळा लॉगइन आयडी वापरावा, एकच लॉगइन आयडी अनेक लोकांनी एकाच वेळी वापरु नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

स्वतः अर्जदार महिलांनी नाव मराठीत लिहिले असल्यास नाव आणि पत्ता इंग्रजीत लिहून एडिट करू घेण्याची सुविधा प मध्ये आहे.तालुकास्तरावर तहसिल कार्यालय येथे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची वॉररुम तयार करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांच्याकडून देण्यात आले आहेत.

# संत संगतीत जीवनाबरोबर समाजाचे कल्याण होते-शाम महाराज उखळीकर

**संत सावतामाळी मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहास उत्साहात प्रारंभ**

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२९ जुलै**



संत संगतीमुळे व्यक्तीगत जीवनासह समाजाचे कल्याण होते.यामुळे संसाराचा वेल सांभाळून संतांच्या सानिध्यात रहावे असे आवाहन ह.भ.प.शाम महाराज उखळीकर यांनी केले.संत शिरोमणी सावता महाराज समाधी सोहळ्यानिमीत्त परळी येथील संत सावता महाराज मंदिरात रविवार दि.२८ जुलै पासुन ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ झाला.यानिमीत्त रात्री ७ ते १० या वेळेत शाम महाराजांचे हरिकीर्तन पार पडले.

संत सावता महाराज समाधी सोहळ्यानिमीत्त परळी येथील संत सावतामाळी मंदिरात सुरु असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात पहाटे ४ ते ६ काकडा भजन,७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण,११ ते १ गाथा भजन,२ ते ४ श्री संत सावता महाराज चरित्र,५ ते ६ धुपारती,रात्री ७ ते ९ हरिकीर्तन, १० ते १२ जागर असे कार्यक्रम होत आहेत.रविवार दि.२८ जुलै रोजी हरिकिर्तनाची सेवा सादर करताना ह.भ.प.शाम महाराज यांनी संत ज्ञानेश्वरांनी पाया रचलेला वारकरी सांप्रदाय हा विठ्ठल भक्ती व त्यातुन समाजाचे कल्याण तर संत सावतामाळी यांनी आपण संसार,कष्ट करतानाही विठ्ठल भक्ती करता येते हे दाखवुन दिले असल्याचे सांगितले.या सप्ताहात दि.३१ जुलै रोजी ह.भ.प.जगन्नाथ महाराज देशमुख,दि.०१ ऑगस्ट रोजी ह.भ.प.रामकृष्ण महाराज रंधवे,दि.०२ ऑगस्ट रोजी ह.भ.प.अर्जुन महाराज लाड,दि.०३ ऑगस्ट रोजी ह.भ.प.अच्युत महाराज दस्तापुरकर यांचे हरिकीर्तन होणार आहे.

# ३१ जुलै रोजी अंबाजोगाईत स्वर सुमनांजली कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२९ जुलै**



कलाकार कट्टा,अंबाजोगाई प्रस्तुत स्व. मोहम्मद रफी, स्व. किशोरकुमार व स्व. मुकेश यांच्या स्मृतीत 'वो जब याद आए बहुत याद आए' स्वरसुमनांजली कार्यक्रम दि.३१जुलै २४ रोजी सायं. ६ वा.बाळशास्त्री जांभेकर पत्रकार भवन, नगर परिषद अंबाजोगाई आयोजित करण्यात आला आहे. रसिक मंडळ अंबाजोगाई,वसुंधरा सेवा प्रतिष्ठान व मराठी पत्रकार परिषद शाखा अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम संपन्न होत असून या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून उपविभागीय अधिकारी श्री दीपक वजाळे साहेब, गटविकास अधिकारी श्रीमती समृद्धी दिवाने काळे, पुरवठा अधिकारी मिलिंदजी गायकवाड, संजय गंभीरे, मा. नगराध्यक्ष महादू मस्के व अध्यक्षस्थानी जेष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा यांची उपस्थिती असणार आहे. या स्वरसमनांजली कार्यक्रमांमध्ये स्वर्गीय रफी साहेब स्वर्गीय मुकेश जी व स्वर्गीय किशोर कुमार यांची सदाबहार गाणी अंबाजोगाई येथील सर्व कलावंत सादर करणार असून यानिमित्ताने अनेक नव्या जुन्या कलावंतांना व्यासपीठ निर्माण होणार आहे. अंबाजोगाई व परिसरातील शालेय महाविद्यालयीन व विविध व्यवसायामध्ये कार्यरत असणाऱ्या इच्छुक कलावंतांसाठी कलाकार कट्टा व रसिक मंडळ सदैव कार्यरत असणार असून या निमित्ताने अनेक कलावंतांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असणार आहे. दिनांक ३१ जुलै २०२४ रोजी आयोजित केलेल्या स्वर सुमनांजली या कार्यक्रमासाठी सर्व कलावंत रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन कलाकार कट्टा चे संस्थापक अध्यक्ष तालमार्तंड प्रकाश बोरगावकर रसिक मंडळाचे अध्यक्ष डॉ.श्रीनिवास रेड्डी, मराठी पत्रकार परिषदेचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष श्री दत्ता आंबेकर, गजानन मुडेगावकर सूत्रसंचालन श्री परमेश्वर गीते, तुकाराम सुवर्णकार, अभय जोशी, अनंत आरसुडे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# मुंबई येथील नेहरू विज्ञान केंद्राची फिरते विज्ञान प्रदर्शन अंबाजोगाईत

## ३१ जुलै ते १५ ऑगस्ट या काळात विविध शाळांमधील विद्यार्थ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२९ जुलै**




योगेश्वरी शिक्षण संस्था अंबाजोगाई संचालित पपू बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्र यांच्या पुढाकाराने मुंबई येथील नेहरू सायन्स सेंटर यांची चेलळश्रश डलळशपलश तरप (फिरती विज्ञान प्रयोगशाळा) या उपक्रमाच्या अंतर्गत अनेक शाळांमधून कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. ३१ जुलै ते १५ ऑगस्ट २०२४ या कालावधीत होणाऱ्या या कार्यक्रमांत अंबाजोगाई परिसरातील अनेक शाळांमधील विद्यार्थ्यांना हे फिरते विज्ञान प्रदर्शन प्रत्यक्षात अनुभवता येणार आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मुंबई सारख्या ठिकाणी जाऊन विज्ञानाचे नाविन्यपुर्ण उपक्रम अनुभवता येत नाहीत. यासाठी अंबाजोगाई व परिसरात अशा प्रकारचे विज्ञानप्रसाराचे उपक्रम राबवण्यासाठी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून योगेश्वरी शिक्षण संस्था नेहमीच पुढाकार घेत असते. मुंबई येथील नेहरू विज्ञान केंद्राकडे विविध विषयावर महाराष्ट्रभर विज्ञान प्रसार करणाऱ्या ४५ गाड्या असुन त्यापैकी एक गाडी अंबाजोगाईच्या विद्यार्थ्यांसाठी आणण्याच्या प्रक्रियेत योगेश्वरी संस्थेच्या प्रयत्नांना यश मिळाले आहे. बीड जिल्ह्यात ही गाडी पहिल्यांदाच येत आहे. यासाठी मुंबईच्या नेहरू विज्ञान केंद्राचे संचालक श्री उमेशकुमार रस्तोगी आणि शिक्षण अधिकारी श्री डी एस धार्मिक यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

या गाडीत ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी स्वास्थविज्ञान व स्वच्छता (Hygiene and Sanitation) याविषयीचे प्रदर्शन ठेवण्यात आले आहेत. विद्यार्थी प्रत्यक्ष गाडीत जाऊन आणि गाडीभोवती फिरून हे प्रयोग पाहू शकतील. तसेच यावेळी मनोरंजनातून आणि खेळातून विज्ञान समजून सांगणारे प्रयोग विद्यार्थ्यांना दाखवले जातील.

योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या सर्व शाळांमध्ये हा उपक्रम राबवला जाणार असून त्यासोबतच सोमेश्वर कन्या व मुलांचे विद्यालय घाटनांदूर , संभाजीराव बडगीरे विद्यालय ममदापूर, महाराष्ट्र विद्यालय मोहा, आसूबाई विद्यालय मांडेखेल, खोलेश्वर विद्यालय अंबाजोगाई, विवेकानंद बालक विद्यामंदिर अंबाजोगाई अशा विविध शाळांमधील विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होणार आहेत. भविष्यात नेहरू विज्ञान केंद्राच्या विज्ञान प्रसार करणाऱ्या गाड्यांच्या सहकार्याने विविध उपक्रम राबवण्याचा संस्थेचा मानस आहे. या उपक्रमांत सहभागी होण्यासाठी इच्छुक शिक्षकांनी व शाळांनी पपू. बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्राशी जोडून घ्यावे असे आवाहन विज्ञान केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

हेमंत धानोरकर ९९६००९६०६२
गणेश कदम - ८६६८६९७८२७

# धक्कादायक : दिड महिन्यापासून शाळेत गणिताचा शिक्षक नाही : राडीतील विद्यार्थ्यांचं भवितव्य अंधारात

**गणिताचे शिक्षक द्या : राडीच्या विद्यार्थ्यांनी गटशिक्षणाधिकारी कार्यालयात भरवली शाळा**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२९ जुलै**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शालेय शिक्षण विभाग मोठ्या प्रमाणात उपाययोजना करीत असताना अंबाजोगाई तालुक्यात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गेल्या दिड महिन्यापासून राडी येथील जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळेत गणिताचा शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांचं भवितव्य अंधारात गेले आहे. वेळोवेळी मागणी, निवेदने, पत्रव्यवहार करून देखील गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने या विद्यार्थ्यांकडे ढुंकूनही पाहिले नाही. अखेर विद्यार्थ्यांचा आणि राडी गावातील ग्रामस्थांचा संयम तूटला आणि थेट त्यांनी गटशिक्षणाधिकारी कार्यालय गाठले.

आठवड्याच्या पहिल्याच दिवशी म्हणजे आज सोमवार दिनांक २९ जुलै रोजी राडी येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील विद्यार्थी गटशिक्षणाधिकारी कार्यालयात शाळा भरवीत धडे गिरवू लागले. दरम्यान, शाळेतील विद्यार्थी गटशिक्षणाधिकारी कार्यालयात आल्याने कार्यालयातील कर्मचाऱ्यांची चांगलीच धावपळ झाली. तब्बल तीन ते चार तास विद्यार्थी गटशिक्षणाधिकारी कार्यालयात गणिताच्या शिक्षकासाठी तळ ठोकून होते.

गटशिक्षणाधिकारी कार्यालयात बसलेले राडी येथील शाळेतील विद्यार्थी कार्यालयातील अधिकाऱ्यांनी दिले आश्वासन

राडी येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी गटशिक्षणाधिकारी कार्यालयात शाळा भरवली असता कार्यालयातील अधिकाऱ्यांनी विद्यार्थी आणि पालकांशी संवाद साधला. विद्यार्थी आणि पालकांची मागणी तात्काळ बीड येथील शिक्षणाधिकारी कार्यालयाला कळविण्यात येईल आणि तातडीने शाळेत गणिताचा शिक्षक देण्यात येईल, असे आश्वासन विद्यार्थी आणि पालकांना गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आले. यावेळी विद्यार्थी आणि पालकांनी गटशिक्षणाधिकारी यांना लेखी निवेदनही दिले. आश्वासनानंतर विद्यार्थी परत राडी गावातील शाळेकडे रवाना झाले.



पुर्णावादी बँकेच्या अध्यक्षपदी डॉ.सुभाष जोशी यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करतांना प्रतिष्ठीत व्यापारी प्रदिप मुळे यांनी डॉ.सुभाष जोशी यांचा सत्कार केला.

# जन शिक्षण संस्थान बीडच्या प्रशिक्षार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तुंना ऑनलाईन मार्केटमध्ये स्थान

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ जुलै**



कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार द्वारा जन शिक्षण संस्थान बीडच्या वतीने बीड जिल्ह्यात वेगवेगळे कौशल्य विषयक प्रशिक्षण देण्याचे कार्य सुरू असून आत्तापर्यंत जवळपास ४३ हजार पेक्षा जास्त लोकांनी टेलरिंग पार्लर हँड एम्ब्रोईडरी, ज्वेलरी, कापडी व जूट बॅग तयार करणे इलेक्ट्रिकल टेक्निशियन ,टू व्हीलर रिपेअरिंग संगणक इत्यादी प्रकारचे प्रशिक्षण दिलेले असून अनेक प्रशिक्षार्थींनी आपले स्वतःचे उद्योग व्यवसाय सुरू केलेले आहेत काही प्रशिक्षार्थ्यांनी *भारतरत्न नानाजी देशमुख उपजीविका केंद्र* अंतर्गत त्यांचे उद्योग सुरू केले आहेत या सर्व उद्योजकांना मार्केट उपलब्ध करून देण्यासाठी जन शिक्षण संस्थान बीडचे अध्यक्ष डॉ. उपेंद्र जी कुलकर्णी सामाजिक कार्यकर्त्या सौ संध्याताई कुलकर्णी, संचालक श्री गंगाधरजी देशमुख व सर्व अधिकारी सतत प्रयत्न करत असतात.

दिनांक २७ जुलै २०२४ रोजी छाया कार्ट. चे.श्री मंदार जी कुलकर्णी,श्री हेमंत जी सेलमोहकर ,श्री नरेंद्रजी वैशंपायन व सौ संध्याताई कुलकर्णी यांनी जन शिक्षण संस्थान बीड येथील कार्यालयात सर्व उद्योजकांना छाया कार्ट अंतर्गत आपले स्वतःचे उत्पादनाची विक्री व्यवस्था कशी करता येईल व त्यासाठी आपल्या उत्पादनाची गुणवत्ता व त्यातील सातत्य, पॅकिंग, आकर्षकता, स्वच्छता, टापटीप व सफाईदारपणा इत्यादी संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी बीड शहरासह केज, धारूर ,अंबाजोगाई ,माजलगाव, गेवराई ,शिरूर ,पाटोदा इत्यादी तालुक्यातून ४५ उद्योजक महिला त्यांनी तयार केलेले खाद्यपदार्थ ज्वेलरी , हॅन्ड एम्ब्रोईडरीच्या वस्तू मॅक्रोम निटिंग व क्रोशिया, साडीपेटिकोट, बेबी किट इत्यादी प्रकारच्या वस्तू सोबत घेऊन आल्या होत्या . सर्व उद्योजकांनी आपापल्या उत्पादनाविषयी छाया कार्ट च्या अधिकाऱ्यांना सविस्तर माहिती सांगितली .हे सर्व पाहून व ऐकून छाया कार्ट चे सर्व अधिकारी जन शिक्षण संस्थान बीडच्या कार्यावर प्रभावित झाले.

हा सर्व योग घडवून आणण्यासाठी जन शिक्षण संस्थान बीडचे अध्यक्ष डॉ. उपेंद्रजी कुलकर्णी, सौ संध्याताई कुलकर्णी , संचालक श्री गंगाधर जी देशमुख यांनी विशेष प्रयत्न केले.यावेळी डॉ उपेंद्र जी कुलकर्णी, संध्याताई कुलकर्णी,पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ सुभाष जी जोशी, नानाजी देशमुख विद्या मंदिर शालेय समिती सचिव डॉ.सीमाताई जोशी,संचालक श्री गंगाधर जी देशमुख, कृषी विज्ञान केंद्र डिघोळअंबा चे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख श्री वसंतराव देशमुख यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी सौ सीमा मनुरकर यांनी केले.तर आभार सहायक कार्यक्रम अधिकारी सौ स्वाती जैन यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जन शिक्षण संस्थान बीडच्या सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

### टि.सी हरवला आहे

प्रशांत उत्तम सारुक यांचा दहावी पासचा टि.सी. केज ते चिंचोली माळी दि. २५/०७/२०२४ रोजी प्रवासा दरम्यान हरवला आहे तरी सापडल्यास संपर्क साधा मो. ९९७०३६९७९८

# जीवन जगत असताना चांगले कर्म केले तर जीवनाचा अस्त चांगला होतो-पूज्य भदंत धम्मशिल थेरो

**श्रावस्ती बुद्ध विहार येथे साप्ताहिकं बुद्ध वंदना संपन्न**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ जुलै**



शहरा जवळ असलेल्या केसापुरी कॅम्प येथील श्रावस्ती बुद्ध विहार येथे दिनांक २८ जुलै रोजी १० वाजता साप्ताहिकं बुद्ध वंदना पूज्य भिख्खू धम्मशील थेरो यांच्या धम्मदेशनेने संपन्न झाली.

दर रविवारी श्रावस्ती बुद्ध विहार येथे सद्धम्म सेवा संघाच्या वतीने साप्ताहिक बुद्ध वंदनेचे आयोजन करण्यात येते. या साप्ताहिक वंदनेच्या वेळी शहरातील बौद्ध उपासिका उपासक यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होते.भदंत धम्मशिल थेरो यांनी उपस्थित उपासकाना धम्मदेशना दिली. यामध्ये त्यांनी सांगितले की, आज श्रावस्ती बुद्ध विहार येथे साप्ताहिक बुद्ध वंदना आणि १२ वा वर्षावास हे दोन्ही कार्यक्रम येथे सूरू आहेत.

यातून धम्म प्रचाराचे काम मोठ्याप्रमाणावर होत आहे. तसेच धम्मशिल भंते यांनी पंचशील म्हणजे काय? हे पटवून दिले. तसेच जीवन जगत असताना व्यक्तीने चांगले काम केले पाहिजे. भविष्यातील जीवनाचा अस्त चांगला होतो. चोरी करु नये, खोटे बोलू नये, व्यभीचार करु नये, हे सुंदर उदाहरण देऊन उपस्थित उपासक यांना पूज्य भिख्खू धम्मशिल थेरो यांनी पटवून दिले. यावेळी उपस्थित उपासक यांनी मन लाऊन धम्मदेशना ग्रहण केली.साप्ताहिक बुद्ध वंदना कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्याध्यक्ष आयु.भगवान सातपुते यांनी केले. तर सूत्रसंचालन गौतम घनघाव यांनी केले. तर,आभार आयु. पांडुरंग जाधव यांनी मानले.तसेच या वेळी सद् धम्म सेवा संघाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. शेवटी शरणत्य घेऊन साप्ताहिक बुद्ध वंदना संपन्न झाली.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पक्षाने संधी दिल्यास हिंगोली विधानसभा मतदारसंघातून लढणार– रामदास पाटील

## हरित हिंगोलीसाठी एक पेड माँ के नाम अभियान राबविणार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जुलै**

मी पक्षाच्या आदेशावर चालणारा कार्यकर्ता आहे. त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकांमध्ये लोकसभा क्षेत्रातील कोणत्याही विधानसभा क्षेत्रातून मला पक्षाने निवडणुक लढविण्यास सांगितल्यास मी तयार आहे. परंतु सर्वाधिक कार्यकाळ हिंगोलीत घातलेला असल्यामुळे माझे हिंगोली विधानसभा लढण्यास प्राधान्य असेल असे उत्तर पत्रकारांच्या प्रश्नाला दिले. प्रथमच रामदास पाटील यांनी विधानसभेसाठी इच्छुक असल्याचे जाहीर केल्यामुळे येणाऱ्या काळात विविध राजकीय घडामोडी घडण्याचे संकेत दिसत आहेत.

राष्ट्रऋषी भारतरत्न नानाजी देशमुख चॅरिटेबल ट्रस्ट आणि भाजप लोकसभा प्रमुख रामदास पाटील सुमठाणकर यांच्या संयुक्त विद्यमाने हरित हिंगोलीसाठी एक पेड माँ के नाम या अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी रामदास पाटील यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी बोलतांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त शहरात एक पेड माँ के नाम अभियान राबविण्यात येणार असून यासाठी ११ हजार विविध वृक्षांचे रोपांचे वाटप सेवाभावी संस्था, शाळा, महाविद्यालय, निसर्गप्रेमी नागरिक यांना देण्यात येणार आहेत. ही सेवा घरपोच होणार असून यासाठी इच्छुकांनी मागणी केल्यास त्यांना रोपे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पर्यावरणाचे संतुलन साधणे आणि हरित हिंगोली करण्याचा प्रयत्न करण्यासाठी हे अभियान राबवण्यात येत आहे. ज्यांना रोपे वाटप करण्यात आली त्यांना संवर्धनाची जबाबदाराही घ्यावी लागणार आहे. या रोपांची तपासणी पुढील वर्षी होणार असल्याचे यावेळी रामदास पाटील यांनी सांगितले. झाडे जगविण्यासाठी पावसाळ्यानंतर टँकरने पाणीपुरवठा करण्याची व्यवस्थाही केल्या जाणार आहे.

यावेळी पत्रकारांनी विधानसभा निवडणुक लढण्यास इच्छुक आहात का या प्रश्नाला उत्तर देतांना त्यांनी मी पक्षाच्या आदेशावर चालणारा कार्यकर्ता आहे. त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकांमध्ये लोकसभा क्षेत्रातील कोणत्याही विधानसभा क्षेत्रातून मला पक्षाने निवडणुक लढविण्यास सांगितल्यास मी तयार आहे. परंतु सर्वाधिक कार्यकाळ हिंगोलीत घातलेला असल्यामुळे माझे हिंगोली विधानसभा लढण्यास प्राधान्य असेल असे त्यांनी सांगितले. त्यामुळे राजकीय वर्तुळात याचे पडसाद उमटणार असल्याचे दिसत आहे.

दरम्यान, रामदास पाटील सुमठाणकर हे लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे प्रबळ दावेदार मानले जात होते. परंतु शिंदे गटाला ही जागा सुटल्याने रामदास पाटील यांची पुढील दिशा काय असेल याबद्दल तर्कवितर्क लढविल्या जात होते. त्यातच मागील काही दिवसांपासून हिंगोली विधानसभा मतदारसंघात त्यांनी लक्ष केंद्रीत केल्याचे दिसत आहे.

# आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेहस्ते गुरूपूजनाचा कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जुलै**

शहरातील महावीर भवन येथे गुरुपोर्णिमेचे औचित्य साधून गुरुपुजनाचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. तान्हाजीराव मुटकुळे तर प्रमुख पाहुणे म्हणून व मार्गदर्शक म्हणून माजी आमदार श्रीकांत जोशी उपस्थित होते.

शैक्षणिक क्षेत्रात योगदान देणारे श्री विश्वनाथराव कोल्हाळ, ग्यानदेवराव जगताप, श्रीमती रेणुकाताई व्यास, शेख इम्तियाज आणि प्रकाश कांबळे या गुरुजनांचा आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेकडून शेला, टोपी देवून पाद्यपुजन करण्यात आले. या प्रसंगी उपस्थित शिक्षकवृंदांचा साने गुरुजींची प्रतिमा देऊन यथोचीत सन्मान करण्यात आला. पावसाचे वातावरण असुनही बहुसंख्य शिक्षक कार्यक्रमास उपस्थित राहिले. त्याबद्दल आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी उपस्थित सर्व शिक्षक बांधव-भगिनींचे आभार मानले. यावेळी बोलातांना आ. मुटकुळे म्हणाले की, समाजाला दिशा देणारा घटक शिक्षक असून त्यांच्या कार्याचा गौरव झला पाहीजे या उद्देशाने गुरूपोर्णिमेचे औचित्य साधून गुरूजनांचा आदर आणि कृतज्ञा व्यक्त करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री दुर्गादास साकळे यांनी केले तर सुत्रसंचालन श्री गणेश येवले यांनी केली. यावेळेस व्यासपीठावर माझी नगराध्यक्ष बाबारावजी बांगर युवा जिल्हाध्यक्ष पप्पू चव्हाण,तालुकाध्यक्ष माणिक लोडे, शहर अध्यक्ष कैलासचंद्र काबरा, महिला शहराध्यक्ष अलका लोखंडे, सौ ज्योती वाघमारे, सौ कृष्णा रुहितीया, शिवाजी मुटकुळे, हिम्मत राठोड, सतीश खाडे, संजय कावडे, के के शिंदे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षकवृंद यांच्यासह हमीद प्यारेवाले, मनोज शर्मा, गुड्डू देवकते, आशिष जयस्वाल, मंदाकिनी चव्हाण, गीता मांदळे, आशिष शर्मा, रजनीश पुरोहित, जितू शाहू आदी पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त उपजिल्हाप्रमुख गणेश शिंदे यांच्याकडून अंध विद्यालय, सेवासदनला आर्थिक मदत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ जुलै**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व खा. नागेश पाटील आष्टीकर यांच्या वाढदिवसानिमित्त हिंगोली उपजिल्हाप्रमुख गणेश शिंदे यांनी मातोश्री गंगादेवी देवडा निवासी अंध मुलांचे विद्यालय व सेवासदन मुलांच्या वस्तीगृहासाठी इन्व्हर्टरसाठी प्रत्येकी ११ हजार रुपयांची आर्थिक मदत भेट दिली.



शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व हिंगोली लोकसभेचे महाविकास आघाडीचे शिवसेनेचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या वाढदिवसानिमित्त २७ जुलै रोजी हिंगोली उपजिल्हाप्रमुख गणेश शिंदे यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत मातोश्री गंगादेवी देवडा निवासी अंध मुलांचे विद्यालयात इन्व्हर्टरसाठी ११ हजार रुपये रोख रक्कम देऊन येथील विद्यार्थ्यांसाठी जेवणही दिले. सेवासदन मुलांच्या वस्तीगृहासाठीही इन्व्हर्टरसाठी ११ हजार रुपयांची आर्थिक मदत भेट दिली. तसेच सेवासदनच्या विद्यार्थ्यांसोबत केक कापून शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचा वाढदिवस साजरा केला. सेवासदनच्या परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले. गणेश शिंदे यांनी सामाजिक उपक्रम राबवून वाढदिवस साजरा केल्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख गोपू पाटील, उपजिल्हाप्रमुख उध्दवराव गायकवाड, शेतकरी सेनेचे प्रदेश संघटक वसीम देशमुख, युवासेना विस्तारक दिलीप घुगे, उपजिल्हासंघटक शंकर घुगे, परमेश्वर मांडगे, तालुकाप्रमुख भानुदास जाधव, तालुकाप्रमुख आनंदराव जगताप, पुंजाजी मुळे, संदीप तनपुरे बबनराव गाडे, बालाजी गावंडे, गणेश गावंडे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



**हिंगोली– मागील सहा दिवसांपासून १०० टक्के अनुदानासाठी शिक्षक समन्वय संघाच्यावतीने येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिक्षकांचे भरपावसात आमरण उपोषण सुरू होते. भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी मध्यस्थी करीत शिक्षकांच्या मागण्या लेखी आश्वासन दिल्यानंतर शिक्षकांनी उपोषण मागे घेतले. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### दलीत वस्तीतील रस्त्याचे काम अर्धवट



हिंगोली– खानापूर चित्ता येथील दलीत वस्ती योजनेंतर्गत सिमेंट रस्ता तसेच दलीत वस्तीतून जिल्हा परिषद प्रशालेकडे जाणारा रस्त्याचे काम अर्धवट करून बिले उचलली असल्याची तक्रार गटविकास अधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. दोन वर्षापूर्वी दलीत वस्ती योजनेतून रस्त्यासाठी निधी मंजुर करण्यात आला होता परंतु संबंधीत गुत्तेदारान थातुरमातूर रस्ता बांधल्याने या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहेत. या रस्त्याचे काम नव्याने करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर कृष्णा पवार, चांदू जाधव, ओंकार टवले, सूमीत दवणे, संघपाल कांबळे, अनील काशिदे, मारोती जाधव, राजु पाईकराव, गंगाधर दवणे, प्रशांत पाईकराव, भगवान पवार आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# लोकन्यालयात १२ कोटी ५३ लाखांची ५३५ प्रकरणे निकाली

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जुलै**

येथील तालुका विधी सेवा समिती, सर्वोच्च न्यायालय तसेच मुंबई उच्च न्यायालय व परभणी जिल्हा न्यायालय तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या मार्गदर्शनाखाली हिंगोली न्यायालयामध्ये दि.२७ जुलै, २०२४ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोकन्यायालयामध्ये प्रलंबित असलेली २३९५ प्रकरणे तसेच विद्युत महावितरण कंपनी, विविध बँका, ग्रामपंचायत व नगरपालिका यांची वाद दाखलपूर्व ५७६३ प्रकरणे तडजोडीसाठी लोकअदालतीमध्ये ठेवण्यात आली होती. या लोकअदालतीमध्ये प्रलंबित २२३ व वाद दाखलपूर्व ३१२ असे एकूण ५३५ प्रकरणे निकाली काढण्यात आली. या लोकन्यायालयात तडजोडी आधारे प्रलंबित व दाखलपूर्व प्रकरणात तब्बल १२ कोटी ५३ लाख ७८ हजार ५७९ रुपयांची प्रकरणे निकाली काढण्यात आले.

या लोकन्यायालयासाठी हिंगोली येथे न्यायिक अधिकारी तसेच विधीज्ञ समाविष्ट असलेली पाच पॅनल तयार करण्यात आले होते. या लोकअदालतीमध्ये जिल्हा न्यायाधीश-१ तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष आर. व्ही. लोखंडे यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हा न्यायाधीश-१ आर. व्ही. लोखंडे, जिल्हा न्यायाधीश-३ श्रीमती एस. एन. गाडेकर-माने, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर जी. के. नंदनवार, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर डी. यु. राजपूत, श्रीमती पी. आर. पमनानी यांनी पॅनल प्रमुख म्हणून काम केले. ही लोकअदालत यशस्वी करण्यासाठी तदर्थ जिल्हा न्यायाधीश पी. जी. देशमुख, सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर श्रीमती व्ही. व्ही. सावरकर, सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर आय. जे. ठाकरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या लोकअदालतीला वकील संघाचे अध्यक्ष अॅड शिवशंकर साबळे, सचिव अॅड अजय वानखेडे, वकील संघाचे सर्व सभासद, न्यायालयीन व पोलीस कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# भावसार समाज मंदिर सभागृहाचे आ. राजू नवघरेंच्या हस्ते भूमीपूजन



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २९ जुलै**

शहरातील भावसार समाजाच्या समाज मंदिर परिसरात सभागृहासाठी राष्ट्रवादीचे आ. राजू नवघरे यांनी ३० लक्ष रूपयांचा निधी दिला असून या सभागृहाचे भूमीपूजन त्यांचेहस्ते करण्यात आले. यावेळी भावसार समाजाच्या आंबिल या कार्यक्रमात त्यांनी सहभाग घेतला.

वर्षानुवर्ष चालत आलेली परंपरा म्हणजे आंबिल भावसार क्षत्रिय पंचवाडा येथे आंबिल हा कार्यक्रम मोठया उत्साहात साजरा करण्यात आला . आंबिल म्हणजे आषाढात साजरा करण्यात येणारा परंपरागत देवीचा उत्सव. यात पावसाळ्यात येणारी पालवीची पूजा केली जाते. हा पावसाळा भरभरून धनधान्य देवो . रोगराई जवळ न येवो म्हणून जलदेवतेची पूजा मिरवणूक काढून साजरी केली जाते. पुढील काळात पाण्याची कमतरता न राहो यासाठी ही पूजा केली जाते. भावसार पंचवाडयात समाजातील विविध कार्यक्रम व सामाजिक कार्यक्रम होतात. यात गणेशोत्सव नवरात्रौत्सव आंबिल याप्रसंगी सर्व भावसार समाज बांधव एकत्रित येऊन मोठया उत्साहात हे सण साजरे करतात. समाजातीललोकांच्या अडीअडचणी सुद्धा समाजातील जेष्ठ बांधव व पंच मिळून सोडवतात. यावेळी बालूमामा ढोरे, त्र्यंबक कदम, व सचिन दगडू, भावसार समाज बांधव मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी भावसार समाजाने आ. नवघरे यांचे आभार मानले.

# औंढा बसस्थानकाच्या विस्तारीकरणाचे घाईगडबडीत होत असल्याने दर्जाबाबत प्रश्नचिन्ह, प्रवाशांची हेळसांड

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, २९ जुलै**



येथे बस स्थानकाचे विस्तारित करण्याचे काम प्रगतीपथावर असून सदर होणारे काम हे प्रवासी वाहक यांच्यासाठी त्रासदायक व कष्टदायक होत असल्याचे दिसून येत आहे. गुत्तेदाराने एकच वेळी सर्व काम चालू केल्याने प्रवाशांना उभे राहण्यासाठी अपुरी जागा राहीली आहे.

बस स्थानकाच्या रिकाम्या जागी सिमेंटच्या बैग ठेवुन असलेली रिकामी जागा ही भरून काढली. प्रवाशांना भर पावसात अपुरी उभे राहावे लागत आहे ठेवलेल्या बॅगांमधील सिमेंट उडवून प्रवाशांचे कपडेसह सामानही खराब होत असल्याचे दिसून येत आहे. बसवाहकांना आपल्या बसेस उभे करण्यासाठी कुठेही जागा न ठेवल्याने प्रवाशांना बांधकामाचा साहित्यावरून चालत जाऊन बस पकडावी लागत आहे शिवाय बांधकामासाठी साहित्य व वाहने येत असल्याकारणाने बस स्थानकामध्ये अक्षरशः चिखल झाल्याचे दृश्य दिसून येत आहेत त्यामुळे वृद्ध नागरिक व शालेय विद्यार्थ्यांना नाहक त्रास होत असल्याचे दिसून येत आहे.

सदर कामात डस्टचा वापर करण्यात येत आहे. जुन्या इमारतींच्या गाळ्या शेजारी नवीन गाळे बांधकाम सुरू केले असून त्या भागात जमीन लेवल न करता बांधकामाला सुरुवात केली आहे सदर जमीन ही काळी व भुसभुशीत असल्याने इमारतीची उंची व लोड पहाता या ठिकाणी कौलम कमीत कमी ७/८ फुटखोल खड्डे करून घेणे आवश्यक होते परंतु सदर कौलम ३/४ फुटा वर घेतले. बांधकाम च्या मधोमध एक नाला असुन तो नाला पावसाळ्यामध्ये मधे नेहमीच भरून वाहत असतो. त्यामुळे या नाल्याला वळन देउन कामाला सुरुवात करायला पाहिजे होती परंतु तसे करण्यात आले नसल्याचे दिसत आहे. बसस्थानकात बांधकामाचे साहित्य टाकल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे.

# गोरेगाव येथे भरपावसात काँग्रेसचा कार्यकर्ता मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जुलै**



काँग्रेसचे माजी आमदार यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित केला होता. यावेळी अचानक जोरदार पाऊस सुरू झाला परंतु काँग्रेस कार्यक्त्यांनी पावसाची परवा न करता हातातील छत्र्या उघडून हा मेळावा यशस्वी केला.

हिंगोली जिल्ह्यातील गोरेगावयेथे बाबुराव पाटील उच्च माध्यमिक महाविद्यालयाच्या मैदानात शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी संदर्भात तसेच हिंगोली विधानसभा मतदारसंघातील ब्लॉक काँग्रेस कमिटी, बुथ कमिटी, आघाडी संघटना विभाग तसेच सेल यांची विधानसभेच्या पाठविणे यासाठी बैठक घेण्यात आली. यावेळी माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांचे भाषण सुरू असतांना अचानक जोरदार पाऊस सुरू झाला परंतु कार्यकर्त्यांनी पावसाची पर्वा न करता या मेळाव्यात हातातील छत्र्या उघडून मेळावा संपेपर्यत उपस्थिती दर्शवली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लोकसभा प्रभारी अॅड सचिन नाईक, रणजीत पाटील गोरेगावकर, जिल्हा अध्यक्ष दिलीप देसाई, भास्करराव बेंगाळ, बापूराव पाटील, पवन उपाध्ये, द्वारकादास सारडा, कांतराव हराळ, मदन पाटील, भैय्या देशमुख, संतोष जगताप, बालाजी गावंडे, गजानन पोहकर कार्यकर्ते उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# आयबीपीएसच्या अटी विवाहीतांसाठी ठरताहेत जाचक

## ओळखीचा पुरावा असतानाही अनेक विवाहित महिला उमेदवार परीक्षेपासून वंचित

**सुरेश काशिदे**
**नांदेड, २९ जुलै -**

आयबीपीएसच्या माध्यमातून जिल्हा परिषदेच्या विविध पदासाठी परीक्षा घेण्यात येत आहेत. परंतु या परीक्षेसाठी असलेली ओळख पत्राची अट विवाहित महिला उमेदवारांसाठी जाचक ठरत असल्याने अनेक विवाहित महिला उमेदवारांना परीक्षेपासून वंचित राहावे लागत आहे.

### जिल्हा परिषद भरती प्रक्रिया

आयबीपीएसने परीक्षेसाठी आधार, पॅन, बँक पासबुक आदी अनेक ओळखीचे पुरावे दिले आहेत. हे पुरावे पुरुष उमेदवारांसाठी सहज असले तरी विवाहित महिला उमेदवारांनी लग्न झाल्यानंतर माहेरचे पुरावे आणावे कुठून असा प्रश्न त्यांना पडला आहे. माहेरचा पुरावा सिद्ध करण्यासाठी किंवा शैक्षणिक कागदपत्रानुसार ज्या नावाने अर्ज भरण्यात आला त्या नावाने पॅन कार्ड हा एकमेव पुरावा आहे. पॅन कार्डवर पती आणि वडील दोघांचेही नावे असतात परंतु हा पुरावा देखील ग्राह्य धरला जात नसल्याने अनेक विवाहित महिला उमेदवारांना परीक्षा केंद्रावर येऊन माघारी फिरावे लागत आहे. असाच प्रकार दि. १८ जुलै रोजी देखील घडला होता. यावेळी ही महिला उमेदवारांना परीक्षेपासून वंचित राहावे लागले. त्यावेळी सुकेशना पवार, सोनल आडावे, अनिता गंगलवाड, सविता कोल्हे, सरिता मंगलपल्ली, अर्चना जोंधळे, मनिषा बागाने, साधना कदम या महिला उमेदवारांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे करार केली होती. आज दिनांक २९ जुलै रोजी पुन्हा असाच प्रकार सहयोग कॅम्पस मधील परीक्षा केंद्रावर घडला. यावेळी पॅन कार्ड ग्राह्य धरण्यात आले नसल्याने अनेक विवाहित महिला उमेदवारांना परीक्षेपासून वंचित राहावे लागले. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करून पुन्हा परीक्षा देण्याची संधी द्यावी अशी मागणी यावेळी महिला उमेदवार मीनाबाई सूर्यवंशी यांनी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

**विवाहित महिला उमेदवारांना अर्थिक भुर्दंड**

जिल्हा परिषदेच्या विविध पदासाठी घेण्यात येत असलेल्या परीक्षेसाठी आयबीपीएस कडून प्रत्येकी ९०० ते १००० रुपये परीक्षा शुल्क घेण्यात येत आहे. परीक्षा शुल्क भरल्यानंतर जिल्हाच नव्हे तर राज्यातील कानाकोपऱ्यातून आलेल्या विवाहित महिला उमेदवारांना ओळखीच्या पुराव्यावरून परीक्षा न देताच माघारी फिरावे लागत असल्याने परीक्षा शुल्क तसेच प्रवास खर्चाचा भुर्दंड सहन करावा लागत आहे. त्यातच परीक्षेचा रिपोर्टिंग टाईम पहाटे ७ चा ठेवण्यात आल्याने अनेक जण परीक्षा केंद्रावर उशिरा पोहोचत असल्याने त्यांनाही परीक्षा न देताच माघारी फिरवावी लागत असल्याने त्यांनाही आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

# उमरी मुख्यधिकारी डॉ. निलम कांबळे यांच्या अश्वासनाने संदिप गोवंदे यांचे अमरण उपोषण मागे



**तभा वृत्तसेवा**
**उमरी, २९ जुलै -**

उमरी मुख्यधिकारी यांच्या उमरी नगर परिषद समोर अमरण उपोषणाला बसलेले संदिप गोवंदे यांनी नगर परिषद मुख्याधिकारी डॉ निलम कांबळे यांच्या लेखी अश्वासनाने तृर्तास अमरण उपोषणास स्थगिती देवून अमरण उपोषण मागे घेतले आहे .

उमरी शहरामध्ये घरकुल योजने मध्ये नगर परिषद कर्मचारी / अधिकारी यांनी लाच घेवून निकष्यात न बसणाऱ्या धनदांडगे शासकीय / निम्म शासकीय कर्मचारी यांना घरकुल दिले असल्याचा अरोप करित गोरगरीब लोकांना वंचित ठेवल्याचा अरोप करीत संबधीत कर्मचारी यांना निलंबनाची कार्यवाही करावी आणि त्या अधिकारी कर्मचारी यांना दंड म्हणून सदरील घरकुलाची बिले काढल्या प्रकरणी फौजदारी गुन्हे दाखल करून , घरकुल रक्कम वसुल करावे या मागणीसाठी संदिप पुंडलीकराव गोवंदे रा उमरी आंबेडकर नगर रेल्वे स्टेशन जवळ उमरी यांनी महत्वपुर्ण मुद्दा उचला होता . आणि दि २२ जुलै २०२४ रोजी अमरण उपोषणाला बसले होते . तिन दिवस अमरण उपोषण चालू होते अनेक राजकीय सामाजीक पुढारी मित्रमंडळी यांनी मोठया प्रमाणात पाठबळ प्रतिक्रिया देवून समती दर्शविली आहे .

उमरी शहरात १०० च्या घरात धनदांडगे / शासकीय निम्म शासकीय लोकांना व्यक्तीक माहिती लपवून शासनाची फसवणूक केल्याचा घरकुल देल्याचा दावा पुराव्यासह संदिप गोवंदे यांनी केला होता .

त्या अनुषंगाने मुख्यधिकारी डॉ .निलम कांबळे व वरिष्ट लिपीक गणेश मदने , जई मुंडे यांनी मध्यस्थी करून अमरण उपोषण मागे घेण्याची विनंती केली होती.

नगर परिषद मुख्यधिकारी उमरी यांनी दि २४ जुलै २०२४ लेखी पत्र देवून चौकशी करून कार्यवाही करण्यात येईल असे अश्वासन दिल्याने संदिप गोवंदे यांनी अमरण उपोषण मागे घेतले आहे. संदर्भीय विषयानुसार संदिप गोवंदे यांनी दि २९ जुलै रोजी पत्र देवून सदर प्रकरणात मुख्यधिकरी उमरी यांनी दिलेल्या पत्रानुसार कार्यवाही न केल्यास दि १४ ऑगस्ट २०२४ रोजी पुन्हा अमरण उपोषण करणार असल्याचे पत्र प्रत्येक वरीष्ट शासकीय कार्यलयास पत्र देवून इशारा दिला आहे.

## संक्षिप्त वृत्त

### दिवाणी न्यायालय वृक्षारोपण

**हिमायतनगर -** हिमायतनगर शहरातील दिवाणी न्यायालयत तालुका विधी सेवा समिती व अभिवक्ता संघाच्या संयुक्त विद्यमानाने हिमायतनगर न्यायालय परिसरात दि. २९ जुलै रोजी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. सदरील कार्यक्रमासाठी दिवाणी न्यायाधीश तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष कि.रा. खाँद्रे यांच्या पुढाकाराने न्यायालय परिसरात ६३ झाडांची वृक्ष लागवड करण्यात आली. यावेळी हिमायतनगर तालुका अभिवक्ता संघाचे अध्यक्ष ए.पी. वानखेडे, पोलीस निरीक्षक अमोल भगत, नायब तहसिलदार ताडेवाड, कोरेवाड, संदिप कदम, महाजन, जाधव, ज्ञानेश्वर पंदलवाड, किरण गुंडाळे अभिवक्ता संघाचे सदस्य, न्यायालयीन कर्मचारी, व पक्षकार या मान्यवरांच्या उपस्थितीत सदरील वृक्षा रोपण कार्यक्रम संपन्न झाला. दिवानी न्यायालय परिसरात पिंपळ, वड, लिंब, जांभूळ, यासह अनेक वृक्षाची लागवड करण्यात आली. यामध्ये ६३ वृक्ष न्यायालय परिसरात लावण्यात आले. असल्याची माहिती तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष यांच्या कडून देण्यात आली आहे.

### माजी खा. सुभाष वानखेडेनी चक्री येथिल खोडके परिवाराची भेट घेत केले सांत्वन



**निवघा बाजार -** तालुक्यातील चक्री येथिल जेष्ठ शिवसेनिक नागोराव खोडके (मामा) यांच्या नातसुनबाई स्व.सुस्मिता सचिन खोडके यांचा दि.१४ जुलै रोजी दुचाकीवरून पडुन अपघात झाला होता अखेर चार दिवस मृत्यूशी झुंज देत सर्व प्रयत्नाअंती त्याच नांदेड येथिल एका खासगी रुग्णालयात मृत्यू झाला होता त्याअनुसगाने माजी खासदार सुभाष वानखेडे यांनी दि. २८ जुलै रोजी मौजे चक्री येथे जेष्ठ शिवसैनिक नागोराव खोडके यांच्या घरी सांत्वनपर भेट देत खोडके परिवाराचे सांत्वन केले यावेळी मा. उपसरपंच पंजाबराव खंडाळे,शाखाअध्यक्ष गणपत सूर्यवंशी पाटील शिवाजी तामस्कर, भगवान खोडके, विकास कावळी, राजु महाराज गिरी, परमेश्वर खोडके, पत्रकार दिपक सुर्यवंशी उपस्थित होते.

# मुदखेड येथील बैल बाजाराला तळ्याचे स्वरूप

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, २९ जुलै -**



येथील प्रसिद्ध असलेल्या बैल बाजाराला दर वर्षी प्रमाणे याही तळ्याचे स्वरूप आलें आहे. त्यामुळे सन्मित्र कॉलनी, बापुसाहेब नगर भागात रोगराई पसरण्याची शक्यता आहे. या बैलबाजारात दरवर्षी पाणी साचत असते पण नगर पालिकेकडून त्याचा निचरा होण्यासाठी काहीच उपाय योजना होत नाही. त्यामुळे त्या परीसरात झाडे झुडपे वाढली आहेत. तसेच वराह व भटक्या स्वाणांनी उच्छाद मांडला आहे. या साचलेल्या पाण्यामुळे जीव जंतू जसे की सर्प - घुशी यांचे प्रमाण दरवर्षीच वाढते.

आणि सर्वत्र घाण साचली जाते. त्यामुळे बाजूंच्या इमारतींना साचलेल्या पाण्यामुळे धोका निर्माण होतो आहे. या कडे नगर पालीके ने लक्ष देणे अपेक्षीत असून साचलेल्या पाण्याला वाट करून दिली तर उचित होईल अशीच अपेक्षा सर्वसामान्य माणूस व्यक्त करत आहेत.

# मोर चौक ते वाडी रस्ता दोन दिवसात दुरुस्त करणार

## बांधकाम विभागाचे कृती समितीला लेखी आश्वासन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, २९ जुलै -**

मोर चौक ते वाडी बु. रस्त्याच्या दुरुस्तीसाठी सोमवारी लाक्षणीक उपोषण करण्यात आले. या उपोषणाला यश आले असून दोन दिवसात रस्ता दुरुस्त केला जाईल असे लेखी आश्वासन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने देण्यात आले आहे. या नंतर उपोषण मागे घेण्यात आले.

मोर चौक ते वाडी बु. या रस्त्याची दुरवस्था झाली आहे. खड्डेमय रस्यामुळे दररोज अपघात होत आहेत. हा रस्ता दुरुस्त व्हावा या मागणीसाठी नागरीक कृती समितीच्या वतीने अनेकदा निवेदने देण्यात आले. तीन हजार सह्यांचे निवेदन देऊनही दखल न घेतल्यामुळे सोमवारी (२९ जुलै) कृती समितीच्या वतीने लाक्षणीक उपोषण करण्यात आले. तत्पूर्वी सकाळी खड्यांची पुजा करून बेशरमाचे झाडे लावून निषेध व्यक्त करण्यात आला.



दुपारी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता नाईक यांनी उपोषण स्थळी भेट देऊन रस्ता दुरुस्तीचे लेखी आश्वासन दिले. त्यानंतर राष्ट्रगीताने समारोप करण्यात याला.

उपोषणात कृती समितीचे अध्यक्ष दिलीप शिंदे, कार्याध्यक्ष संकेत जमदाडे, सचिव विजय कुलकर्णी, उपाध्यक्ष वसंत क-हाळे, नंदकुमार बनसोडे, कोषाध्यक्ष किरण नाईक, पंकज कद्रेकर, संतोष धानोरकर,बी.बी. एंगडे, सौ.उज्वला दर्डा, सौ. सुर्यवंशी, शंकर लकडे, जयराम वडजे, राम जाधव, संतीष गंजेवार, रायपल्ले यांचा सहभाग होता. उपोषणाला संगीता पा. डक, विठ्ठल पावडे, डॉ.सुजित येवलीकर, बंडू पावडे, छोटा बंडु पावडे, विजय बगाटे, दत्ता कोकाटे, महेश हंगरगेकर यांनी भेट देऊन उपोषणाला पाठिंबा दिला.

# मुदखेड वासियांचे प्रेम कायम स्मरणात राहील : कमांडंट लीलाधर महाराणीया

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, २९ जुलै -**

कोणत्याही अधिकारी कर्मचाऱ्यास आपले कर्तव्य हे आपल्या पदाला न्याय देत निष्ठेने पार पाडावे लागते , प्रशासकीय काम करत असताना शिस्तही अत्यंत महत्त्वाची आहे, त्या अनुषंगाने येथील केंद्रीय राखीव पोलीस दलामध्ये आपल्या सेवा काळात आपण अतिशय निष्ठेने कर्तव्य बजावले मुदखेड वासियांचे प्रेम व ऋणानुबंध आपल्या कायम स्मरणात राहतील असे प्रतिपादन कमांडंट लीलाधर महाराणीया यांनी पत्रकारांशी बोलताना केले.

केंद्रीय पोलीस प्रशिक्षण महाविद्यालयातील कमांडट लीलाधर महाराणीया यांची बदली ग्रुप सेंटर काठ गोदाम प्रशासन उत्तराखंड या ठिकाणी झाली असल्यामुळे स्थानिक पत्रकारांच्या वतीने त्यांचा केंद्रीय पोलीस प्रशिक्षण महाविद्यालयाच्या एका सभागृहात सत्कार करण्यात आला.

यावेळी जेष्ठ पत्रकार संजय कोलते, मुदखेड मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, अतिक अहेमद, जेष्ठ पत्रकार मनोज कमटे, संतोष पाटील गाढे, प्रल्हाद मस्के, दिनेश शर्मा, साहेबराव गागलवाड, शेख इरफान, अब्दुल हकीम, व उद्योजक शिवानंद देवके यांची उपस्थिती होती. येथील पोलीस प्रशिक्षण महाविद्यालयात नव्याने कलकत्ता येथून सि.टी .व्यंकटेश हे डीआयजी म्हणून रुजू झाले आहेत.

# रेल्वेगेट समोरचे रस्त्यावरील वनविभागाचे अतिक्रमण हटवून रस्ता रुंद करा

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, २९ जुलै -**

शहरातील रेल्वेगेट ते सरस्वती कॉलनी कडे जाणाऱ्या ऐंशी फुटाच्या रस्त्यावर रेल्वेगेट समोरच वनविभागाच्या एफ.डी.सी.एम. कार्यालयाकडून तार लावुन गेट बसवुन वीस फुट अतिक्रमण करण्यात आले आहे.त्यामुळे हा रस्त्या अरुंद झाला आहे. येथेच रेल्वेगेट असल्याने वाहनधारकांना व शालेय विद्यार्थ्यांसह जनतेला त्रास सहन करावा लागत आहे.हे अनाधिकृत अवैध अतिक्रमण सार्वजनिक बांधकाम विभागाकडून काढण्यात यावे अशी मागणी जनतेतून करण्यात येत आहे. शिवाजीनगर मधील रेल्वेगेट पासुन सरस्वती कॉलनी हेडगेवार कॉलनी जिजामाता कॉलनी सुभाष नगर बेल्लोरी सहीत ग्रामीण भागातील पिंपळगाव, मांडवा, घोगरवाडी, नागझरी, हटकर कोरी, झेंडीगुढा, वंजारवाडी, या सात ते आठ गावाकडे जाणारा हा महत्त्वपूर्ण रस्ता असून गेल्या अनेक वर्षापासून या रस्त्याची अवस्था अतिशय खराब झालेली आहे त्यामुळे रस्ता दुरुस्तीसाठी राज्य शासनाकडून मंजूरी मिळाली आहे. त्यानुसार कंत्राटदाराने कामही चालू केले आहे. परंतु कामाचा दर्जा आणि रस्त्याच्या रुंदीकडे सार्वजनिक बांधकाम कार्यालयाचे लक्ष दिसून येत नाही ,असे जनतेतून मत व्यक्त होत आहे. किनवट शहराच्या पूर्वे कडे जाणाऱ्या आंबेडकर चौक ते रेल्वे गेट पुढे सरस्वती कॉलनी कडे जाणाऱ्या जाणारा हा महत्त्वपूर्ण रस्ता असून दररोज या रस्त्याचा वापर हजारो लोक करतात. हया रस्त्यावर वनविभागाच्या एफडीसीएम कार्यालयाने मुजोरीने स्वतःचे जवळपास पनास एकर जमीन असतांनाही चक्क रस्त्यासाठी रेलवेविभागाने दिलेल्या रस्त्याच्या जमिनीवर अनाधिकृत अतिक्रमण करून रस्ता अडविण्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून केले आहे .यापूर्वी रेल्वे विभाग आणि सां.बा. कार्यालयाने सुद्धा एफ.डी.सी.एम. कार्यालयास नोटीस देऊन या रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्याचे विनंती केलेली आहे . यामुळे वनविभागाने आपल्या जमिनीचे मोजणीही पुर्ण करून वीस फुट मागे छोटे खंबे रोवले आहेत .परतुं अतिक्रमण हटवले नाही. शासनाच्याच कार्यालयांची एकदुसरयांशी ताळमेळ नसल्याने शासनाच्याच कार्यालयाच्या



अतिक्रमणाचा फटका शहरातील जनतेला बसत आहे .याला जबाबदार कोन? हा रस्ता सार्वजनिक बांधकाम कार्यालयाच्या अखत्यारीतील असला तरी पालिकेच्या कार्यक्षेत्रात येत असल्याने पालिका प्रशासनाने ही या रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यासाठी पुढाकार घेवुन रस्ता अतिक्रमणमुक्त करावा तसेच हा रस्ता डि.पी.नकाशानुसार ऐंशी फुट रुंद करावे तसेच या सरस्वती कॉलनी परिसरातील सर्व गल्ली घरांचे सांडपाणी पुढे नाल्या मधे जाण्यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजु सी.सी. नाली बांधण्यात यावे.अशी मागणी करुन या मागणीकडे दुर्लक्ष केल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल. असा ईशारा जनतेतून देण्यात येत आहे.

# नंदगिरी किल्ल्याच्या संवर्धनासाठी निधी उपलब्ध करून देणार : आ. हंबर्डे



**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, २९ जुलै -**

गोदाकाठी वसलेला नांदेडकरांचा ऐतिहासीक आणि सांस्कृतिक वारसा म्हणून ओळखल्या जाणार्या नंदगिरी किल्ल्याला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी आपण वैयक्तिक लक्ष घालणार असून त्यासाठी आवश्यक लागणारा निधी उपलब्ध करून देणार असल्याची घोषणा नांदेड दक्षिणचे आमदार मोहनराव हंबर्डे यांनी केली.

जुन्या नांदेड भागात स्थित असलेला नंदगिरी किल्ल्यास आ. मोहनराव हंबर्डे यांनी भेट देवून पाहणी केली.त्यांच्यावतीने किल्ला परिसरात दगडी चुरी टाकण्याचेही काम सुरु करण्यात आले.ते म्हणाले, हा किल्ला म्हणजे नांदेड जिल्ह्याची शान असून किल्ल्याला ऐतिहासीक वारसा आहे.गोदावरी नदी तीरावर असलेला हा किल्ला पर्यटनच्या दृष्टीनेही तितकाच महत्त्वाचा आणि आकर्षक आहे.गेल्या अनेक वर्षांपासून किल्ल्याची दुरवस्था झाली आहे. किल्ल्याचे उत्तम संवर्धन आणि डागडुजी केल्यास देश -विदेशातील पर्यटकांसाठी नंदगिरी किल्ला विशेष आकर्षण ठरणार आहे. हा केवळ किल्ला नसून नांदेडकरांचा ऐतिहासीक आणि सांस्कृतिक वारसा आहे आणि तो जपण्यासाठी नंदगिरीला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी वैयक्तिक लक्ष घालून आवश्यक तो निधी उपलब्ध करून देवू, असे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी नंदगिरी किल्ल्याच्या संवर्धनासाठी अथक परिश्रम घेणारे नंदगिरी किल्ल्याचे युवा शिलेदार प्रामुख्याने उपस्थित होते. त्या सर्व युवा वर्गाचे त्यांनी अभिनंदन केले. नांदेड शहराची ऐतिहासिक परंपरा जोपासण्यासाठी हे सर्व युवा गेल्या अनेक दिवसांपासून घेत असलेले परिश्रम खरोखरच कौतुकास्पद असल्याचेही ते म्हणाले.

### टी. सी. हरवली आहे

माझी संजीवनी एकनाथ पांडे या नावाची ९ वी पासची उमरी ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

संपर्क पत्ता
एकनाथ पांडे राहणार इज्जतगाव ता. उमरी जि. नांदेड.
मो. नं. ९३७०५९९१२८



**नांदेड - काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व विरोधी पक्षनेते विजय वडटीवार, आदी काँग्रेस नेते हे नांदेड दौऱ्यावर येणार असल्याने त्यासंदर्भाची नियोजन बैठक खा. वसंतराव चव्हाण यांनी शासकीय विश्रामगृह येथे काँग्रेस पदाधिकारी यांची आढावा बैठक घेतली.**

# पिंजारी जात प्रमाणपत्रासाठी प्रयत्न करणार : निहाल अहेमद मन्सूरी

**तभा वृत्तसेवा**
**भोकर, २९ जुलै -**

ग्रामीण भागातील पिंजारी समाज हा गादी भरुन देण्याचा व्यवसाय करत आपला उदरनिर्वाह चालवितो मुस्लिम धर्मातील पिंजारी ही जात ओबीसी प्रवर्गात समाविष्ट असून त्यांच्या जात प्रमाणपत्रासाठी येणाऱ्या अडचणी दूर करुन त्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन पिंजारी मंसूरी लदाफ या संघटनेचे नांदेड जिल्हाध्यक्ष निहाल अहेमद मन्सूरी यांनी दिले आहे.

दि.२६ जुलै रोजी शुक्रवारी भोकर शहरातील रेल्वे स्टेशन जवळील संगम मंगल कार्यालयात पिंजारी लदाफ मंसूरी या संघटनेचा मेळावा घेण्यात आला या मिळाव्याला शेख जैनुद्दीन पिंजारी दुगावकर उपाध्यक्ष,पिंजारी अन्वर भाई खडकपुरा नांदेड शहर प्रमुख,शेख रौफ भाई पिंजारी कांडलीकर उपशहर प्रमुख, अॅड. जफर भाई पिंजारी महानगर, प्रमुख,शेख हफीज भाई पिंजारी कांडलीकर उपमहानगर प्रमुख नांदेड बबलू पिंजारी बारडकर भोकर विधानसभा अध्यक्ष,हाजी अहेमद साब पोलवाले,शेख नन्हूसाब,हाजी अब्दूल वहिद ,शेखलाल भाई गुत्तेदार,कासीम भाई रिटायर्ड रजिस्ट्रार,अहेमदभाई कोळगावकर,मुस्तफा भाई पोलीसवाले बाबुभाई नागापूरकर,ईस्माईल मिस्त्री,सलिम भाई कोळगावकर,महेबूब खुन्शावली, मौलामिया खाज्यामियॉ रावणगांवकर,ईब्राहीम रावनगांवकर,आदिंची उपस्थिती होती. पुढे बोलताना निहाल अहेमद मन्सूरी म्हणाले की मराठा समाजाला ओबीसीमध्ये आरक्षण मिळावे यासाठी जरांगे पाटील गेल्या एका वर्षापासून मोर्चे आंदोलने उपोषण करत आहेत.

# सर्पमित्र व प्राणीमित्र संघटनाच्या विविध मागण्या पूर्ण करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, २९ जुलै -**

अखिल भारतीय सर्पमित्र व प्राणीमित्र संघटना यांच्या मार्फत शासनाकडे त्यांच्या प्रमुख मागण्या ज्यात सर्व सर्पमित्रांना अपघाती विमा व सर्पदंश उपचार विमा, सर्वांना शासकीय ओळखपत्र मिळणे , सर्पमित्रांच्या व प्राणी मित्रांच्या सेवेला अत्यावश्यक सेवेत समाविष्ट करणे तसेच सर्पमित्रांची माहिती देणारे , नोंदणी करणारे पोर्टल उभारण्यात यावे इत्यादी मागण्या पूर्ण करण्याकरिता तहसीलदार यांच्यामार्फत निवेदन देऊन शासनास कळविण्यात आले.

गाव पातळीपासून शहरांमध्ये जवळपास प्रत्येक जिल्ह्यात घराघरात, ऑफिस, शेत, गोठे अशा मानवाच्या व पाळवी प्राण्यांच्या राहण्याचे ठिकाणी विषारी व बिनविषारी साप निघतच असतात. विषारी सापांच्या चावणामुळे जीवित व वित्तहानी चा धोका संभवतो बरेचदा हे अपघाताने व अनावधानाने किंवा सापा विषयक अज्ञानामुळे घडवून येते शिवाय बराचश्या ठिकाणी वरील सारख्या घटनांमुळे अज्ञान भीतीपोटी कितीतरी सापांची दिसता क्षणीच ठेचून निर्घृण हत्या केली जाते. त्यापैकी बरेचसे साप हे बिनविषारी पण असू शकतात .वरील दोन्ही प्रसंगातून तळागाळातील निष्ठावंत सर्पमित्र आणि प्राणीमित्र हे वेळोवेळी धोका पत्करून आपल्या कौशल्याच्या उपयोग करून तात्काळ घटनास्थळी हजर होतात व असे विषारी व बिनविषारी साप पकडतात व लगेच त्यांना जंगलात किंवा सुरक्षित ठिकाणी वन विभागाच्या मार्गदर्शक खाली सोडतात अशा महत्त्वाच्या समाजोपयोगी मानव, प्राणी व साप यांच्या तिघांच्याही जीवाचे रक्षण करण्याचे महान कार्य आपले सर्पमित्र आणि प्राणीमित्र पूर्ण निष्ठेने अहोरात्र करतच असतात. साप व प्रत्येक वन जीव जरी मोलाचा असला आहे तरी सर्पमित्र हा लाख मोलाचा आहे. त्यामुळे सर्पदंश होऊन सर्पमित्रांच्या प्राणी मित्रांचा अपघात किंवा मृत्यू झाल्यास त्यांना अपघात विमा प्राणी मित्र विमा योजनेअंतर्गत त्यांना किंवा त्यांच्या कुटुंबियांना २५ लक्ष रुपयेची अपघाती विमा मंजूर करण्यात यावे, त्यांच्या सेवेला अत्यावश्यक सेवेचा दर्जा मिळवून देण्यात यावे यासह अन्य मागण्यांच्या बाबत शासनाने सकारात्मक विचार करून आमच्या या मागण्या पूर्ण करावे अशी मागणी यावेळेस निवेदनाद्वारे करण्यात आली. निवेदनावर बालाजी सरकुंडे, पृथ्वीराज भुसारे, गौरव भुसारे, आनंद भुसारे, गजानन डाखोरे, शिवाजी डाखोरे इत्यादींचे स्वाक्षरी आहेत.